ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४१

(जुलै-डिसेंबर २०१९/ खंड १२, अंक २)

❑ प्रमुख संपादक ❑

**दि.व्यं.जहागिरदार**

❑ सल्लागार मंडळ ❑

**श्रीनिवास खांदेवाले**
**सुनील शिंदे**
**प्रतिभा काळमेघ**
**आशीष महातळे**

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑

**दि. व्यं. जहागिरदार**
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)–२६६१८५१, मो. ९८२२९२२९५१

## अनुक्रमणिका

■ लहान राज्यांची संकल्पना आणि आव्हाने
– आर.बी.भांडवलकर ........................१

■ गन्नर मिर्दल यांचे Economic Theory and Under - Developed Regions
- मुक्ता जहागिरदार............................०८

■ वर्तमान वित्तीय स्थिरतेबाबत रिझर्व्ह बँकेची भूमिका
– विजय रमाकांतराव रोटे......................१८

■ Revising Methodologies and Fund Distribution Formulae: The need of the hour for Vidarbha's Development
- Kapil D. Chandrayan.................२५

■ प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी आणि भारत : एक दृष्टीक्षेप
– अंजली कुळकर्णी...........................३३

■ ओला दुष्काळ : स्वरूप, परिणाम व उपाय
– वनिता चोरे, जे.व्ही.गायकवाड
आर.बी.भांडवलकर....................४२

■ Impact of Socio-Economic Factors on the Choice of Higher Education : with Special reference to Nagpur City
- Samit L. Mahore..................५४

■ Effectiveness of Anti-Poverty Programme : An Evaluation on Micro Level Study of Amravati District
- Rajshree A. Raibhog...............६८

■ महात्मा गांधीची विश्वस्त संकल्पना – आधार भारतीय तत्त्वज्ञानाचा
–प्रशांत हरमकर .............................७६

### ग्रंथ परिचय

■ 'ग्रामीण विकासाची वाटचाल'
– दिपाली पडोळे........................८५

■ ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ........८८

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
## (२०१९-२०)

- कार्याध्यक्ष
  डॉ. निवृत्ती पिस्तुलकर
- अध्यक्षा
  डॉ. मृणालिनी फडणवीस
- उपाध्यक्ष
  डॉ. राजेश बुरंगे
- सचिव
  डॉ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. दि.त्र्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. पुष्पा ज. उदासी (नागपूर शहर)
  डॉ. सुनिल कृ.शिंदे (नागपूर ग्रामीण)
  डॉ.विशाल वा. मालेकार (चंद्रपूर)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  डॉ.महेंद्र पां. गावंडे (वर्धा)
  डॉ. संजय ज. कोठारी (अमरावती )
  डॉ. डि.के.राठोड (अकोला )
  प्रा. दिलीप पा.महाजन (बुलढाणा)
  प्रा.माधुरी पं. राखुंडे (यवतमाळ)
  डॉ.मधुकर श्री.लाकलोडे (वाशिम)
- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६,७०२०४६७०२१ (whatsapp no.)
  email : narendrapandharikar@gmail.com

आजीव सदस्यता शुल्क : रू. १०००/-आहे, ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालय,अचलपूर कॅम्प, (जि.अमरावती) यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.

**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १५० रू.
२) शैक्षणिक संस्था - २०० रू.

# संपादकीय .....

२०१९-२० हे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेवे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. याचा आपल्या सर्वांना अत्यंत आनंद होत आहे. 'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचा खंड १२, अंक २ (जुलै-डिसेंबर २०१९) सादर करतांना मला या पार्श्वभूमीवर विशेष आनंद वाटत आहे. त्या निमित्ताने परिषदेचे विद्यमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष आणि कार्यकारिणीचे सदस्य व सर्वसाधारण सदस्य यांच्या सहकार्याने व माझ्यावरील विश्वासामुळे हा अंक तयार होऊ शकला याची मला पूर्ण कल्पना आहे. हा अंक आपणा सर्वांना आवडेल हा विश्वास वाटतो.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनात आर.बी.भांडवलकर यांनी जे अध्यक्षीय भाषण केले त्याचा गोषवारा 'लहान राज्यांची संकल्पना आणि आव्हाने' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या लेखात आहे तर त्याच अधिवेशनात 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' या मालिकेत डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी गन्नर मिर्दलच्या ' Economic Theory and Underdeveloped Regions' ह्या ग्रंथाचा परिचय करून दिला होता. त्या भाषणाचा सारांश देखील प्रसिद्ध केला आहे. विजय रोटे यांनी वर्तमान वित्तीय स्थिरतेबाबत रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेचा आढावा व विश्लेषण आपल्या लेखात केले आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे सदस्य कपिल चंद्रायण यांनी सिंचन निधीचे वेगवेगळ्या प्रादेशिक विभागात जे वाटप केले जाते त्यात सुधारणा करण्यात यावी या दृष्टीने शास्त्रीय विवेचन केले आहे व तसेच बॅकलॉग मोजण्यासाठी एक पर्यायी पद्धतीही त्यांनी सुचविली आहे. गेल्या नोव्हेंबर मध्ये प्रादेशिक व्यापार आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षरी न करण्याची भारताने जी भूमिका घेतली त्यावर अंजली कुळकर्णी यांनी सविस्तरपणे आकडेवारीच्या आधारावर चर्चा केलेला लेख आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासकांना निश्चितच आवडेल. यंदा महाराष्ट्रासह काही प्रांत ओला दुष्काळ अनुभवत आहे. ''ओला दुष्काळ : स्वरूप, परिणाम व कारणे'' हा लेख वनिता चोरे, जे.व्ही. गायकवाड आणि आर.बी.भांडवलकर यांनी लिहला आहे. हे तिघे याच विषयावर झालेल्या एक परिसंवादात सहभागी झाले होते. या विषयाच्या तीन पैलूवर हा लेख तयार केला आहे.

उच्च शिक्षणाची निवड करताना विविध सामाजिक आर्थिक घटकांचा प्रभाव पडतो. नागपूर शहराची निवड करून सामाजिक आर्थिक घटकांचा प्रभाव तपासणारा, नमुना आकडेवारीवर आधारलेला लेख समित माहोरे यांनी सिद्ध केला. अनेक वर्षांपासून देशात दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी रोजगारविषयक विविध योजना अंमलात येत आहेत. त्या योजनांची परिणामकारकता किती व ती कशी ठरवावी हा त्यातील एक कळीचा मुद्दा असतो. राजश्री रायभोग यांनी आपल्या लेखात अमरावती जिल्ह्याच्या संदर्भात हा विषय हाताळण्याचा प्रयत्न आपल्या लेखात केला आहे. २०१८-१९ हे महात्मा गांधींच्या जन्माचे १५० वे वर्ष म्हणून आपण साजरे केले. यापूर्वीच्या अंकात महात्मा गांधीवर काही लेखही प्रसिद्ध झाले होते. त्यांच्या विचारांतील एक महत्त्वाचा विचार म्हणजे त्यांची विश्वस्ताची कल्पना. या कल्पनांचा सविस्तर आढावा प्रशांत हरमकर यांनी घेऊन काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या विषयावर प्रकाश टाकला आहे.

कुमुदिनी जोगी यांनी आपल्या प्रबंधावर 'ग्रामीण विकासाची वाटचाल' हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकाचे परिक्षण दिपाली पडोळे यांनी केले आहे. तसेच भिवापूर येथे झालेल्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांतही अखेरीस दिला आहे.

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेसाठी लेखकांनी आपले संशोधनपर लिखाण वर्षभरात केव्हाही पाठवावे. लेख डीटीपी केल्यावर स्वत: तपासावेत. अर्थमीमांसेसाठी आपणास जाहिरातींची गरज असते. जिल्हा प्रतिनिधींनीने वर्षभरात एक तरी जाहिरात मिळविण्याचा प्रयत्न करावा. तसेच आपल्या जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये अंकाची विक्री करण्यासाठी सहकार्य द्यावे. सदर अंक तयार करतांना अंकातील लेखकांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार. कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी हा अंक सुबकपणे तयार करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार.

दिनांक. ११ डिसेंबर, २०१९.
स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**
प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

# लहान राज्यांची संकल्पना आणि आव्हाने

## (विशेष संदर्भ : विदर्भ राज्य)

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर येथे दि. ३१ जाने. व १ फेब्रु. २०१९ दरम्यान संपन्न झाले. अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.आर.बी.भांडवलकर यांच्या अध्यक्षीय भाषणाचा हा गोषवारा आहे.)**

**आर.बी.भांडवलकर**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.

नावातच महानता आणि राष्ट्र असलेले महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य होय. महाराष्ट्र हा कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा आणि विदर्भ असे पाच भौगोलिक विभागांमिळून बनला आहे. आर्थिक विकासासाठी कृषी, औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास करणे हा प्रत्येक देश आणि राज्याचा प्रयत्न असतो. परंतु एकाच देशात किंवा राज्यात वेगवेगळ्या प्रदेशामध्ये नैसर्गिक साधनसामग्रीचे असमान द्विवतरण झालेले दिसून येते. त्यामुळे प्रदेशाच्या विकासाचा दर व आर्थिक विकासाचा आकृतिबंध वेगवेगळा असतो. आर्थिक विषमता हा एक गहन विषय असून तीसमाज जीवनातील नैसर्गिक आणि मानवनिर्मित रचनेशी जोडलेली असते. विशिष्ट व्यक्तीसह किंवा प्रदेश जर माघारलेला असेल तर ते माघारलेपण त्याची दुर्बलता ठरते. बहुतेक वेळा प्रादेशिक असंतुलनाचे कारण राजकीय किंवा आर्थिकेत्तर असते. प्रादेशिक विषमतेची समस्या जगातील विकसित व अविकसित अशा दोन्हीही प्रकारच्या देशामध्ये आढळून येते. एवढेच नव्हे तर रशिया आणि चीनसारख्या समाजवादी देशामध्येही प्रादेशिक विषमतेची समस्या असल्याचे दिसून येते. म्हणजेच हा प्रश्न आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरही आहे.

भारतात राज्य-राज्यामध्ये तसेच विविध प्रदेशामध्ये विषमता मोठ्या प्रमाणात आहे. ही विषमता पूर्णपणे दूर करणे अशक्य असते. तेव्हा स्वतंत्र राज्याची मागणी पुढे येत असते. एका राज्यात एकच भाषा असली पाहिजे. या विचारातून भाषावर प्रांतरचनेची मागणी सन १९३० नंतर होऊ लागली. महाराष्ट्राच्या विविध विभागात आर्थिक विकासाच्या बाबतीत असणारा असमतोल हा विकासाचे फायदे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत सारख्याच प्रमाणात पोहचू न शकल्याचा परिपाक आहे. जिल्ह्यातून नवीन तालुके, राज्यात नवीन जिल्हे निर्माण करण्याची मागणी केली जाते तेव्हा त्याला विकासाचे पाऊल आणि लोकाभिमुख धोरणं मानले जाते. म्हणजेच नवीन राज्य निर्माण करतांना ती विकासाची गरज मानली जाते. नवीन राज्ये निर्माण करण्याने काय देश विभागला जातो? मुळीच नाही. तर अशा धोरणामुळे मागास प्रदेशातील लोकांना स्वत:च्या विकासाची जबाबदारी आणि अधिकार मिळतात. मागास प्रदेशातील नेतृत्वाला विकासाची जबाबदारी आणि निर्णय स्वातंत्र्य मिळण्याची आवश्यकता असते. ते मिळाल्यास विकास निश्चित होतो. आज छत्तीसगड (२०००), झारखंड (२०००), उत्तराखंड (२०००), तेलंगणा (२०१४) ही राज्ये झपाट्याने

विकास करणारी राज्ये म्हणून प्रकाश झोतात आहेत. आपल्या देशात विदर्भ, गोरखालँड इत्यादी प्रदेशांना राज्याचा दर्जा मिळावा या मागण्या ८०-१०० वर्षे जुन्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे राज्य पुर्नरचनेबाबतची त्यांची भूमिका होय. प्रादेशिक वाद बाळगू नये म्हणून एकच भाषा बोलणाऱ्या प्रांताचीही अनेक राज्य असायला पाहिजे अशी त्यांची सूचना होती. तसेच आकाराने लहान परंतु आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्य असावीत, असे त्यांचे मत होते. राज्ये आकाराने लहान असल्यास शासकता(Governance) चांगली असते. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. मराठी भाषिक प्रांताची चार राज्ये १) मुंबई-महाराष्ट्र महानगर २) पश्चिम महाराष्ट्र ३) मराठवाडा-मध्य महाराष्ट्र ४) विदर्भ पूर्व महाराष्ट्र व्हावीत असे त्यांचे मत होते.

**विदर्भ राज्य संकल्पना :**

प्रादेशिक असमतोलाची समस्या केवळ महाराष्ट्रा पुरतीच मर्यादित नसून ती भारताच्या योजनाबद्ध आर्थिक विकासातील त्रुटी आहे. कारण प्रादेशिक विषमता पूर्णपणे दूर करणे अशक्य असते तेव्हा स्वतंत्र राज्याची मागणी पुढे येत असते. विदर्भाला ऐतिहासिक आणि प्राचीन परंपरा लाभलेली आहे नव्हे तर निसर्गत: संपन्न असा हा प्रदेश आहे. विदर्भतील वऱ्हा निजाम राज्याचा भाग होता. ब्रिटिश अंमलात पूर्व विदर्भ भोसल्याकडून आणि पश्चिम विदर्भ निजामाकडून हस्तगत केला गेला. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत हा सर्व प्रदेश मध्य प्रांत वऱ्हाड (Central Provinces and Berar) या नावाने ज्ञात होता. सन १९०५ पासून वऱ्हाडच्या लोकांची स्वतंत्र राज्याची मागणी होती. ब्रिटिशांनी जसे मिळतील तसे प्रदेश जिंकून द्विभाषी किंवा बहुभाषी राज्ये तयार केली. तत्कालीन मध्यप्रांतात हिंदी व मराठी भाषा होती. निजामात उर्दू व मराठी भाषा तर मुंबईत कानडी, मराठी आणि गुजराती भाषा होत्या. इंग्रजीतून कारभार चालत असल्यामुळे विविध प्रांतात इंग्रजी हा दुवा होता.

मध्यप्रांत वऱ्हाड (सी.पी.ॲन्ड बेरार) विधिमंडळाने सन १९३८ मध्ये मराठी भाषिक आठ जिल्ह्यांचे (आजचा विदर्भ) वेगळे राज्य व्हावे असा ठराव पारित केला होता. परंतु १९३९ च्या द्वितीय महायुद्धामुळे विदर्भ राज्य निर्मितीचा मुद्दा मागे पडून दुर्लक्षित राहिला. श्री. ब्रिजलाल बियाणी आणि लोकनायक बापूजी अणे यांनी स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन चालविले होते. १९५३ मध्ये प्रांतपुर्नरचना आयोग केंद्र सरकारने नेमला. न्यायमूर्ती फाजल अली आयोगाने स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस करतांना विदर्भाचा भाग आर्थिकदृष्ट्या शिल्लकीचा प्रदेश आहे असे म्हटले होते. सातपुड्याच्या दक्षिणेला सुपीक जमीन असलेला हा प्रदेश ज्याचा वेदामध्येही उल्लेख आहे. भारताचा नकाशा समोर आणला तर विदर्भाचे स्थान मध्यवर्ती हृदयस्थान म्हणून ओळख असणाऱ्या हृदय संपन्न विदर्भात कापूस (पांढर सोनं), कोळसा (काळा हिरा), वने (हिरवं सोनं) म्हणून समृद्ध आणि प्रसिद्ध आहे. थोडक्यात खनिज संपत्ती आणि वनसंपदा याचाच सुगंध विदर्भाला असल्यामुळेच विदर्भ 'वऱ्हाड सोन्याची कऱ्हाड' म्हणून ओळखला जातो.

* कापसाचा शोध लावणारे 'गृत्समद ऋषी' यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील होते. ते गणित तज्ज्ञ, वैज्ञानिक, कृषी संशोधक व

कुशल विणकर होते.

- ✻ आर्यभट्ट, भास्कर, रूख्मिणी, दमयंती, सत्यभामा आणि स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या मातोश्री राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांचा प्रदेश म्हणजे विदर्भ!
- ✻ स्त्री-पुरूषांना समान प्रतिष्ठा देणारा आणि प्राचीन काळी सगळ्यात पुरोगामी असलेला महानुभाव पंथ निर्माण झालेला प्रदेश म्हणजे विदर्भ!
- ✻ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्राम उत्थानाचा संदेश देणारा, समता, स्वच्छता आणि विवेक ह्यांचा संदेश देणारे वैराग्यमूर्ती गाडगे बाबा आणि प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजाचा प्रदेश म्हणजे विदर्भ !
- ✻ राष्ट्रपिता महात्मा गांधी, विनोबाजी भावे, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, बाबा आमटे, डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, डॉ. विजय भटकर, डॉ. रवि कोल्हे यांच्या कार्य कर्तृत्वाने पुनीत झालेला प्रदेश म्हणजे विदर्भ!
- ✻ संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर देखील स्वत:ची वेगळी संस्कृती जपणारा प्रदेश म्हणजे विदर्भ!
- ✻ विदर्भ हा भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी दृष्टीनी मराठी भाषिक भिन्नत्व व असलेला प्रदेश आहे. तर पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भात गरिबी तिपटीने अधिक ३१-३५ टक्के आहे.

**स्वतंत्र विदर्भाची मागणी का ?**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ५९ वर्षामध्ये विदर्भ प्रदेश विकासाच्या बाबतीत दुर्लक्षित राहिलेला आहे. सर्व मराठी प्रदेशाच्या एकूण ७० टक्के वीज उत्पादन, ९३ टक्के खनिजे, ९० टक्के संत्रा उत्पादन, ७० टक्के कापूस उत्पादन, आता सोयाबीनचे भरपूर उत्पादन असणारा विदर्भ विकासाच्या प्रमुख प्रवाहापासून अलिप्त राहिलेला आहे.

- ✻ दि. २९ जुलै १९८३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील शासनाने सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ प्रा.डॉ. वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समिती नेमली होती. ३६ वर्षात त्या प्रश्नांचे स्वरूप जसेच्या तसेच राहिले आहे नव्हेतर सातत्याने विदर्भावर विकासाच्या बाबतीत अन्याय झाल्याचे दिसून येते.
- ✻ सन १९५५-५६ च्या आकडेवारीनुसार दरडोई उत्पन्नात तिसऱ्या क्रमांकावर असणारा विदर्भ आज शेवटच्या क्रमांकावर पोहचला आहे.
- ✻ विदर्भाला संविधनाने ३७१(२) च्या रूपात आर्थिक संरक्षण दिले. त्याची अंमलबजावणी झालीच नाही.
- ✻ विदर्भात मेळघाट व गडचिरोली असे दोन जंगलपट्टे आहेत. या वनाचा औषध वनस्पती, औद्योगिक कच्चा माल, चारा व गवतापासून वीज, विविध प्रकारचे फळ उत्पादन इत्यादी माध्यमातून तेथील आदिवासी, भटक्या वन्य जाती व इतर जातीच्या लोकांचे जीवन, रोजगार आणि संपत्ती निर्मिती ह्याकरिता नियोजन झाले नाही. उलट रोगराई, निरक्षरता, कुपोषण आणि दारिद्र्य ह्यांचे थैमान दिसून येते.
- ✻ विदर्भाचा ग्रामीण व शहरी विकासाचा व नागरी जीवनाचा पाया जलविकास हा आहे. परंतु सत्यशोधन समितीने ३० जून १९८२ च्या स्थितीवर

काढलेला जलसिंचनाचा अनुशेष कमी झाला नसून त्यानंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. उदा. कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत जो निर्णय घेण्यात आला हाच न्याय विदर्भाला गोदावरी आणि तापी खोऱ्यातील पाण्याचे बाबतीत लागू केला नाही.

✻ संपूर्ण विदर्भात सांस्कृतिक वैभव असलेली ठिकाणे, प्रसिद्ध धार्मिक स्थळे, ऐतिहासिक महत्त्वाची स्थळे, वन व जल यांची सौंदर्यस्थळे, सातपुडा पर्वत, किल्ले, अभयारण्ये यांचा विकास करून पर्यटन क्षेत्र विकसित झाले नाही.

✻ विदर्भातील शेतीकडे माती परीक्षण, सिंचन, पीकरचना, कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग, शेतमालाच्या किफायतशीर किंमती ह्याकडे एकात्मिक विकास कार्यक्रम म्हणून लक्ष दिले नाही. पर्यायाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून आल्यात. कृषी विकासातील असमतोल व विदर्भात ग्रामीण दारिद्र्य दिसून येते.

✻ महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच मुंबई-ठाणे-पुणे-नाशिक ह्या प्रदेशात औद्योगिक उत्पादन, संपत्ती निर्मिती व सामाजिक विकास ह्यांचे केंद्रीकरण झाले आहे. परंतु विदर्भातील औद्योगिक क्षेत्राचा पर्यायाने एमआयडीसीचा विकास योग्य प्रमाणात झाला नाही.

✻ विदर्भातील शेतीमध्ये उत्पादन खर्च व उत्पन्न यामध्ये जास्त तफावता असल्याचे दिसून येते. उदा. कापूस, धान व सोयाबीन इत्यादी पिके.

✻ विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात कृषीपंपाचा अनुशेष आहे. राज्य कृषी पंपाची सरासरी ही प्रतिहजार हेक्टर २४८.६४ आहे. त्या तुलनेत अमरावती विभागात ३७ टक्के तर नागपूर विभागात २१ टक्के अनुशेष असल्याचे दिसून येते. राज्यातील इतर भागाच्या तुलनेत कोकण वगळता कृषीपंपाचा वीज वापर विदर्भात कमी आहे.

✻ विदर्भात अतिरिक्त वीज निर्माण होत असतांना भारनियमन मात्र विदर्भात दिसून येते तर नवीन वीज प्रकल्प विदर्भातच निर्माण करून सुपीक जमीन नापिक करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यातून प्रदूषणाचा भार विदर्भातील जनतेला सहन करावा लागत आहे.

✻ विदर्भातील खनिज संपत्ती (कोळसा, मॅगनीज, चुनखडी) व वनसंपत्ती कच्च्या मालाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात निर्यात केली गेली यातून ती पुढे नामशेष होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

✻ पश्चिम विदर्भ कापसासाठी तर पूर्व विदर्भ धानासाठी प्रसिद्ध आहे. आणि आता सोयाबीनचे पीक दोन्ही भागात आहे. परंतु दुर्दैवाने यावर प्रक्रिया उद्योग मात्र अद्याप निर्माण झाले नाही. पर्यायाने रोजगार निर्मिती दिसून येत नाही. विदर्भ ही कापूस पिकाची जननी आहे.

✻ पश्चिम महाराष्ट्रात शेतीचे एकरी उत्पादन वाढविण्यासाठी ऊसच नव्हे तर सीताफळ, बोर, डाळिंब, द्राक्षे, या फळासंदर्भात संशोधन व प्रक्रिया करून परदेशात निर्यात केली जाते. परंतु संत्र्याच्या उत्पादनात कॅलिफोर्निया ठरलेल्या नागपुरात प्रक्रिया उद्योग उभा राहू शकत नाही हे एक दुर्दैवच म्हणावे लागेल.

✻ मा. राज्यपालांनी सन २००१ पासून समन्यायी विकासनिधी वाटपासंबंधी निर्देश दिलेत. परंतु २००६-०७ व २०७-०८ या वर्षाचा अपवाद वगळता सन २००२-०३ पासून २०११-१२ पर्यंत विदर्भाचा निधी उर्वरित महाराष्ट्राकडे वळविण्यात आल्याचे दिसून येते. बुलढाणा, वाशिम, अकोला

व अमरावती ह्या जिल्ह्यांसाठी सन २००१-२०१५ ह्या कालावधीत अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना आखण्यात आली होती. परंतु आजपर्यंत जलसंपदा विभागाला या चार जिल्ह्यांचा सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करता आला नाही.

※ सर्वच विकास निकषांमध्ये आणि मानव विकास निर्देशांकामध्ये विदर्भाचा नागपूर जिल्हा वगळता इतर जिल्हे महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या तुलनेत २००२, २०१२ व २०१६ या मानव विकास अहवालात राज्य सरासरीच्या खालीच आहे.

※ रस्ते विकासाच्या बाबतीत सुरूवातीपासूनच इतर प्रदेशाच्या तुलनेने सगळ्यात कमी विकास विदर्भात झाला. विदर्भातील एमआयडीसीचे वाळवंटच झाले आहे. सर्व भूखंडाचे वाटप झालेले असतांना उद्योग धंदे मात्र २०-३० टक्केच आढळून येते. अमरावती विभागात नांदगांव पेठ येथे २० वर्षापूर्वी 'केमिकल झोन' म्हणून तयार होणारा औद्योगिक परिसर आज 'टेक्सटाईल्स झोन' म्हणून जाहीर झाला आहे. याशिवाय नागपूर विभागातील बुटीबोरी औद्योगिक परिसर आणि मिहान प्रकल्प (पंचतारांकित प्रकल्प) आजही पूर्णत्वास आला नाही. ही औद्योगिक क्षेत्राच्या विकासाची शोकांतिका आहे.

※ महाराष्ट्र निर्मितीपासून पश्चिम महाराष्ट्र दुष्काळी आहे आणि विदर्भ हा नियमित पावसाचा आहे. पश्चिम विदर्भात पूर्णा, पैनगंगा, वर्धा या मोठ्या आणि अडाण, नळगंगा, खडकपूर्णा, बेंबळा, काटेपूर्णा, वान, अडणावती, मोर्णा, या नद्या आहेत तर पूर्व विदर्भात वैनगंगा, वर्धा, प्राणहिता, इंद्रायणी, ईरई, कन्हान इत्यादी नद्यांची जलसंपदा आहे. तरी पण विदर्भातील सिंचनाचा वाढता अनुशेष हा विकासाच्या दरीचा निदर्शक आहे. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प अजून पूर्ण झाला नाही. तर महाराष्ट्राची सिंचन क्षमता सरासरी १८ टक्के असतांना विदर्भात ११ टक्के सिंचन क्षेत्र आहे तर पश्चिम विदर्भात केवळ ५ टक्के आहे. पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या मागील अनेक कारणापैकी हेही एक मुख्य कारण आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिल्या भाषणात तत्कालीन मुख्यमंत्री (कै.) यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र सरकार विदर्भाला त्याचा न्याय हिस्सा तर देईलच पण गरज पडल्यास त्यापेक्षा जास्त सुद्धा निधी देईल असे म्हटले होते. परंतु अद्यापपावेतो ते शक्य झाल्याचे दिसून येत नाही. भरपूर पाणी असलेल्या विदर्भातील गोड्या पाण्याची जी मासेमोरी चालते तिला कोलकत्याच्या बाजारात सर्वात जास्त मागणी आहे. विदर्भातील कापूस हा अमेरिकेतील कापसाच्या दर्जाचा आहे. विदर्भातील संत्रा देशातील इतर प्रदेशाच्या संत्र्यापेक्षा चवदार व दर्जेदार आहे. अमरावती (मेळघाट) व चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील सागवान लाकूड जगामध्ये अत्युच्च दर्जाचे आहे. विदर्भात मेळघाट व्याघ्र प्रकल्प, पेंच टायगर रिझर्व्ह, टिपेश्वर अभयारण्य आहेत. विदर्भाचे पंढरपूर धापेवाडा, रूख्मिणीचे माहेर कौंडण्यपूर, विदर्भाची काशी मार्कडा, पाच नद्यांचा संगम आंभोरा, विदर्भाची पंढरी शेगाव, ड्रॅगन पॅलेस टेम्पल कामठी, कुवारा भिवसेन, ताजावाद, कोराडी देवी, दीक्षाभूमी, रामटेक, केळझर, कळंब इत्यादी धार्मिक स्थळे, खिंडसी, अजाब बंगला, झिरोमाईल, सिंदखेडराजा, राष्ट्रमाता माँ जिजाऊचे माहेर, जगप्रसिद्ध लोणार सरोवर, नवेगांव बांध राष्ट्रीय उद्यान, थंड हवेचे ठिकाण चिखलदरा, महात्मा गांधीजी कर्मभूमी सेवाग्राम, विनोबा भावेची कर्मभूमी पवनार,

पवनी किल्ला, मैलगड, भैरवगड, आमनेर किल्लार, गाविलगड, वनदुर्ग, भिवगड, नगरटानकिल्ला, मांदक किल्ला, बल्लारपूर किल्ला, माणिकगढ, अंबागढ, सानगड, कचारगड, वैरागड, टिपागड, सुरजागड, इत्यादी गिरीदुर्ग व स्थलदुर्ग किल्ले आहेत. ही विदर्भाची पर्यटन आणि सांस्कृतिक आर्थिक बलस्थाने आहेत.

त्यामुळे विदर्भ राज्य हे स्वतंत्र असावे अशी मागणी जोर धरत आहे. कारण सातपुडा पर्वताच्या दक्षिणेला असलेला हा प्रदेश सुपीक जमिनीचा, विपुल खनिज संपदेचा, समृद्ध वीज निर्माता, महाराष्ट्रातील तलावाचा प्रदेश असणारा वैभवशाली प्रदेश असून विदर्भामध्ये स्वतंत्र राज्य म्हणून आर्थिकदृष्ट्या सक्षमतेची संभाव्य शक्ती मोठ्या प्रमाणात असल्याचे स्पष्ट होते. नव्हेतर विदर्भाच्या बलस्थानाच्या आधारावर ते आर्थिक संपन्न राज्य होऊ शकेल. विदर्भ राज्य स्वतंत्र झाल्यास साहजिकच विदर्भाची राजधानी नागपूरच राहील. आज नागपर शहरामध्ये राजधानी करिता आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तयार आहेत. ऑक्सफोर्ड इकॉनोमिक्सच्या अहवालानुसार २०१९ ते २०३५ या काळात जीडीपी विकास दराची तुलना करता जगातील पहिल्या २० शहरामध्ये १७ शहरे भारतातील राहतील यामध्ये नागपूर पाचव्या स्थानावर राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण होणे ही वैदर्भीय जनतेसाठी संधी आहे.

**स्वतंत्र विदर्भा समोरील संभाव्य आव्हाने :**

स्वतंत्र विदर्भ राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम राहणारच आहेत. विदर्भाची आर्थिक बलस्थाने फार मजबूत आहेत. दुर्देवाने या बलस्थानाचा विकासाच्या दृष्टीने वापर केला गेला नाही ही शोकांतिका आहे. वनसंपदा मुबलक असतांना पशुधन मात्र कमी आहे. पर्यायाने विदर्भात दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्यव्यवसाय विकसित न झाल्यामुळे शेतीला पूरक ठरू शकला नाही तर विदर्भातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून आल्यात हा महाराष्ट्रातील आंतर विषमतेचा परिपाक होय. यातूनच विदर्भाच्या अनुशेष वाढीचे दुष्टचक्र तयार झाले आहेत. म्हणून वेगळे विदर्भ राज्य निर्माण झाल्यानंतर त्यासमोरील आव्हाने साधारणत: पुढीलप्रमाणे राहू शकतात.

१) सिंचन सुविधा वाढविण्याचे आव्हान – संपूर्ण विदर्भात केवळ ११ टक्के सिंचन सुविधा असून महाराष्ट्रात सरासरी १७.९ टक्के तर संपूर्ण देशात ४३ टक्के सिंचन सुविधा आहेत आणि पश्चिम विदर्भात केवळ ५ टक्के सिंचन सुविधा आहे. विदर्भात एकही मोठा प्रकल्प पूर्णत्वास आलेला नाही. सिंचनाच्या सोईंचा विकास करणे एक आव्हान आहे.

२) औद्योगिक विकासाचे आव्हान – मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद प्रमाणे विदर्भात औद्योगिक विकास झालेला नाही. विदर्भ स्वतंत्र झाल्यानंतर खनिजे, शेतमाल आणि वनसंपदाच्या आधारावर उद्योगधंदे ह्यामध्ये वाढ करण्याचे आव्हाने राहील.

३) महसूल वाढीचे आव्हान –सध्या महाराष्ट्राच्या महसुलात मुंबईचा वाटा जास्त आहे तर त्या तुलनेत विदर्भाचा वाटा अत्यंत कमी आहे. राज्य स्वतंत्र झाल्यावर महसूल वाढविण्याचे आव्हान विदर्भासमोर राहणार आहे.

४) प्रशासकीय खर्च वाढीचे आव्हान – विदर्भ

स्वतंत्र झाल्याबरोबर राजधानीच्या ठिकाणी मंत्रालय, मंत्र्याचे बंगले, प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने, नवीन जिल्ह्याची व तालुक्याची निर्मिती करून त्याठिकाणी सर्व सुविधा निर्माण करणे तसेच नव्याने अनेक अधिकारी व कर्मचारी यांची भरती करावी लागेल. यासाठी येणारा खर्च कसा करावा हे आव्हान राहील.

५) बेरोजगार तरूणांना रोजगार पुरविण्याचे आव्हान - विदर्भात आर्थिक व औद्योगिक विकासाअभावी प्रचंड बेरोजगारी आहे. या बेरोजगार तरूणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विदर्भासमोर मोठे आव्हान आहे. याकरिता शेतमालावर प्रक्रिया उद्योग, विजेच्या वापरावर उद्योगधंदे निर्माण करण्याचे आव्हान आहे.

६) शेतकरी आत्महत्या थांबविण्याचे आव्हान - विदर्भ प्रामुख्याने कोरडवाहू प्रदेश असल्याने तसेच बहुतेक शेतकरी सीमांत शेती करणारे असल्याने या भागात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. विशेषत: कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. विदर्भ स्वतंत्र झाल्यानंतर शेतकरी आत्महत्या रोखण्याकरिता प्रभावी उपाय योजण्याचे आव्हान राहणार आहे.

७) कुपोषण निर्मूलनाचे आव्हान - विदर्भात, अमरावती, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यामध्ये मोठ्या संख्येने आदिवासींचे वास्तव्य आहे. याच जिल्ह्यामध्ये कुपोषणाची गंभीर समस्या आहे. ही समस्या दूर करण्याचे एक प्रमुख आव्हान स्वतंत्र विदर्भासमोर राहील.

८) विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रात कटुता वाढेल - आज ज्याप्रमाणे आंध्रप्रदेशातून तेलंगणा राज्याची निर्मिती झाल्यामुळे आंधप्रदेश व तेलंगणा राज्यात कटुता वाढली आहे. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्रातून विदर्भ स्वतंत्र झाल्यास विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र या दोन प्रदेशामध्ये कटुता निर्माण होईल आणि प्रादेशिक अस्मितेचा वाद निर्माण होईल. परंतु काळाच्या ओघात यासर्व गोष्टी सुरळीत होतात.

ही सर्व आव्हाने आज वाटत असली तरी उपरोक्त खर्च वाढीच्या आर्थिक आव्हानांना पेलण्यात केंद्राकडून नवीन राज्य बनवितांना मिळणाऱ्या विशेष निधीची बऱ्याच प्रमाणात मदत होऊ शकते.

**संदर्भ :**

१) खांदेवाले श्रीनिवास : विदर्भ राज्य संकल्पना, विद्या बुक्स, नागपूर.
२) खांदेवाले श्रीनिवास : संकल्पीत विदर्भ राज्याचे आर्थिक आधार, विदर्भ राज्य आंदोलन समिती, नागपूर.
३) देशमुख बी.टी., केळकरी कारस्थान विशेषांक, नुटा बुलेटिन.
४) विदर्भ विकास मंडळ, नागपूर, वार्षिक अहवाल २०१६-१७.
५) लोकराज्य, डिसेंबर २०१३ (विदर्भ विकास) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई- ३२.
६) दैनिक लोकसत्ता, नागपूर, रौप्य महोत्सव विशेषांक, २०१७.

◆◆◆

# गन्नर मिर्दल यांचे Economic Theory and Under-Developed Regions

**मुक्ता जहागिरदार**
माजी अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनात दि. ३ फेब्रुवारी २०१९ रोजी डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी दिलेल्या 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' या मालिकेतील व्याख्यानाचा सारांश.)**

**प्रस्तावना :**

गन्नर मिर्दल हे सुप्रसिद्ध स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ होते. स्टॉकहोम विद्यापीठात प्रोफेसर ते पार्लमेंट सदस्य, वाणिज्य मंत्री, संयुक्त राष्ट्रसंघाचे युरोपसाठीच्या आर्थिक समितीचे जनरल सेक्रेटरीपर्यंत विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी पार पाडल्या. १९७४ मध्ये वॉन हायेकसह त्यांना अर्थशास्त्रातील सर्वोच्च असा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. आर्थिक प्रक्रियेचे समष्टी विश्लेषण प्रावैगिक स्वरूपाचे असावे यावर त्यांनी भर दिला. आर्थिक अध्ययनात अर्थव्यवस्थेची संस्थात्मक चौकट विचारात घेणे गरजेचे असल्याचे त्यांचे प्रतिपादन होते. 'Asian Drama' हा त्यांचा अत्यंत गाजलेला ग्रंथ. विकसनशील देशांच्या विकासासंबंधी त्यांचे विवेचन मूलगामी स्वरूपाचे आहे. "Economic Theory and Under-Developed Regions' हा त्यांचा या प्रकारचाच एक ग्रंथ. सिद्धांत वास्तवाशी जुळणारे असले पाहिजेत हा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्या दृष्टीने देशान्तर्गत व आन्तर्राष्ट्रीय पातळीवर असलेली विकासातील असमानता व तिच्या परावर्तनाची मीमांसा त्यांनी या पुस्तकात केलेली आहे.

संपत्तीची निर्मिती व सातत्याचे उद्दिष्ट गाठण्यात अनेक देशांनी यश मिळवले. तथापि जगातील अनेक देश व लोकसंख्येचा मोठा हिस्सा त्यापासून वंचित राहिला. विकसित देशातही काही प्रदेश अविकसित राहिले. अर्थात विकासात विषमता वा असमानतेची समस्या निर्माण झाली. समाजात वेळोवेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे विश्लेषण, कारणमीमांसा, उपाययोजनांचा विचार केला जातो. समाजातील प्रश्नांचा विचार करण्याचे, ते सोडवण्याचे प्रयोजन असणारी सामाजिक शास्त्रे आहेत. ते त्यांचे दायित्व आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील प्रश्नांमध्ये विकासातील विषमता व त्यातील वाढ हा महत्त्वाचा प्रश्न होता. मात्र जगातील अनेक देश अविकसित आणि जगातील बहुसंख्या लोक गरीब देशात असूनही आर्थिक सिद्धांतात त्यांचा विचार व सैद्धांतिक घडण होऊ नये ही स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ गन्नर मिर्दल यांची खंत होती. निग्रोंच्या विकासाच्या प्रश्नाच्या अभ्यासातून प्रारंभित या क्षेत्रातील मिर्दल यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे, मूलगामी स्वरूपाचे आहे.

**विषमतेचे वास्तव :**

इजिप्तच्या नॅशनल बँकेच्या निमंत्रणावरून १९५५ मध्ये त्यांनी कैरो येथे वार्षिक महोत्सवी व्याख्यानमाला गुंफली. त्याची सुधारित आवृत्ती १९५६ मध्ये Economic Theory and Under-

Developed Regions या पुस्तकरूपात प्रकाशित झाली. विषमता का, कशी अस्तित्वात येते, वाढण्याकडे तिची प्रवृत्ती का असते या प्रश्नाची चर्चा या पुस्तकात आहे. महत्त्वाची बाब म्हणजे विषमतेची निर्मिती व वृद्धीची प्रवृत्ती कशी परावर्तित करता येईल याचे त्यात विवेचन आहे. मिर्दलला त्या काळी महत्त्वाच्या वाटलेल्या 'विकासातील असमानता' या प्रश्नाने आजकाल पुन्हा विराट स्वरूप धारण केले आणि विषमता वृद्धीच्या प्रक्रियेने वेग घेतलेला दिसतो. या दृष्टीने त्यांचे विवेचन अभ्यसनीय आहे. विषमतेची निर्मिती व वाढीच्या प्रश्नाची उकल मिर्दलच्या प्रतिपादनानुसार कार्यकारणभावाच्या अध्ययनाचा प्रांत आहे. तर विषमतेच्या प्रवृत्ती कशा परावर्तित करता येतील हा साध्य साधन विचार असतो. आपल्या साध्यासाठी कोणती साधने, कोणत्या स्वरूपात उपयोगी पडू शकतील याचा विचार करावा लागेल. मिर्दलने म्हटल्या प्रमाणे 'सर्वसाधारणपणे सर्वच समाजशास्त्रांप्रमाणे अर्थशास्त्रातही जुने विचार क्वचितच संपूर्णपणे टाकून देण्यात येतात आणि कोणतेच विचार संपूर्णपणे नवीन व स्वयंकल्पित नसतात.' त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या नव्या दृष्टिकोनाबरोबरच विषमतेची समस्या सोडवण्यासाठी साधनांच्या विचारात जुनी व्यवस्था व कार्यतंत्राच्या मर्यादा तसेच, त्यांच्या उपयोग व वापरासाठी उपयुक्त सुधारणा व बदलासंबंधी महत्त्वपूर्ण विवेचनही मिर्दल करतात.

वेगाने विकास होत असलेले देश आणि प्रदेश जगात आहेत. तसेच विकासाबाबत आन्तर्राष्ट्रीय आणि प्रादेशिक विषमता दिसून येते. या संदर्भात एक महत्त्वाची बाब म्हणजे महान जागृतीच्या काळात विषमतेबाबत वाढती जागृती होऊन विकासातील माघारलेपणाला ते देश सर्वस्वी जबाबदार नाहीत याची जाणीव झालेली आहे. ज्या संपन्न देशांच्या धोरणामुळे किंवा ज्या जागतिक व्यवस्थेमुळे ते विकासात मागे पडले त्या व्यवस्थेला ते दोष देतात आणि स्वातंत्र्य व विकासाच्या संधीची इच्छा धरतात व मागणी करतात. तसेच या देशांसाठी 'मागासलेले देश' याऐवजी अर्धविकसित देश या संज्ञेचा वापर म्हणजे सर्व देशांचा आर्थिक विकास व्हावा हे सार्वजनिक धोरणाचे ध्येय असावे आणि जीवनाच्या सगळ्या चांगल्या गोष्टीत वाटा व समान संधी मिळण्याचा हक्क मागणे योग्य आहे अशी त्यात असलेली कबुली मिर्दलच्या मते वैचारिक पुनर्रचना आहे.

**संचयी चक्राकार कार्यकारणभावाची मिर्दलकृत परिष्कृत द्विमार्गी प्रक्रिया :**

विकासाबाबत देशान्तर्गत प्रादेशिक विषमता असो की आन्तर्राष्ट्रीय विषमता, त्या मूलतः भिन्न स्वरूपाच्या नसतात त्यामुळे एक सामान्य नियम व कार्यतंत्राद्वारे त्यांचे स्पष्टीकरण करता येते. दारिद्र्य व विकासातील माघारलेपणाच्या कारणमीमांसेत अनेक अभ्यासकांनी दुष्टचक्राची कल्पना मांडली आहे. नर्कसेचे दारिद्र्याचे दुष्टचक्र परिचित आहे, विन्स्लो दारिद्र्य आणि आजारपणाच्या दुष्टचक्राचे विवेचन करतात, मिर्दल गोऱ्यांचा पूर्वग्रह आणि निग्रोंचे निम्न जीवनमानाचे दुष्टचक्र निर्देशित करतात.

निग्रोंच्या विकासाच्या प्रश्नाचा अभ्यास करतांना सामाजिक प्रश्नात परस्परांशी कार्यकारणभावाने जोडलेल्या चक्राकार व संचयी बदलांची गुंतागुंत असते हा गाभा त्यांना सापडला आणि तेच त्यांचे मुख्य प्रमेय बनले.

दुष्टचक्रात परस्परांवर परिणाम करणाऱ्या

वा क्रिया प्रक्रिया करणाऱ्या घटकांची चक्राकार फेरी विचाराधीन असते. त्यात एक अभावात्मक घटक दुसऱ्या अभावात्मक घटकाचे कारण आणि परिणाम दोन्ही एकाच वेळी असतो. दुष्टचक्रातील चक्राकार परस्पर कार्यकारणभावामुळे प्रक्रिया संचयी स्वरूपाची बनते आणि प्रश्नांची पातळी अधिकाधिक खालावत जाते. विकासातील असमानतेची निर्मिती, वाढ आणि त्याचबरोबर तिचे परावर्तन या सगळ्याच्या स्पष्टीकरणासाठी चक्राकार संचयी कार्यकारणभावाचे तत्त्व उपयुक्त असल्याचे मिर्दलचे प्रतिपादन आहे. त्या संदर्भात आर्थिक प्रक्रियेसंबंधातील काही परंपरागत कल्पनांचा मिर्दल निरास करतात, काहींची भर घालतात, काही वैशिष्ट्ये अधोरेखित करतात आणि संचयी कार्यकारणभावाच्या प्रक्रियेच्या मांडणीतून विकास व विषमतेसंबंधी सामान्य नियमाची मांडणी करतात.

चक्राकार संचयी कार्यकारणभावाच्या तत्त्वाची पुनर्मांडणी करताना ज्या परंपरागत कल्पनांचा मिर्दल निरास करतात त्यात स्थिर समतोलाची कल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. स्थिर समतोलाच्या कल्पनेनुसार एखादा बदल झाला तर त्याला प्रतिक्रिया स्वरूप प्राथमिक बदलाच्या विरूद्ध बदल होऊन पूर्वस्थितीकडे जाण्याची प्रवृत्ती म्हणजे व्यवस्थेत स्थिर समतोलाची प्रवृत्ती असते. मिर्दलच्या प्रतिपादनानुसार प्राथमिक बदलाच्या विरूद्ध नाही तर त्याला सहाय्यकारी बदल घडून येतात आणि संचयी कार्यकारणभावामुळे प्रक्रिया प्राथमिक बदलाच्या दिशेने पुष्कळच पुढे जाऊन अंतिम फलनिष्पत्ती मोठी असते. दुष्टचक्रात त्यामुळेच अर्थव्यवस्था अधिकाधिक दुरावस्थेत जाते.

चक्राकार संचयी कार्यकारणभावाची प्रक्रिया अधोगामी तसेच ऊर्ध्वगामी अशी दोन्ही दिशांनी कार्यान्वित होते हे मिर्दलचे महत्त्वाचे प्रमेय आहे. विकासातील असमानतेचे परावर्तन त्यामुळेच होऊ शकते. दुष्टचक्र अधोगामी प्रक्रियेचे वाचक आहे. मात्र जाणीवपूर्वक सुधारणात्मक बदल घडवून आणले तर उर्ध्वगामी प्रक्रिया सुरू होऊन सुष्टचक्र अस्तित्वात येते. एक सुधारणात्मक बदल दुसऱ्या घटकात सुधारणात्मक बदल घडवून आणते आणि संचयी प्रक्रियेमुळे विकास वेगवान होऊन विकासातील विषमतेचे परावर्तन होते.

चक्रीय प्रक्रियेतील विचाराधीन घटक परस्पर कार्यकारण भावात्मक असले तरी त्या घटकांचे अन्तर्गत व बाह्य शक्तींच्या प्रभावाने प्रभावित होण्याचे व इतर घटकांना प्रभावित करण्याचे सापेक्ष सामर्थ्य भिन्न असते. त्याच प्रमाणे काही घटकांचे परिणाम लवकर तर काहीं उशीरा होतात. काही परिणाम अल्पकाळ तर काही दीर्घकाळ टिकतात. भिन्न घटकांचे इतर घटकांना प्रभावित करण्याचे सामर्थ्य व भिन्न कालमानावर पसरणारे परिणाम लक्षात घेऊन योग्य घटकांची निवड महत्त्वाची असते.

अर्थशास्त्राच्या तत्कालीन प्रचलित पद्धतीप्रमाणे विचाराधीन घटकांची आर्थिक व आर्थिकेतर घटक ही विभागणी, तसेच आर्थिक घटकांचा विचार करून आर्थिकतेतर घटक स्थिर मानणे ही बाब मिर्दलला मान्य नाही. त्यामुळे मिर्दलच्या चक्रीय प्रक्रियेतील घटक संमिश्र स्वरूपाचे असतात. मिर्दलच्या निग्रोंच्या निम्न जीवनमानाच्या विश्लेषणात विचाराधीन घटकांवरून त्याची कल्पना येते. निग्रोंच्या निम्न जीवनमानात त्यांच्या कमी उत्पन्नाबरोबरच त्यांच्या नोकरीचे स्वरूप, पेहराव, शिक्षण, आरोग्य, विश्वासूपणा, कायदेपालन, व्यापक

समाजनिष्ठा या प्रकारच्या घटकांची ही अंतर्भाव असतो.

मिर्दलच्या मते विकासातील असमानतेसारखी विशिष्ट समस्या कधीही केवळ आर्थिक, मानसिक, राजकीय अशा स्वरूपाची नसून ती सामाजिक समस्या असते. सामाजिक प्रश्नांचा अभ्यास आर्थिकतेर घटक या वर्गवारीखाली आर्थिक विश्लेषणातून वगळल्या गेलेल्या घटकांशी निगडित असतो. मिर्दल त्यामुळेच सामाजिक प्रश्न, सामाजिक यंत्रणा, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक संबंध, सामाजिक लाभ या प्रकारच्या संज्ञेत विचार व विवेचन करतात.

विकासातील असमानता व तिचे परावर्तनाच्या संदर्भात वरील वैशिष्ट्यांच्या पार्श्वभूमीवर मिर्दलच्या विवेचनाचा परामर्ष घ्यावा लागेल.

**विकासातील असमानतेची कारके :**

विकासातील असमातनेचा विचार करताना मिर्दल प्रथम देशांतर्गत प्रादेशिक विषमतेची कारणमीमांसा करतात. या संदर्भात काही महत्त्वाच्या कारकांचे विवेचन करताना विवेचनात बाजारधिष्ठित अर्थव्यवस्था गृहीत धरतात, संचयी कार्यकारणभावाचे तत्त्व अधिष्ठानभूत मानतात, आणि व्यापार, भांडवलाचे स्थानांतरण व श्रमाचे स्थलांतरण संचयी प्रक्रियांच्या उत्क्रांतीची माध्यमे असल्याचे निर्देशित करतात. विकासातील असमानतेच्या संदर्भात मुख्यत्वे विकासावर प्रतिकूल परिणाम करणारी एखादी मोठी घटना, विकासाचे प्रत्याघाती परिणाम, बाजारशक्तींच्या अधीन विकासप्रक्रिया आणि आर्थिकेतर घटकांचा प्रभाव या कारकांचे विवेचन करतात.

ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर विकासाची रचना आर्थिक भूगोलावर अवलंबून होती. अर्थात नैसर्गिक घटक निर्णायक होते. कच्चा माल उपलब्ध असेल तेथे कारखान्यांचा विकास, बंदराजवळ व्यापारी केंद्रे विकसित होते. या प्रकारचे विकासानुकूल घटक उपलब्ध नसतील ते प्रदेश विकासात मागे राहून असमानता निर्माण होत होती. नंतरच्या काळात मात्र एखाद्या ठिकाणी विकासाचे प्रयत्न आधी सुरू झाले व यशस्वी झाले, इतरत्र ते सुरू झाले नाहीत म्हणून विकासात असमानता निर्माण झाली.

विकासावर प्रतिकूल परिणाम करणारी एखादी महत्त्वाची घटना घडली तर परस्पर कार्यकारणभावाच्या तत्त्वामुळे पुढील घटकांवर प्रतिकूल परिणाम होतो आणि संचयी प्रक्रियेमुळे विकासातील माघारलेपणा वाढून विकासात असमानता वाढते. उदाहरणार्थ एखाद्या कारखान्याला अकस्मात आग लागली तर कारखान्याचे आर्थिक व्यवहार बंद होतील – त्या कारखान्याला सुविधा पुरवणाऱ्या उद्योगांवर प्रतिकूल परिणाम – बेरोजगारी – उत्पन्न व मागणीत घट–व्यापारावर प्रतिकूल परिणाम–उत्पादनकार्य सुरू करण्यासाठी येऊ इच्छिणाऱ्यांवर प्रतिकूल परिणाम – कदाचित तेथील उत्पादनाचे पर्यायाने भांडवलाचे स्थानांतरण–रोजगाराअभावी श्रमिकांचे स्थलांतरण होईल. उत्पादन कार्यावरील अशा प्रतिकूल परिणामामुळे शासनाच्या महसुलात घट म्हणून तेथील सुविधांवर खर्च कमी होऊन प्रतिकूल परिणाम त्यामुळे विकासात अधिकाधिक मागे पडून असमानता वाढत जाईल.

विकासातील असमानतेच्या संदर्भातील दुसरा पैलू म्हणजे प्रत्याघाती परिणाम एका ठिकाणच्या

विकासाचे आजूबाजूच्या प्रदेशाच्या विकासावर होणारे प्रतिकूल परिणाम म्हणजे प्रत्याघाती परिणाम. विकासात औद्योगिकरण हा एका महत्त्वाचा घटक आहे. उद्योगांबरोबर व्यापार, गुंतवणूक वाढ व इतर सुविधांचाही विकास होतो. त्यांच्या अभावी मागास भाग कृषी प्रधान असतो. कमी उत्पन्न, बचत व गुंतवणूक म्हणून कृषीची उत्पादकताही कमी असते. विकसित भागात गुंतवणूक सुरक्षित व लाभप्रद म्हणून मागास भागातील अल्प प्रमाणात असलेले भांडवलही विकसित भागात आकर्षिले जाईल. तेथील लहान सहन उद्योगही भांडवलाचा अभाव व स्पर्धेत टिकू न शकल्याचे खुरटून जातील. शेतीत गुंतवणूकीसाठी भांडवलाची कमतरता वाढून तिची उत्पादकता आणखी घटेल. रोजगार संधीच्या प्रतिकूलतेमुळे श्रमिकांचे विकसित भागात स्थलांतरण होऊन लोकसंख्येची रचनाही उत्पादनकार्यांना प्रतिकूल होईल. अशा प्रकारच्या प्रत्याघाती परिणामांमुळे विकासातील असमानता वाढत जाईल.

विकासातील असमानतेला बाजारशक्तीही कारणीभूत असतात. बाजार शक्तींच्या अधीन प्रक्रियेत सरासरीपेक्षा जास्त नफा असणाऱ्या विभागातच विकास केंद्रित होतो. विकसित विभागातच अशी अनुकूलता असल्यामुळे तेथे अधिकाधिक विकास होतो आणि इतर विभाग मागासलेले राहतात. केवळ आर्थिक व्यवहारच नाही तर शिक्षण, शास्त्र, कला, साहित्य इ. चा विकासही तेथे केंद्रित होतो. अनियंत्रित बाजार शक्तींच्या क्रिया प्रतिक्रियांनी विषमता वाढत जाते.

मिर्दलच्या प्रतिपादनानुसार वरील विवेचनात अर्थशास्त्रात विचाराधीन असलेल्या, फक्त बाजार क्रिया प्रतिक्रियांचा विचार झाला. प्रत्यक्षात आर्थिक विश्लेषणात नोंद न घेतली जाणारे आर्थिकेत्तर घटकही विकासातील असमानतेला कारणीभूत असतात. उदा. सार्वजनिक उपयोगिता सुविधांचा अभाव, कमी बुद्धिवाद, नव्या उद्योजकतेच्या चैतन्याचा अभाव, राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव, समाजाच्या प्रयोगशील व महत्त्वाकांक्षी ध्येयाबद्दल अज्ञान व कमी संवेदनशीलता इ. आर्थिक विश्लेषणात अनुपस्थित असलेले हे घटक आर्थिक बदलांच्या संचयी कार्यकारणभावातील महत्त्वाची माध्यमे असतात. त्यांच्या उपेक्षेमुळे अर्धविकसितपणाच्या मीमांसेत आणि विकासाच्या सिद्धांतात अपूर्णता निर्माण झाली.

**विकासात प्रादेशिक समताप्राप्त देशांच्या यशाचे विश्लेषण :**

विकासातील प्रादेशिक विषमतेच्या निर्मिती संबंधीच्या विवेचनानंतर मिर्दल प्रत्यक्षातील परिस्थितीचे विश्लेषण करतात. या संबंधात संयुक्त राष्ट्रसंघाला (UNO) अनुभवनिष्ठ पाहणीत आढळून आलेल्या व्यापक अन्योन्यसंबंधानुसार पश्चिम युरोपीय देशात प्रदेशाप्रदेशातील उत्पन्न विषमता श्रीमंत देशांपेक्षा गरीब देशात जास्त होती. समृद्ध देशात प्रादेशिक विषमतेत घटक तर गरीब देशात प्रादेशिक विषमतेत वाढ होत होती. समान संधीच्या दिशेने वाटचाल हे समृद्ध देशांचे वैशिष्ट्य आहे. श्रीमंत विकसित देशात प्रादेशिक विषमतेत झालेल्या घटीचे व्यापक दृष्टिकोनातून मिर्दलने केलेले विश्लेषण लक्षणीय आहे. सिद्धांत वास्तवाच्या कसोटीवर उतरले पाहिजे हे मिर्दलचे प्रतिपादन आहे. वरील वास्तवाच्या पडताळणीतून ते चक्राकार संचयी कार्यकारण–भावाच्या बहुआयामी उर्ध्वगामी प्रक्रियेची सिद्धता करतात. अनेकविध प्रकारचे घटक परस्पर कार्यकारणभावाने संबद्ध असतात. त्यामुळे

विकासाची प्रक्रिया ही संचयी सामाजिक प्रक्रिया असते या त्यांच्या प्रमेयाची त्यातून पुष्टी होते.

विकासातील विषमता कमी असणे, समान संधीकडील वाटचाल व विकासातील समानतेसाठी कारणीभूत मिर्दलच्या विश्लेषणातून प्राप्त घटकांचा विचार करू.

लोकशाही राज्यव्यवस्थेनुरूप समाजाची मूल्ये, ध्येय यांना अनुरूप मानसिक घडण समान विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. सर्व व्यक्तींची समानता लोकशाही राज्यव्यवस्थेचे अधिष्ठानभूत मूल्य आहे. परिपूर्ण लोकशाहीकडे जाण्याच्या ध्येयाने प्रेरित या देशांमध्ये बुद्धिनिष्ठ हेतूंना महत्त्व प्राप्त होईल अशी व्यक्ती व समाजाची मानसिक घडण घडवून आणली गेली. प्रादेशिक समानतेसाठी शासकीय धोरण राबवले गेले. आर्थिक प्रगती, उच्च उत्पन्न पातळीमुळे बुद्धिनिष्ठ औदार्याच्या धोरणाला बळ प्राप्त झाले. विकासात मागे असलेल्या प्रदेशांच्या विकासासाठी सवलती सोडणे, खर्चभार सहन करण्याची लोकांची तयारी झाली. अशा प्रकारे राष्ट्रीय एकात्मता साध्य केलेल्या या देशांमध्ये समान संधीच्या दिशेने वाटचाल होऊ शकली.

विकासाच्या उच्च पातळीवर सामान्यत: विकासाचे प्रसारित परिणाम प्रभावी असतात. एका विभागातील विकास इतर विभागातील विकास प्रोत्साहित करतो. बुद्धिनिष्ठ हेतूंना महत्त्व व उच्च उत्पन्न पातळीमुळे मागास विभागासाठी त्यागाच्या तयारीबरोबरच भरीव त्यागाचे सामर्थ्यही जनतेत निर्माण होते. परिणामत: समतानिष्ठ धोरणांच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असलेली विपुल आर्थिक साधनसामग्री शासनाला प्राप्त होऊन कल्याणकारी राज्य अस्तित्वात येते.

विकासातील समानतेसाठी विषमतावर्धक बाजारशक्तींचे नियंत्रण करण्याच्या गरजेची जाणीव व त्यासाठी राज्यहस्तक्षेपाचा प्रभावी व्यापार अपरिहार्य आहे. सरासरी नफा जास्त असलेल्या विभागातच विकास केंद्रित होण्याची बाजार व्यवस्थेची प्रवृत्ती असते. तिचे नियंत्रण, प्रत्याघाती परिणामांना प्रतिरोध व प्रसारित वा विस्तारक परिणामांची पुष्टी करावी लागते. राज्य हस्तक्षेपाद्वारे ते साध्य करून सर्वांच्या हितसंबंधात सुसंवाद घडवून आणला जातो म्हणून तो निर्मित सुसंवाद असतो ही बाब मिर्दल अधोरेखित करतात.

अशा प्रकारे आर्थिक, सामाजिक, मानसिक, राजकीय इ. अनेकविध घटकांच्या परस्पर कार्यकारण भावाने घडून आलेल्या सामाजिक प्रक्रियेमुळे विकासाच्या उच्च पातळीसह विकासातील विषमता कमी असण्याची व त्यातही घट होण्याची प्रवृत्ती अस्तित्वात आली.

**विकासातील आंतर्राष्ट्रीय असमानता घटण्याच्या मर्यादा :**

विकासाबाबत आंतर्राष्ट्रीय पातळीवर असलेली असमानता व ती घटण्याच्या मंद प्रवृत्तीचा आढावा मिर्दल घेतात. वसाहतवाद हे या असमानतेचे नजीकच्या भूतकाळातील एक सबल, अनुभवजन्य कारण आहे. वसाहती देशांच्या अर्थव्यवस्था साम्राज्यवादी देशांच्या विकासाचे साधन म्हणूनच वापरल्या जातात. तेथे सक्तीचा उभयपक्षीवाद अर्थात आयात निर्यात धोरणाबाबत निर्णय स्वातंत्र्याचा अभाव असतो. साम्राज्यवादी देशांना कच्च्या मालाचा पुरवठा करणारे आणि तेथील पक्क्या मालाची विक्री केंद्रे म्हणूनच वसाहतींचा वापर केला जातो. त्यामुळे ते विकासात मागे पडतात. संचयी प्रक्रियेने

विकासातील असमानता वाढत जाते.

वसाहती स्वतंत्र झाल्या तरी संचयी प्रक्रियेमुळे विषमता समाप्त होणे कठीण असते. संचयी प्रक्रियेच्या माध्यमांपैकी श्रमाचे स्थलांतरण आंतर्राष्ट्रीय पातळीवर निष्प्रभावी घटक असला तरी व्यापार व भांडवलाचे स्थानांतरण विशेष प्रभावीपणे कार्यशील असतात. देशांतर्गत प्रादेशिक विषमता ही विषमतावर्धक बाजार प्रक्रियांमधील प्रभावी राज्य हस्तक्षेपामुळे यशस्वीपणे कमी करता येते. परंतु आंतर्राष्ट्रीय बाजार प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप करणे अवघड असते. शिवाय समान संधीसाठी हस्तक्षेप करू शकणाऱ्या जागतिक राज्याच्या अभाव ही वस्तुस्थिती आहे. महत्त्वाची बाब म्हणजे सर्व मानव जातीसाठी समान संधी देण्याचे धोरण आखण्यासाठी मानसिक पाया तयार नाही हे त्याचे खरे कारण आहे.

अनेक आंतर्राष्ट्रीय संस्था आहेत. देशांसाठी आपला असंतोष व्यक्त करणे, मागण्या मांडण्याची ती व्यासपीठे आहेत. मात्र त्यावर विकसित देशांचे वर्चस्व आहे. या संस्था विकसित देशांच्या हिताला अनापायकारक बनविण्यात विकसित देश यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे समान संधीच्या संदर्भात प्रत्यक्ष कार्य फारच मर्यादित आहे. विकसित देशांनी त्यांच्या देशात कल्याणकारी राज्य निर्माण केले. मात्र 'कल्याणकारी राज्य राष्ट्रवादी राज्य असते' या मिर्दलच्या प्रतिपादनाचा प्रत्यय या संदर्भात सुस्पष्टपणे येतो.

वरील सर्व कारणांमुळे आंतर्राष्ट्रीय पातळीवर विकासातील असमानता घटवणे कठीण असते.

**नवस्वतंत्र देशांच्या विकासाचा मार्ग :**

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक वसाहती देशांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या निर्णय स्वातंत्र्य प्राप्त झाले. ते विषमता कमी करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. मिर्दलच्या प्रतिपादनानुसार विकासात मागे असलेल्या देशांनी आंतर्राष्ट्रीय हिताअहिताचा विचार करण्याची गरज नाही. त्यांची धोरणे राष्ट्रवादी, स्वदेशाचा आर्थिक विकास व जगाबरोबर समान संधी प्राप्त करण्याच्या हेतूनेच आखली गेली पाहिजेत. स्वत:च्या आयात निर्यात व्यापाराचे त्यांनी प्रभावी नियंत्रण केले पाहिजे. आंतर्राष्ट्रीय पातळीवर समान संधी प्राप्त करण्याचा प्रश्न मूलत: सत्तेच्या समतोलाच्या निर्मितीचा प्रश्न आहे. नवस्वतंत्र अर्धविकसित देशांची सौदाशक्ती फार कमी आहे. त्यासाठी हक्कविहीन राष्ट्रातील ऐक्याची वाढ गरजेची आहे. परस्पर सहकार्याने त्यांच्या सौदाशक्तीचे सामर्थ्य वाढले तर आंतर्राष्ट्रीय सहकार्याचा खऱ्या अर्थाने विकास होऊन विकासातील असमानता कमी होण्यास मदत होईल.

विकासात माघारलेल्या नवस्वतंत्र देशांनी त्यांना प्राप्त निर्णय स्वातंत्र्याचा उपयोग विकास गतिमान करण्याकरिता करावयाच्या योजनाबद्ध प्रयत्नांच्या संदर्भातील मिर्दलचे विवेचन महत्त्वपूर्ण आहे.

देशासाठी आर्थिक विकासाचे धोरण असावे यावर अर्धविकसित देशांचे एकमत हा मिर्दल सर्वात महत्त्वाचा बदल मानतात. विकासाच्या धोरणात समाजाचे दीर्घकालीन हित विचाराधीन असणे, सामाजिक ध्येयाला आणि सामाजिक लाभाला महत्त्व देणे आणि सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची पातळी उंचावणे म्हणजे आर्थिक विकास हा आशय या बाबी केंद्रस्थानी असल्या पाहिजेत. योजना तयार करणे व तिची कार्यवाही ही शासनाची

जबाबदारी असेल.

विकासाची प्रक्रिया चक्राकार कार्यकारणभावाची व संचयी स्वरूपाची असते हे मिर्दलचे मूलभूत प्रमेय आहे. योजनेची आखणी समाजव्यवस्थेतील त्या प्रक्रियेच्या अभ्यासावर आधारलेली असावी ही स्वाभाविक सूचना आहे. त्यामुळे देशातील आर्थिक विकासाच्या संचयी प्रक्रियेचा आढावा म्हणजे योजना हा आशय त्यांना अभिप्रेत आहे. विकासाची उर्ध्वगामी प्रक्रिया धोरणात्मक उपायांनी जाणीवपूर्वक सुरू करावी लागते. विकासातील असमानता कमी करण्यासाठी प्रसारित परिणामांची पुष्टी करावी लागते. भिन्न प्रदेशातील व क्षेत्रातील विकासाच्या प्रेरणेचे प्रसारित वा विस्तारक परिणाम जाणीवपूर्वक व प्रयत्नपूर्वक समर्थ बनवावे लागतात. या अर्थाने बाजार शक्तींच्या व्यवहारात राज्याने हस्तक्षेप करून सामाजिक यंत्रणेचे नियंत्रण करण्याचा सरकारचा व्यूहात्मक कार्यक्रम म्हणजे योजना असेही मिर्दल म्हणतात.

विकासाच्या योजनाबद्ध प्रयत्नात बाजारयंत्राच्या मर्यादा व महत्त्व दोन्ही लक्षात घेणे गरजेचे आहे. आर्थिक विकाससंबंधातील धोरणात्मक निर्णय राष्ट्रीय विकासाच्या ध्येयाच्या संदर्भात घेतले जातात. या अर्थाने मूळातच ते किंमत पद्धतीच्या कक्षेबाहेरचे असतात मात्र याचा अर्थ अनिर्बंध कार्यक्रमाची शिफारस नाही ही बाब मिर्दल अधोरेखित करतात कारण योजनेचे इष्टांक गाठण्याच्या आर्थिक प्रक्रियेचा मोठा भाग उत्पादन खर्च, नफा, किंमत इ. च्या दरात बदल करून घडवावे लागतात. म्हणूनच बाजार यांत्राद्वारे गुंतागुंतीचे आंतरसंबंध कार्यान्वित होण्याची पद्धत निश्चितपणे, यथार्थपणे व सूक्ष्म बारकाव्यांसह जाणून घेण्याचे कठीण विश्लेषणात्मक कार्य करून वस्तुनिष्ठ निकष प्राप्त करणे आर्थिक नियोजनासाठी आवश्यक असल्याचे मिर्दलचे प्रतिपादन आहे.

विकसित देशांशी स्पर्धा करणे अर्धविकसित देशांना शक्य नसल्यामुळे खुल्या आंतर्राष्ट्रीय व्यापाराद्वारे समान संधीचे तत्त्व खोटे ठरते. या देशांच्या आयात विषयक गरजा मोठ्या, आर्थिक सामर्थ्य कमी, विनिमय संतुलनाची अडचण, स्पर्धाक्षम नसलेल्या पण आवश्यक अशा अनेक गुंतवणुकी या पार्श्वभूमीवर आंतर्राष्ट्रीय व्यापारात संरक्षणाचे धोरण योग्य ठरते. मात्र संरक्षणाचे तत्त्व म्हणजे बाजाराचा विसर वा दुर्लक्ष नाही याचेही स्मरण मिर्दल करून देतात. आयात निर्यात मालाच्या किंमती आंतर्राष्ट्रीय बाजारातील स्थितीने ठरतात. त्यावर देशाचे नियंत्रण नसते. या अर्थाने त्या स्वतंत्र परिवर्तनशील चल आहेत. म्हणून त्या अत्यंत काळजीपूर्वक लक्षात घेतल्या पाहिजेत. तसेच रिकार्डोच्या तुलनात्मक व्ययाचा सिद्धांत कायम स्वीकार्य असतो. मात्र त्यात विकास धोरणामुळे बदलणारा नफा, स्फीती तणाव, विदेशी विनिमयातील अडचणी सारखे घटक समाविष्ट करून तयार होणारा तुलनात्मक व्ययाचा प्रावैगिक सिद्धांतच उपयोगी असतो याकडे मिर्दल लक्ष वेधतात. या सर्व पार्श्वभूमीवर आंतर्राष्ट्रीय व्यापारात हस्तक्षेप न करण्याचा दिला जाणारा सल्ला म्हणजे बहुतेकांच्या बाबतीत आर्थिक विकासाची खटपट करू नका असा होतो हे मिर्दलचे प्रतिपादन महत्त्वपूर्ण आहे.

आर्थिक विकासाचे स्वरूप, प्रक्रिया व विकासाशी संबंधित भिन्न पैलूंची चर्चा करणारे अनेक परंपरागत सिद्धांत आहेत. मात्र त्यांचा उपयोग वा स्वीकार त्यांच्या गुणदोषांच्या विचारासह केला पाहिजे ही मिर्दलची महत्त्वाची सूचना आहे हे

सिद्धांत औद्योगिकदृष्टया विकसित देशात निर्माण झाले ते त्या देशांच्या हितसंबंधाचा युक्तिवाद असल्याची जाणीव ठेवावी लागेल. इतर देशातील अभ्यासक अर्धविकसित देशातील समस्यांची नोंद कदाचित घेतीलही तथापि आपल्या देशातील परिस्थिती, उपलब्ध घटक, त्यांच्यातील परस्परसंबंधाचे आणि क्रिया प्रतिक्रियांचे स्वरूप, त्यांची उद्दिष्टे या सर्व बाबी लक्षात घेऊन अर्धविकसित देशांना लागू पडतील असे सिद्धांत विकसित करण्याची जबाबदारी मुख्यत: अर्धविकसित देशातील तरूण अर्थशास्त्रज्ञांचीच असल्याची सुस्पष्ट जाणीव मिर्दल करून देतात.

**समानतेचे तत्त्व आणि वास्तवातील तफावतीची मीमांसा :**

विकासातील असमानतेच्या वास्तवाचे विविधांगी विश्लेषण मिर्दल यांनी केले मात्र तत्त्व आणि वास्तवातील विसंगतीची मीमांसाही त्यांना महत्त्वाची वाटते. त्या संबंधातील त्यांचे विवेचन उल्लेखनीय आहे. समानता अर्थशास्त्रात अधिष्ठानभूत आणि मान्यताप्राप्त तत्त्व आहे. असे असूनही तत्त्व आणि वास्तवातील तफावत सुस्पष्टपणे जाणवते.

तत्त्व आणि सिद्धांताच्या पातळीवर विचार केला तर निसर्गवादी सिद्धांतनुसार जन्मत: सर्व समान असतात परंतु परिस्थितीनुसार माणूस घडतो. मूलत: समान असल्यामुळे सर्वांना समान हक्क असतात. त्यांच्या कार्यान्वितीसाठी सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे हा अर्थ त्यातून निष्पन्न होतो. उपयोगितावादी महत्तम सामाजिक कल्याणासाठी उपभोग व वितरणातील समानता अधिष्ठानभूत मानतात. समाजवादी विचार तर समानतावादी आहेतच. मिर्दलच्या प्रतिपादनानुसार समतावादी सिद्धांताचे हे भिन्न प्रवाह ज्ञानयुगाच्या काळात एकत्र येऊन पाश्चात्त्य विवेक बुद्धीचा भाग बनले. त्याचप्रमाणे दारिद्र्य हा केवळ अर्धविकसित देशांचा दोष नसून संपन्न देश आणि स्वीकृत आर्थिक व्यवस्थेचाही त्यात वाटा असल्याचा दावा आणि विकासाची संधी त्यांना मिळाली पाहिजे या गरीब देशांच्या मागणीत समानता तत्त्वाचे व त्याच्या मान्यतेचे प्रतिबिंब जाणवते.

वरील सर्व प्रतिपादनातून समानतेचे तत्त्व व त्यातून मानवी प्रतिष्ठेचा व सर्वांना समान संधीचा मूलभूत हक्क असल्याचा ध्येयवाद आविष्कृत झाला. तथापि प्रत्यक्षात सर्व पातळींवर समानता तत्त्वाची उपेक्षा आढळते. समानतेचा प्रश्न मुख्यत: वितरणाशी संबंधित असूनही सिद्धांतात उत्पादन, व्यापार यांच्या चर्चेवरच भर आढळतो. रिकार्डो वितरण हा अर्थशास्त्रातील मूलभूत प्रश्न मानतात. वितरणातील हितसंघर्षाचा भाग निर्देशित करतात. मात्र माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत व त्यावर आधारित निर्वाह वेतन सिद्धांत मान्य करून समान वितरणाची सैद्धान्तिक मांडणी दुर्लक्षित करतात. जे.एस. मिल वितरणाचे क्षेत्र धोरणात्मक निर्णयाचे क्षेत्र मानतात. समाजाच्या गरजेनुसार वितरणाचे धोरण निर्धारण शक्य मानतात. विकसित देशातील अर्थशास्त्रज्ञांनी सिद्धांताचा विकास व त्यांच्या विकासाची दिशा ठरवली. त्यामुळे विकसित देशांचा विकास व विकास सातत्याचे संरक्षण करण्याच्या गरजेतून वितरणाचा प्रश्न दुर्लक्षित राहिला असे मिर्दल मानतात. समानतेचे तत्त्व उदात्त, आदर्श असले तरी सर्वांना समान वितरणाने उत्पादकतेत वाढ व तिच्या वापराकडे दुर्लक्ष होऊन समान वितरणाबरोबर उत्पादनात घट पर्यायाने उत्पन्न घट स्वीकारावी लागेल असे मानले गेले त्यामुळे व्यवहारातही समानता उपेक्षित राहिली.

अर्थशास्त्रातील पूर्वानुग्रह म्हणजे अर्थशास्त्राकडे व आर्थिक प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोनाच्या अनुषंगानेही समानतेच्या प्रश्नापासूनची पीछेहाट स्पष्ट होते. आर्थिक सिद्धांत अतिभौतिक स्वरूपाचे आहेत. कारण अमूर्त विचार हे सिद्धांताचे स्वरूप व प्रतिपाद्य मानले गेले. केवळ तात्त्विक स्वरूपाचे विवेचन झाले. अर्थशास्त्रात व्यक्तिवादाच्या परिपूर्णतेला मान्यता होती. याशिवाय स्थिर समतोलाची कल्पना एक महत्त्वाचा पूर्वानुकूलग्रह आहे. अर्थव्यवस्था समतोलावस्थेत असते. काही बदलांनी संतुलन ढळले तर त्या बदलांच्या विरूद्ध प्रतिक्रिया होऊन व्यवस्था पुन्हा समतोलाकडे जाते असे मानले गेले. स्पर्धेवर आधारित बाजार व्यवहारांचे लाभ व त्यातील परस्पर हित संबंधात सुसंगती असल्याची मांडणी केली गेली. या सगळ्यातून हस्तक्षेपाबाबत राज्यसंस्था विरोधी पूर्वग्रह अस्तित्वात आला. समानतेचे तत्त्व, व्यवहार व सिद्धांतावरील उतारे असे स्वरूप त्यांना प्राप्त झाल्याचे मिर्दल स्पष्ट करतात.

एकंदरीत मिर्दलच्या Economic Theory and Under Developed Regions या ग्रंथातील विवेचनातून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात प्रकर्षाने जाणवलेल्या, चर्चेत आलेल्या आणि अलीकडच्या काळात पुन्हा वेग आणि व्यापक स्वरूप धारण केलेल्या असमानतेच्या वास्तव समस्येचे मूलगामी विश्लेषण व त्यातून प्राप्त मार्गदर्शन विशेषत: विकसनशील देशांसाठी नि:संशयपणे चिंतनीय आहे.

◆◆◆

## प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यान

प्राचीन काळी असणारी वस्तुविनिमय पद्धती किंवा त्यानंतरच्या आलेल्या धातुमुद्रांच्या काळात त्या गोष्टींना चलनाशिवाय देखील स्वत:चे असे मूल्य होते. मात्र सध्या उपलब्ध असलेल्या कागदीचलन, प्लास्टिकचलन किंवा डिचिटल चलनाला असे कोणतेही स्वमूल्य नसल्याने शासकीय विश्वासापलिकडे आपल्या हातात काहीच उरत नाही. सरकारने नाकारले तर क्षणात या सगळ्यांचे मूल्य अक्षरश: कागदी तुकडे आहे. त्यामुळे ही परिस्थिती निश्चितच चिंतेचा विषय आहे असे विचार नाशिक येथील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि सनदी लेखापाल डॉ. विनायक गोविलकर यांनी व्यक्त केले.

लोकमान्य टिळक महाविद्यालयात विदर्भ अर्थशास्त्र परिषद आणि महिविद्यालयाचा अर्थशास्त्र विभागाचे वतीने आयोजित चलनप्रवास या विषयावर, प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यानात ते दि. २३ डिसेंबर २०१९ रोजी बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. प्रसाद खानझोडे यांच्या सह प्रा.निवृत्ती पिस्तुलकर, डॉ. जे.एम. काकडे तथा महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ करमसिंग राजपूत उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ.राजपूत यांनी या परिषदेच्या कार्याचा परिचय करून दिला. उपस्थित मार्गदर्शकांच्या मनोगतानंतर डॉ. गोविलकर यांनी वस्तुविनिमयापासून आजच्या बिटकॉईन पर्यंतचा प्रवास विविध पैलूंसह उलगडून दाखवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. अभिजित अणे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. मनोज जंत्रे यांनी केले.

ISSN 2320-0197

# वर्तमान वित्तीय स्थिरतेबाबत रिझर्व्ह बँकेची भूमिका

**विजय रमाकांतराव रोटे**
सहयोगी प्राध्यापक,
बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय,
दिग्रस. (जि.यवतमाळ)

१९३४ च्या रिझर्व्ह बँक कायद्यानुसार १९३५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. भारतीय अर्थव्यवस्थेत रिझर्व्ह बँकची भूमिकाही विविधा अंगी आहे. भारतीय अधिकोषण व्यवस्थेची केंद्रिय संस्था म्हणून रिझर्व्ह बँकेची भूमिका आधारभूत स्वरूपाची आहे. अधिकोषण व्यवस्थेची शिखर संस्था म्हणून रिझर्व्ह बँक अर्थव्यवस्थेतील पैशाची संख्या व कार्यावर नियमन व नियंत्रण ठेवते व त्याद्वारे वित्तीय स्थिरता राखते.

१९४९ पर्यंते रिझर्व्ह बँकही खाजगी भागधारक संस्था होती. परंतु भारत सरकारने १९४९ मध्ये रिझर्व्ह बँकचे राष्ट्रीयीकरण केले. १९४९ पासून रिझर्व्ह बँक हे सरकारचे महत्वपूर्ण अंग म्हणून कार्य करत आहे. सरकारने स्थापन केलेल्या संचालक मंडळाव्दारे RBI चे संचालन होते.

देशाचा आर्थिक विकास व देशातील वित्तीय स्थिरता यामध्ये महत्वपूर्ण समतोल ठेवण्यामध्ये रिझर्व्ह बँकची भुमिका महत्वाची आहे. या लेखाद्वारे रिझर्व्ह बँकची अर्थव्यवस्थेतील भुमिका व कार्य यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. विशेषत; वर्तमान आर्थिक परिस्थितीत रिझर्व्ह बँकच्या भुमिकेचे विश्लेषण यामध्ये करण्यात आले आहे.

**वित्तीय अस्थिरता व नियमन :**

वित्तीय व्यवस्था व बाजार यंत्रणेला योग्य नियमन हे अत्यंत आवश्यक आहे. स्थुल आर्थिक धोरण व कार्यक्षम नियमनाद्वारे वित्तीय व्यवस्थेला व बाजारव्यवस्थेला स्थिरत्व देता येते.

२००७-०८ मधील आर्थिक आस्थिरतेमुळे फारमोठा आर्थिक फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसलेला आहे. याचा प्रभाव आजही जाणवत आहे. आर्थिक संकटानंतरच्या काळात केंद्रिय संस्थाचे धोरण व विनिमयाचा मुख्य हेतू हा वित्तीय स्थिरता निर्माण करणे हा राहीला आहे. आर्थिक संकटाच्या काळात अनेक मोठया वित्तीय संस्थांच्या पुढे भांडवल पर्याप्तेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे संपूर्ण व्यवस्थेमध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. परिणामी देशातील केंद्रिय संस्थांना धोरण निर्माण करतांना व्यापक स्तरावर व्यवस्थेला अस्थिर करणाऱ्या घटकांचे नियमन करणे आवश्यक वाटू लागले.

वित्तीय स्थिरतेचे नेमके विश्लेषण कठिण आहे. वित्तीय आस्थिरता अनेक मार्गाने येते आणि अर्थव्यवस्थेला प्रभावित करते. रिझर्व्ह बँक विश्लेषणानूसार आस्थिरताही बाजार, परकीय चलन आणि व्यापार या मार्गाने येते. जागतिक

अर्थव्यवस्थाही पूर्वीपेक्षा अधिक संलग्न झाल्या मुळे हा धोका वाढला आहे. वित्तीय अस्थिरता दूर करण्यासाठी व्यवस्थात्मक धोके उपाय योजना वरभर देण्यात येत आहे. भारतामध्ये रिझर्व्ह बँकेकडे व्यवस्थात्मक धोके नियमन करण्याची जबाबदारी आहे.

२००८ च्या वित्तीय संकटामुळे नियामक संस्थांच्या दृष्टीकोणामध्ये बदल झाला आहे. सुक्ष्म स्तरावरील नियमना ऐवजी व्यापक स्तरावर आर्थिक धोरण राबवणाऱ्या सर्व घटकांना एकत्रीतपणे नियमन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे

**जागतिक स्तरावर वित्तीय अस्थिरतेबाबत चिंतन:**

२००८ च्या वित्तीय संकटानंतर वित्तीय स्थिरतेबाबत जागतिक दृष्टीकोणात व्यापक बदल झालेला दिसतो. २००८ च्या संकटामध्ये अनेक वित्तीय संस्थांनी व्यवस्थेमधील स्थिरता हे तत्व विचारात घेतले नाही. यानंतर मात्र धोरणकर्तानी व नियामकांनी सुक्ष्म स्तरावर नियमन करताना व्यवस्थेमधील धोक्याबाबत अभ्यास व उपाययोजना विचारात घेणे सुरू केले आहे.

वित्तीय संकटानंतर जी-२० गट, Bank For International Settlement (BIS), Financial Stability Board (FSB) यांच्या पुढाकाराने अनेक सुधारणा जागतिक स्तरावर लागू करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत जागतिक स्तरावर अनेक मोठया अर्थव्यवस्थांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी वृध्दीदर व मंदी सदृश्य परिस्थिती जाणवत आहे. जागतिक वित्तीय स्थिरता अहवालात २०१८ मध्ये IMF ने जागतिक स्तरावर व्यवस्थात्मक धोका निर्माण करणाऱ्या घटकांबाबत इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत केंद्रिय बँका व इतर नियामक संस्थांनी Cardinal Principle -The regulator never sleep ह्या तत्वाचे पालन सुरू केले आहे.

**राष्ट्रीय स्तरावरील चिंतन :**

मौद्रिक व वित्तीय स्थिरता निर्माण करणे रिझर्व्ह बँकचे गाभा उद्दिष्टय आहे. २००८ च्या वित्तीय संकटासारख्या संकटाला तोंड देण्यासाठी रिझर्व्ह बँकव्दारा संस्थात्मक संरचनेत बदल करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. ज्यामध्ये जे सरकारी अधिकोश कमकुवत आहेत त्यांचे मोठया अधिकोऱ्यांमध्ये विलीनीकरण करणे हा महत्वाचा उपाय करण्यात आला आहे.

भारतात राष्ट्रीय स्तरावर अनेक नियामक संस्था नियमनाचे कार्ये करत आहेत. या सर्व संस्थांमध्ये समन्वय प्रस्थापित करून सरकारच्या धोरणास पूरक असे नियमन यंत्रणा निर्माण करण्यासाठी Financial Stability Development Council (FSDC) ची वित्तमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाच्या उप. समितीचे अध्यक्ष रिझर्व्ह बँकचे गव्हर्नर आहेत. भारतातील वर्तमान वित्तीय व्यवस्थेचे विश्लेषण करण्याचे काम या उप-समितीच्या अंतर्गत रिझर्व्ह बँकव्दारा करण्यात येते. वित्तीय अस्थिरतेला पुरक असणाऱ्या संवदेनशील घटकांना ओळखुन ते दुर करण्याचे कार्ये रिझर्व्ह बँकव्दारा करण्यात येत आहे.

**रिझर्व्ह बँकची भुमिका :**

भारतात पत बाजार, वित्त बाजार, बाहय क्षेत्र व शोधन व्यवस्थेत आरबीआय द्वारा वित्तीय स्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.

१. भारतातील पतबाजार हा अधिकोषण व गैर-अधिकोषण क्षेत्रामध्ये विभाजीत केले जातो.

भारतातील कर्जबाजारामध्ये अधिकोषण क्षेत्राची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. भारतातील अधिकोषण क्षेत्रामध्ये कर्जसंबंधीत अनेक समस्या आहेत ज्यामध्ये अधिकोषण क्षेत्रातील अत्याधिक कर्ज वितरण, रोखतेची कमतरता, बुडीत कर्जाचे वाढते प्रमाण या प्रमुख समस्या आहेत.

* रिझर्व्ह बँकव्दारा अधिकोषण क्षेत्रातील व्यवस्थात्मक धोक्यांचे नियमन करण्यासाठी व्यापक स्तरावर संपत्ती तणाव चाचणी घेऊन कर्ज धोका समजूत घेतला जात आहे.

  त्यामुळे अधिकोषण क्षेत्रातील जी.एनपीए. प्रमाण कमी झाले आहे. याशिवाय Provision Coverage Ratio (PCR) भांडवल पर्याप्तता प्रमाण, संपत्ती वरील मिळकतीचे प्रमाण यामध्ये सुधारणा दिसत आहे.
* सरकारी अधिकोषानी आपली कार्यक्षमता, अंतर्गत स्थिरता, प्रशासन व्यवस्थेतेत सुधारणा करावी यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्न करत आहे.
* भारतातील कर्जव्यवस्थेतील त्रुटी दुर करण्यासाठी सरकारव्दारे Insolvency & Bankruptcy code लागु केला आहे या कायदयाची कार्यक्षमपणे अमंलबजावणी करण्यासाठी आरबीआय द्वारा २०१९ मध्ये तणावग्रस्त संपत्तीसंबंधी योग्य नियमावली तयार करण्यात आली आहे. जेणेकरून भविष्यात निर्माण होणारी एन.पी.ए., निम्न तारण असणारी संपत्तीपासून अधिकोष सावध होतील.

  या नियमावलीमुळे अधिकोषांना आपल्या तोलनपत्रातील एन.पी.ए. आधारीत सपंत्ती पासून सुटका मिळेल.
* २००८ च्या वित्तीय संकटापासून नियामक संस्थांना वित्तीय अस्थिरतेबाबत अनेक कारणे लक्षात आली आहेत. ज्यामध्ये अत्याधिक कर्ज प्रमाण, निम्नदर्जाचे तारण, समन्वयाचा अभाव, अपारदर्शी कारभार, तक्रारी बाबत गंभीर नसणे इ. कारणे महत्वाची आहेत. परिणामी आरबीआय अधिकोष व गैरअधिकोषांच्या कार्यावर सुक्ष्म लक्ष ठेवून सुशासन संबंधीचा आदेश त्यांना देत आहे. गाभा गुंतवणुक कंपनी बाबत अभ्यासगटाने दिलेल्या शिफारशीनुसार आर.बी.आय. आपल्या नियामक संरचनेत आवश्यक ते बदल करत आहे.अधिकोष व गैरअधिकोष यांचे नियमन व पाहणी देखरेख साठी विशेषी कृतज्ञांचा गटस्थापन करण्याची प्रक्रिया आरबीआय व्दारा करण्यात येत आहे.
* अधिकोषण व्यवस्थेमध्ये उत्तम सुशासन संरचना निर्माण करणेबाबत ही आर.बी.आय जागरूक आहे. त्यासाठी आर.बी.आय. व्दारा अधिकोषांचे संचालक मंडळ, संचालक मंडलाच्या उपसमित्या, लेखे व धोका व्यवस्थापन समिती यांनी आपल्या मुख्य कार्यकारीअधिकारी व संचालक यांच्या कामाची पाहणी करणे आवश्यक ठरते त्यामुळे संपूर्ण अधिकोषांच्या संचालक तत्वांचे महत्व वाढते व संपूर्णअधिकोष यंत्रणा कार्यक्षम राहते.
* मार्च, २०१९ पर्यत भारतातील अनुसूचित अधिकोषांचे धोका आधारीत संपत्ती प्रमाण १४.२ टक्के आहे. नियमानुसार हे प्रमाण ९ टक्के असावे. काही सार्वजनिक अधिकोषांमध्ये हे प्रमाण १०.८७ टक्के आहे. सरकारव्दारे

सार्वजनिक अधिकोषांमध्ये भांडवल ओतल्यामुळे हे प्रमाण कमी झाले आहे. आरबीआय द्वारा चक्राकार भांडवल बफर कर्ज प्रमाण, चलनिधीप्रमाण, स्थिर निधीप्रमाण हे लागू करण्यात आले आहेत. या शिवाय आर.बी.आय. व्दारा मोठया प्रमाणात होणाऱ्या कर्ज प्रकरणा बाबत निर्देश देण्यात आले आहेत. १ एप्रिल २०१९ पासून यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

* अधिकोषण पर्यवेक्षणावर आधारीत बासेल समितीने डिसेंबर २०१७ मध्ये सुधारीत नियमावली सादर केली. ही नियमावली २०२२ पर्यत भारतात लागू करणे आवश्यक आहे. आरबीआय द्वारा सर्व अधिकोषांना तसे दिशा-निर्देश देण्यात आले आहेत. २०२० पर्यत सर्व अधिकोषांना याबाबत आपला अहवाल तयार करावयाचा आहे.
* भारतात २००६ ते २०११ या कालावधीत बेजबाबदार कर्जवाटपामुळे सार्वजनिक अधिकोषांसमोर संपत्ती गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे आर.बी.आय व्दारे २०१४ मध्ये मोठे कर्ज प्रकरण याबाबत माहिती संग्रह निर्माण करण्यात आला आहे. अशा मोठया कर्जाची माहिती व सुचना देणे सर्व अधिकोषांना बंधनकारक करण्यात आली आहे. या माहिती संग्रहाच्या आधारे २०१५ मध्ये अधिकोषांच्या कर्ज व्यवस्थेचे व संपत्ती गुणवत्ते बाबत समीक्षा करण्यात आली. परिणामी अनेक निम्न दर्जाची कर्ज प्रकरणे आरबीआय लक्षात आली आहेत. अधिकोषांनी आपले एन.पी.ए. स्पष्ट करावी लागली. परिणामी २०१५ मध्ये एकूण एन.पी.ए. प्रमाण ४.५ टक्के होते. २०१६ मध्ये हे प्रमाण ७.५ टक्के होते तर २०१८ मध्ये ११.५ टक्के वाढल्याचे दिसून येते. आरबीआय च्या योग्य नियमन व Insolvency & Bankruptcy code मुळे २०१८-२०१९ मध्ये अनुसूचित अधिकोषांचे प्रमाण घटून ९.३ टक्के झाले. तसेच २०१५ मध्ये अनुसूचित अधिकोषांचे Provision Coverage Ratio (PCR) प्रमाण ४४.० टक्के होते ते वाढून मार्च,२०१९ मध्ये ६०.९ टक्के झाले.
* गैर-अधिकोषीय वित्तीय सस्थांची भारतातील ग्रामीण व शहरी क्षेत्रामध्ये महत्वाची भुमिका आहे. भारतातील एकूण वित्तीय क्षेत्रामध्ये एन.बी.एफ.सी. चा वाटा हा १६ टक्के आहे. मार्च २०१९ मध्ये एन.बी.एफ.सी. मध्ये धोका आधारित संपत्तीचे प्रमाण १९.३ टक्के तर एकूण एन.पी.ए. चे प्रमाण ६.६ एवढे होते.
* अधिकोष व गैरअधिकोष यांच्या मध्ये तरलते बाबत मेळ घालण्याचा प्रयत्न आरबीआय द्वारा करण्यात येत आहे. तसेच गैर अधिकोषण क्षेत्रात सुशासन व व्यवस्थात्मक संरचनेबाबतीत ही आर.बी.आय महत्वाचे निर्णय घेत आहे ज्यामध्ये ज्या वित्त संस्थांचा आकार ५००० करोड रूपयांपेक्षा आधिक आहे तेथे स्वतंत्र मुख्य जोखिम अधिकारी नियुक्त करण्याचे सांगण्यात आले आहे. आरबीआय द्वारा एन.बी.एफ.सी ची देखरेख करण्यासाठी मुख्यतः चार बाबी विचारात घेतल्या जातात. १) ऑनसाइट पाहणी. २) ऑफसाइट पाहणी

३) बाजार माहिती सुचना ४) कायदेशीर लेखा परीक्षण अहवाल.

**वित्त व्यवस्था :**

वित्तीय व्यवस्थेच्या सुरळीत संचालना साठी वित्तीय स्थिरताही फार महत्वपूर्ण आहे. २००८ च्या वित्तीय संकटानंतर रिझर्व्ह बँकची वित्तीय बाजारव्यवस्थेवर सुक्ष्म देखरेख आहे. सद्य:स्थितीत आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये कर्ज व चलन संकट आहे व त्याचा परिणाम हा देशातील उत्पादन व्यवस्थेवरही होत आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकद्वारा भारतातील पैसा बाजार, सरकारी रोखे बाजार, परकीय चलनबाजार व व्याज आधारित वायद्याच्या व्यवहारावर लक्ष आहे

रिझर्व्ह बँकद्वारा परकीय चलन खरेदी विक्री सरल करण्यासाठी इंटरनेटच्या आधारे परकीय चलनाची चलन खरेदी व विक्री कोणत्या मध्यस्था शिवाय प्रत्यक्ष चालु विनिमय बाजार दरानुसार करण्याची परवानगी सामान्य जनतेला देण्यात आली आहे. त्यामुळे परकीय चलनबाजारात होणारी अनियमीतता कमी झाली आहे.

भारतातील वित्तीय क्षेत्राला स्थिरत्व देण्यासाठी भांडवल प्रवाह नियंत्रीत करण्याचा उपाय म्हणून कर्जबाजारामध्ये परकीय गुंतवणुकीवर व बाह्य क्षेत्रातील कर्ज उचल वर मर्यादा बंधने घालण्यात आली आहेत.

रिझर्व्ह बँकद्वारा भारतातील वित्तीय क्षेत्र, वायदयाचे व्यवहार यावर योग्य नियमन ठेवण्यासाठी Legal Entity Identifier (LEI) ची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे परिणामी वित्तीय क्षेत्रातील गुंतागुंतीच्या वित्तीय उत्पादनाच्या बाबतीत पारदर्शीता निर्माण झाली आहे. तसेच वायद्याच्या व्यवहारामध्ये व्यावसायिक व गैरव्यावसायिक, स्थानिक व विदेशी यांच्यातील भेदभाव हा नष्ट करण्यात आला आहे. त्याचा अनुकूल परिणाम भारतातील विदेशी चलन प्रवाहावर होत आहे.

आरबीआय चे कंपनी सुशासन व वित्तीय शिस्त बाबत दिशा-निर्देश अधिकोष व गैर अधिकोष वित्तीय संस्था यांच्या कंपनी सुशासन व वित्तीय शिस्तबाबत आरबीआय ने खालील दिशा-निर्देश दिले आहेत.

- सरकारी व खाजगी अधिकोषाचे कार्यकारी अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी निर्णयाची समीक्षा करण्याची जबाबदारी संचालक मंडळ किंवा संचालक मंडळाच्या उपसमितीवर सोपविण्यात आली आहे.
- सरकारी अधिकोषांमध्ये कंपनी सुशासन प्रणाली कार्यक्षम करण्यासाठी संचालकांची नियुक्ती प्रक्रिया अधिक पारदर्शी करण्यात आली आहे.
- खाजगी अधिकोषामध्ये कार्यक्षम कंपनी सुशासन प्रणाली निर्माण करण्यासाठी लेखा परिक्षण तत्वाचे कार्यक्षमपणे पालन करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वेतन व भत्ते निर्धारणात पारदर्शीता ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- वित्तीय क्षेत्रातील जोखिम व्यवस्थापन यंत्रणा कार्यक्षम करण्यासाठी मुख्य जोखिम अधिकारी हे पद निर्माण करण्यात आले आहे.
- सार्वजनिक अधिकोषामध्ये आदेश पालन करणारी कार्य संस्कृति निर्माण करण्यासाठी संचालक मंडळाद्वारे वेळोवेळी आदेश पालन व्यवस्थेची समीक्षा करणे बंधनकारक करण्यात

आले आहे.

**समारोप :**

वित्तीय व्यवस्थेला नेहमी कार्यक्षम ठेवणे ही कायम चालणारी प्रक्रिया आहे. यामध्ये रिझर्व्ह बँकेचे भुमिका २००८ पासुन केंद्रस्थानी आलेली आहे. २००८ सारखी परिस्थिती पुन्हा निर्माण होणे अर्थव्यवस्थेसाठी घातक असल्यामुळे जागतिक स्तरावर समन्वीत नियमन तत्व निर्माण करण्यात आले आहे. या बेसल ३ नियमावलीचे पालन भारतात २०२२ पासून होणार आहे. वित्तीय क्षेत्रातील अस्थिरताही वास्तविक क्षेत्रावर परिणाम करत असल्यामुळे रिझर्व बँकेची भुमिका आज केंदस्थानी आलेली दिसून येते.

**संदर्भ :**


१. वित्तीय स्थिरता अहवाल, २०१९ रिझर्व बँक ऑफ इंडिया.

२. 'Regulation and Financial Stability' speech delivered by Shri N.S. Vishwanthan, Deputy Governor, RBI. RBI bulletin January,2018

3- 'Evolving Role of Central Bank' Address by Shri Shaktikanta Das, Governor , RBI , June 17, 2019.


◆◆◆

तक्ता क्र. १

क्षेत्रनिहाय कर्ज व तणावग्रस्त संपत्तीप्रमाण (अनुसूचित अधिकोष)

| क्षेत्र | मार्च, 2018 | | मार्च,2019 | |
|---|---|---|---|---|
| | एकूण कर्ज प्रमाण | तणावग्रस्त संपत्ती प्रमाण | एकूण कर्ज प्रमाण | तणावग्रस्त संपत्ती प्रमाण |
| खाणकाम | 1.2 | 26.8 | 1.4 | 26.7 |
| अन्नप्रक्रिया | 5.7 | 22.3 | 5.3 | 17.6 |
| कापड उद्योग | 7.3 | 22.3 | 6.5 | 16.1 |
| पेपर उद्योग | 1.2 | 28 | 1.1 | 16.9 |
| रसायन | 6.2 | 8.8 | 6.9 | 8.5 |
| रबर उद्योग | 1.5 | 5.2 | 1.6 | 9.2 |
| बेसमेटल | 14.4 | 46.3 | 11.5 | 28.5 |
| इंजिनिअरिंग | 5.8 | 34.4 | 5.7 | 25 |
| बांधकाम | 3.8 | 24 | 27 | 21.5 |
| आधारभूत उद्योग | 34.1 | 22.6 | 36.4 | 17.8 |
| वाहन उद्योग | 2.9 | 22.5 | 3.1 | 18.4 |

तक्ता क्र. २

**भारतातील वित्तीय स्थिरतेबाबत सद्य:स्थिती**

**अनुसूचित अधिकोश (वित्तीय स्थिती)**

| वित्तीय निर्धारक प्रमाण | मार्च, 2018 | | | मार्च, 2019 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सार्वजनिक अधिको□ | खाजगी अधिको□ | अनुसूचित अधिको□ | सार्वजनिक अधिको□ | खाजगी अधिको□ | टनुसूचित अधिको□ |
| कर्जवृध्दी | 6.3 | 21.3 | 10.4 | 9.6 | 21 | 13.2 |
| ठेव वृध्दी | 3.3 | 17.7 | 6.9 | 6.5 | 17.5 | 9.9 |
| GNPA | 15.6 | 4.0 | 11.6 | 12.6 | 3.7 | 9.3 |
| PCR | 47.1 | 51 | 48.1 | 60.8 | 57 | 60.6 |
| CRAR | 11.7 | 16.4 | 13.8 | 12.2 | 16.3 | 14.3 |

## श्रद्धांजली

८ ऑगस्ट २०१९ मध्ये **डॉ. डी.एस्.वखरे** यांचे पुणे मुक्कामी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. ते ८३ वर्षाचे होते. मूल (जि.चंद्रपूर) येथे भरलेल्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या १७ व्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. परिषदेचे ते सक्रीय कार्यकर्ते होते. वरूड येथील महात्मा फुले महाविद्यालयातून ते अर्थशास्त्राचे विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले होते. तसेच त्याच महाविद्यालयात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे जे १४ वे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले होते त्याचे ते स्थानिक सचिव होते. त्यांच्या निधनामुळे परिषदेचे मोठी हानी झाली आहे. परिषदेच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

* * *

ऑगस्ट २०१९ मध्ये फुलसिंग नाईक महाविद्यालयाचे माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. पी.एन्.गादेवार** यांचे अल्पशा आजारामुळे वयाच्या ८२ व्या वर्षी दु:खद निधन झाले. ते विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सक्रीय कार्यकर्ते होते. पुसद येथे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे जे १८ वे वार्षिक अधिवेशन झाले ते यशस्वीपणे आयोजित करण्यात त्यांचा स्थानिक सचिव या नात्याने महत्त्वपूर्ण सहभाग होता. परिषदेच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# Revising Methodologies and Fund Distribution Formulae: The need of the hour for Vidarbha's Development

**Kapil D. Chandrayan**
Expert Member,
Vidarbha Development Board

The issue of underdevelopment of the economically backward region of Vidarbha has been discussed time and again. Various committees have elaborately studied the issue and have given their prescriptions for the improvement of the state of affairs. From Dandekar to Kelkar, lot of efforts have been undertaken to identify the reasons of this backwardness and to overcome it. The issue has been also getting importance on the political platforms and at least half a dozen political parties have been floated to push forward the agenda of a separate state of Vidarbha. All in all one common observation that can be safely made is that, whether it is the politicians, the academicians, the social workers or the common people of Vidarbha, everybody wants 'Development'.

**Development Process: Some Theoretical Perspectives**

Students of social sciences know that 'Development' is not a simple issue. It is indeed a multidimensional and sophisticated phenomenon, with multiple factors determining its direction and magnitude. Hence there can be no binary solution to the issue. The case of underdevelopment of Vidarbha is no exception to this. There have been multiple organizations and even learned individuals who have been championing many such binary solutions. But unfortunately apart from getting personal or institutional publicity, not much has been achieved. The process of Development of any region can take place in two broad ways, namely; 'Evolutionary Development' and 'Development by Design'. 'Evolutionary Development' is a natural and organic way where the process of development is 'need based', 'mostly intrinsic' and without any external 'push'. Such process of Development may be slow in pace but is surely sustainable. Against this 'Development by Design' is an intervention (mostly positive or at least with a positive intent) in the existing process of

Development to speed it up or to change the direction of it. In this process, investments are brought in certain regions, infrastructure is developed and an ecosystem conducive for the 'development process' is created. This is surely an extrinsic process and depends on several factors for sustainability. Though faster than the previous approach this approach is much more fragile.

Apart from this, various other theories do play an important role in the development of any region. Location of Industries is one such theoretical as well as practical problems faced by not only industrialists but also the policy makers. The explanation to these complexities of several theories of industrial location have been proposed by economists like Weber, Tord Palander, Edgar Hoover, August Losch, Walter Isard, and geographers like George Renner, Rawston, Allen Pred, Smith, etc. Some of the theories had been developed in early 19th century, while others in the 20th century. The prime concern of all the theories of industrial location is to find the 'optimal location', which is economically the best and one that gives maximum profits. There has been a change in factors which distinguish earlier theories with contemporary reality: decrease in importance of transport costs; increased organisational dynamism, interdependence and variety and the rise of corporate enterprise.

**Vidarbha : Many Failures Meager Learnings**

In case of Vidarbha, the development initiative has been 'By Design'. Not that it was forced upon but was necessary. In comparison with the Rest of the Maharashtra, the Vidarbha region has been underdeveloped on multiple fronts. Some of the reasons are as follows:

1. Being a land locked region, it is far away from the ports which have been the nerve centre of the international trade right from the medieval times. As a result of this the regions closer to the ports developed faster and also got international exposure much earlier than Vidarbha did.
2. Though endowed with multiple natural resources, the region could not make optimum use of the resources for itself due to multiple factors like

   **a. Legal issues** - various laws like the Forest Act have been instrumental in stagnating or at least slowing down the development of new projects in Vidarbha.

   **b. Environmental issues** - Most of the forest of the state is in Vidarbha. The region has been treated like a

hinterland which should take care & maintain the forest to meet the targets of the Forest Act for the state. Hence when environmental norms have been flouted or at least compromised for developmental projects across Maharashtra, they are being presented as hurdles for growth of Vidarbha region.

3. For a long time the central location of Vidarbha was being projected as a strength of the region. It may be so in some cases, but in case of Industrialization it is surely not the primary choice for industrialists. The reasons for the same account to high transportation costs, insufficient and inefficient logistics infrastructure in the region and issues like labour problems, etc.

4. I wanted to avoid writing about political issues, but this list of reasons cannot be completed without mentioning the political neglect as well as sidelining of Vidarbha by the state leadership, which has been predominantly from Rest of Maharashtra. Issues like Diversion of funds from Vidarbha & Marathwada to Western Maharashtra, Transfer of Development projects from Vidarbha, lopsided spending of industrial and other subsidies are nothing but a great example of 'Bad Politics winning over Good Economics'.

5. The last reason I want to share here (though there are many more, not included due to space constraint) is the systematic neglect of the constitutional mechanism created for balanced development of the regions of the state. It primarily includes keeping the Development Boards underutilized and consistent neglect of the Directives of the Hon. Governor of Maharashtra, who has been entrusted with a special responsibility under article 371(2) of the Indian Constitution.

All in all the development process in Vidarbha was not 'Evolutionary' as it was in the Rest of Maharashtra and the 'Development by Design' process did not yield the desired results in the desired time. One of the important reasons why the 'Development by Design' process is not yielding as per expectations is due to the incorrect methodologies and distribution of fund mechanism existing in the practice even today. The faulty methodologies and distribution of fund mechanisms are heavily biased against regions of Vidarbha and Marathwada and hence are not delivering anything to these underdeveloped regions. Hence I say that it is high time we revise

these methodologies and distribution of fund formulae in the interest of balanced regional development in the state.

I am putting up two important cases which advocate the necessity of revising the formulae. These cases are primarily concerned with irrigation but may be extended to other sectors of the economy as well.

**Case I : The need for revising the formula for distribution of Irrigation Funds**

The formula for allocation of outlay in the Irrigation sector has been in practice since last several years. It gives 50 - 50 % weightage to the two parameters of population of the region and the net sown area. The percentage of population of each region is calculated as compared to the total population of the state. In the same manner the percentage of net sown area is calculated considering the total net sown area of the state. The average of both the percentage is then considered as the weightage of population & net sown area. (Please Refer Annexure 6A of Directives of Year 2017-18).

Though these two indicators (Population & Net Sown Area) appear to be the most obvious indicators on deeper analysis it appears to be more biased towards the Rest of Maharashtra region in general and Pune division in particular. Due to the current formula the regions which have a well developed irrigation system are getting more funds while the regions which are parched remain deprived.

The problem with the current formula and the indicators used can be analyzed as below :

a. **Population :** In most of the formulae, population remains as one of the most important component but in this case overall population or Total Population cannot be the right indicator. I am sure you will appreciate that irrigation has a more direct impact on the rural population as compared to the urban population. Hence the better indicator could be the rural population of the regions. Since urbanization has been more prominently noted in the Rest of Maharashtra, using the indicator of total population creates an uncalled bias towards the region. The Urban population of Mumbai, Thane, Pune, Nasik and Kolhapur account for approximately 2.5 to 3.0 Crore (which is almost 21.5 % to 26% of the total population of Maharashtra State). Hence the better indicator would be Rural Population.

b. **Net Sown Area :** It provides us the idea of the actual area of land on which

cultivation has been done. Now there are multiple factors which affect the Net sown area, the most important being availability of irrigation. Some of the limitations posed by the use of NSA as a n indicator are given below :

i. Many areas in various regions of the state cannot be brought under cultivation due to non availability of irrigation.

ii. The areas which are sown even once are counted in as Net Sown Area (NSA). It means that any marginal land ho lder cultivating only rain fed crops like vegetables, etc. is also counted in NSA.

iii. The NSA is not a correct indicator in areas which are hilly, covered by forest, shrubs, etc.

iv. There are regions which get cultivated thrice a year on one hand and on the other there are regions which hardly are able to cultivate one crop. But this diversity is neutralized by the use of NSA.

v. Moreover there are regions which have lower proportion of NSA to cultivable area due to non availability of irrigation.

Hence correlating the need for more irrigation to the region with high NSA will not be correct. In many areas availability of irrigation can result in increase of NSA.

In fact the need of irrigation is prominently felt during the end of Kharif and during the entire Rabi season. In areas where irrigation is available farmers take three crops. The point is, creation of irrigation facilities will automatically increase the NSA thereby increasing the need for further irrigation. But if in first place irrigation facilities are not created, NSA will be low and the demand for irrigation will also be low. And by using this formula, the regions which enjoy matured irrigation facilities will be getting more and more funds while the regions with underdeveloped or no irrigation infrastructure will be deprived of the funds.

I would like to submit the following model to overcome the aforesaid problems and ensure equitable distribution of development funds in the truest sense:

c. The following indicators be used for the allocation principle of irrigation funds

Indicator Weightage Remarks

| Indicator | Weightage | Remarks |
|---|---|---|
| Rural Population | 25% | Being the direct beneficiaries of Irrigation |
| Total Cultivable Area | 25% | Total Area of the region which can be brought under cultivation |
| % of Cultivable Area deprived of Irrigation | 25% | Total Cultivable area – Total Irrigated Area of the Region |
| Net Sown Area | 25% | Will serve as an incentive for more and more cultivation |

d. The aforesaid model can be implemented for the next 10 years, so that all the physical backlog of irrigation will be wiped out.

e. After the span of 10 years the indicator of '% of Cultivable Area deprived of Irrigation' should be replaced by '% of area under single cropping' so that more irrigation funds are made available to areas where single cropping is practiced thus incentivizing multiple cropping.

A Committee at the state level may be formed to study this proposal and provide learned advice.

The above proposal was presented in the meeting held by Hon. Governor on 23rd April 2018 at Raj Bhawan Mumbai. Apart from the Chairmen, Member Secretaries and Expert Members of all the development Boards, Hon. Chief Minister, Hon. Finance Minister, Hon. Water Resources Minister and Hon. Chief Secretary were present in the meeting. Hon. Governor and Hon. Chief Minister took up this issue with interest and recommended that the formula for devolution of irrigation Funds should be amended. The Planning Department and the MWRRA were entrusted with the responsibility of drafting a new formula and present it to Hon. Governor's office.

It is learned that MWRRA has come up with some new draft formula. The draft formula should be made available to the Members of the Development Boards and time should be given to study it. After that a joint meeting of all the Development Boards should be convened to discuss the new Draft Formula to form a consensus.

Thereafter it can be presented to Hon. Governor's Office for acceptance and execution.

**Case 2: Alternative Method of Calculation of Backlog**

Currently we use the 'State Average' of any indicator as a benchmark for calculation of the backlog of that indicator (sector). But this method is flawed as the state average keeps on moving with any small intervention done in any part of the state and hence does not create a real picture. Moreover, different regions are different in terms of their agro-climatic zones, history, culture, factor endowment, etc. and hence using the same approach for them will not be justifiable. Hence the following method is proposed.

Assuming the district as the unit of planning and development, the backlog is defined as the difference between the district average and the state average for each sector. Is this method the correct method to calculate backlog?

Major drawback of this method is that over a period of time when the backward districts try to match the state average level, the state average level itself moves up. Which means backlog removal remains a continuous activity.

An alternate method is proposed below:

a. The alternate method could be to identify district wise / region wise potential (physical parameter) and then the investment required for it.

b. This benchmark can then be then set as a standard to calculate backlog i.e. difference between the actual physical potential and the facilities created against that. Similarly financial backlog can also be calculated by computing the difference between the actual investment required for tapping the existing physical potential and the actual investment made on the account.

**Example:**

The irrigation potential for a district can be calculated by summing up all the area which can be irrigated / which requires irrigation. This becomes the benchmark (i.e. irrigation potential of the district).

Then the actual figures of net area irrigated can be compared to the above benchmark. Thus the actual district wise irrigation backlog can be calculated, which will give the real picture of the irrigation development of the district.

Similarly, the total irrigation potential of the state can be calculated by adding up the irrigation potentials of the districts. The irrigation achievements of the districts can also be added up to achieve the state's irrigation development figures:

IPs = IPD1 + IPD2 + IPD3…….. IPDn

IAs =IAD1 + IAD2 + IAD3…….. IADn

Where,

IPs is Irrigation Potential of the Whole State

IP1 is Irrigation Potential of District 1 and So on till nth district

IAs is Irrigation Achievement of the Whole State

IA1 is Irrigation Achievement of District 1 and So on till nth district

Irrigation Backlog of State = IPs - IAs

The basic premise of this model is "Different regions have different Propensity to Grow (through differential Propensity to Consume) and hence its real development potential can be achieved not by comparison with other regions but by comparing it with its own Development Potential"

At the end, it must be concluded that Governance is the Critical Success Factor in bringing about the development of any region. Governance is not a physical entity but is a process based on law of the land, rules, policies, etc. The most important part of governance is 'Effective Execution' and hence it is necessary for all, who aspire for the development of Vidarbha to come up and work for improvement of the Governance system. This includes ensuring that right policies are framed for the region, the existing policy gaps are filled up and most importantly the right & effective implementation of the policies is followed up with perseverance and commitment.

◆◆◆

# प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी आणि भारत : एक दृष्टीक्षेप

**अंजली कुलकर्णी**
नागपूर.

गेल्या चार दशकांपासून जगाच्या सत्तेचे केंद्रस्थान पश्चिमेकडून पूर्वेकडे वळले असून त्यासाठी पूर्वेकडे पहा अशी साद पण घातली जात आहे. त्याचेच प्रत्यंतर आपणास आरसेप करारात दिसून येते. आरसेप (रिजनल कॉम्पिहेन्सीव्ह इकॉनोमिक पार्टनरशिप लघुरूप आरसेप) हा आशिआन चे दहा सदस्य देश आणि चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, जपान, न्युझीलँड हे अन्य पाच देश अशा पंधरा देशांमध्ये चार नोव्हेंबर २०१९ रोजी झालेला मुक्त व्यापार करार आहे. तसेच हा जगातील सर्वात मोठे मुक्त व्यापार क्षेत्र निर्माणकरणारा करार आहे. ब्रुनईत २०१३ पासून सुरू झालेल्या चर्चेतून जवळजवळ २८ फेऱ्यात विविध देशात वाटाघाटी होऊन शेवटी त्याचे १५ देशांनी त्यावर स्वाक्षरी करण्यात पर्यवसान झाले. भारताने मात्र या करारावर स्वाक्षरी न करण्याची भूमिका स्वीकारली.

भारताचा या करारात समावेश झाला असता तर या व्यापार क्षेत्रात जगातील ४७.६ टक्के लोकसंख्या व ३०.८ टक्के जागतिक व्यापार (२०१७), ३१.६ टक्के जागतिक जीडीपी आणि २.३ ट्रिलियन डॉलर आरसेप अंतर्गत व्यापाराचा समावेश झाला असता (२०१७).

**आरसेप करारातील समाविष्ट देश :**

आशिआन देश यात खालील आशिआन देशांचा अंतर्भाव होतो. १) ब्रुनेई, २) कंबोडिया ३) इंडोनेशिया ४) मलेशिया ५) मायनमार ६) फिलिपिन्स ७) सिंगापूर ८) थायलंड ९) व्हिएतनाम १०) लाओस या व्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, न्यूझीलंड, साउथ कोरिया, हे पाच धरून एकूण पंधरा सदस्य देशांचा व्यापार गट अस्तित्वात आला असून त्यांच्यात हा करार झाला. भारताने आजपर्यंत वाटाघाटीत सक्रिय भाग घेतला परंतु करारावर स्वाक्षरी करण्यास माघार घेतली.

हा करार अस्तित्वात आल्यानंतर आरसेपच्या सदस्य देशांमध्ये वस्तू व सेवांची आयात-निर्यात ही कोणत्याही शासकीय अडथळया शिवाय सुरळीत सुरू होईल. यापुढे व्यापार करताना सदस्य देशांना आयात किंवा निर्यात कर देण्याची गरज पडणार नाही.

**व्याप्ती :**

मुक्त व्यापार कराराच्या परंपरागत संकुचित मर्यादा ओलांडून आपल्या कक्षेत विविध गोष्टींचा समावेश करण्याच्या हेतूने या कराराची व्याप्ती व्यापक स्वरूपाची निश्चित करण्यात आली आहे. पूर्वीच्या मुक्त व्यापार कराराच्या चौकटी बाहेरील महत्त्वाच्या

बाबींचा समावेश करणारी ही व्याप्ती आहे. यात वस्तू व सेवांच्या व्यापाराची बाजारातील प्रवेश सुलभता किंवा शिरकावचा समावेश असुन या याव्यतिरिक्त त्यात परकीय गुंतवणूकीच्या संरक्षणाच्या दृष्टीने नियम, बौद्धिक संपदा हक्का विषयी (IPR) संरक्षणात्मक नियम, स्पर्धात्मक धोरण (Competition Policy) इलेक्ट्रॉनिक व्यापार, E-Commerce इत्यादी बाबींचा पण समावेश करण्यात आला आहे.

**भाग–१**

या लेखात दोन उद्दिष्टांच्या संदर्भात अभ्यास करण्याच्या प्रयत्न केला आहे प्रथम उद्दिष्टाच्या संदर्भात तीन प्रमुख बाबींचा समावेश होतो, ज्यात भारताच्या आर्थिक व व्यापारविषयक धोरणाचा व आरसेपच्या सदस्य देशांनी निश्चित केलेल्या धोरणांमध्ये व नियमातील व्यापारविषयक तफावतींचा दिसते. समावेश करण्यात आला आहे. ह्या बाबी व्यापार उदारीकरण, परकीय गुंतवणुकीचे संरक्षण व ई–कॉमर्सच्या संदर्भातील नियम यांच्याशी संबंधित आहेत.

दुसरे उद्दिष्ट भारतास सदस्य देशांच्या बाजारपेठेत कितपत सुलभपणे प्रवेश मिळेल या संदर्भात अभ्यास करणे हा आहे. आरसेपच्या सदस्य देशांसोबत सध्या अस्तित्वात असलेल्या मुक्त व्यापार करारामुळे (FTAs) निर्माण झालेल्या व्यापार पद्धती (Pattern) तपासणे हा देखील ह्या अभ्यासातील हेतू आहे. आरसेपच्या सदस्य राष्ट्रांचा सध्या अस्तित्वात असलेल्या व्यापाराचा संक्षिप्तपणे आढावा घेतल्यास त्यांचा बाजारपेठेतील संभाव्य शिरकाव (Access) व त्यापासून भारतास प्राप्त होणारा लाभ ह्याचा पण विचार करता येईल.

**व्यापार प्रशुल्काचे उदारीकरण :**

प्रशुल्क उदारीकरण्याच्या संदर्भात भारत वगळता बाकीच्या सर्व सदस्य देशांच्या अपेक्षा उंचावलेल्या दिसून येतात. याबाबत असलेल्या त्यांच्या अपेक्षा आरसेपच्या वास्तविक मुखत्यारी (Defacto Mandate) वाटाघाटीतील मार्गदर्शक तत्त्वात प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. त्यानुसार वस्तू व्यापाराच्या संदर्भात आरसेपच्या सदस्य देशांशी होणाऱ्या आयातीवरील प्रशुल्क (Tariff) व प्रशुल्केतर निर्बंध पूर्णपणे संपुष्टात आणून सदस्य देशांत मुक्त व्यापाराची निर्मिती करण्याचा हेतू असून त्यातून पर्यायाने उदारीकरणाचे खुल्या व्यापाराचे उद्दिष्ट पण साध्य करणे असा होता.

आरसेपचे काही सदस्य देश हे ट्रान्स पॅसिफिक पार्टनरशिप (TPP) करारातील सदस्य असून त्यांनी वस्तू उत्पादनावरील आयात करात ९७ टक्के पर्यत तर शेतीवरील आयात करावरील १०० टक्के पर्यत निर्बंध हटविण्यास संमती दर्शविली (२००९) आहे. परंतु जानेवारी २०१७ त ट्रम्प शासनाने (USA) करारातून माघार घेतली. उरलेल्या अकरा (TPP) सदस्य देशांनी मात्र ह्या कराराची परिपूर्तता करण्याचे ठरविले व त्यानुसार Comprehensive and progressive agrement for trans pacific partnership (CPTPP) कराराचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. CPTPP सोबतच आरसेपच्या बऱ्याच सदस्य देशांनी Comprehensive Economic Partnership Association (CEPAS) च्या वाटाघाटीत सहभाग घेतला आहे. तसेच पूर्व आशिया देशासोबत झालेल्या वाटाघाटीतही सहभाग घेतला आहे.

आरसेपच्या सदस्य देशांतील वाटाघाटी

नुसार त्यांनी आयात प्रशुल्कातील आश्वासित केलेली भरीव स्वरूपाची कपात भारतास आव्हानात्मक आहे. २०१८ या वर्षासाठी भारतातील प्रशुल्काचा (Tariff Profile) विचार केल्यास कृषी व बिगरकृषी वस्तूंवरील प्रशुल्काची आरसेप देशांशी तुलना केल्यास त्यात बरीच विसंगती आढळते. भारताचे कृषी उत्पादनावरील सरासरी प्रशुल्क हे बरेच जास्त असून २०१८ मध्ये ते सरासरी ३८.८ टक्के होते. भारतातील कृषी वरील सरासरी आयात कर हे बहुतांश आरसेप सदस्य देशांच्या कृषीवरील दरापेक्षा बरेच उच्च स्तरावर आढळतात.

कृषीवरील कमाल प्रशुल्क दराचा विचार केल्यास भारताचे कृषी उत्पादनावरील कमाल प्रशुल्क १५० टक्के होते. मलेशियाची तुलना करता ते बरेच कमी आहे (मलेशियाचे १००० टक्के पेक्षा जास्त) तसेच जपान व रिपब्लीक ऑफ कोरीयाचे कृषीवरील कमाल प्रशुल्क अनुक्रमे ७२३ व ८८७ टक्के आढळते. मात्र न्युझीलंड, फिलिपीन्स, सिंगापूर, व्हेएतनाम यथील कृषीवरील कमाल प्रशुल्क दर अनुक्रमे ५ टक्के, ६५ टक्के, ९९ टक्के, १३५ टक्के होता.

**तक्ता क्रं १**

**आरसेप विशिष्ट सदस्य देशांचे प्रशुल्क** (Tariff Profile)

| क्र. न. | देश | वर्ष | सरासरी प्रशुलक दर % | | आयात नसलेली कर उत्पादने % एकूण | | कमाल आयात शुल्क % | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **बिगर कृषी उत्पादने** | कृषि उत्पादने | **बिगर कृषी उत्पादने** | कृषि उत्पादने | **बिगर कृषी उत्पादने** | कृषि उत्पादने |
| 1 | भारत | 2018 | 13.6 | 38.8 | 1.8 | 3.1 | 125 | 150 |
| 2 | ऑस्ट्रेलिया | 2018 | 2.7 | 1.2 | 46.9 | 76.8 | 5 | 23 |
| 3 | चीन | 2018 | 8.8 | 15.2 | 7.2 | 7.2 | 50 | 65 |
| 4 | इंडोनेशिया | 2018 | 8.0 | 8.6 | 13.8 | 8.5 | 16.4 | 150 |
| 5 | जपान | 2018 | 2.5 | 15.7 | 55.8 | 35.7 | 357 | 723 |
| 6 | रिपब्लीक ऑफ कोरीया | 2018 | 6.7 | 57.0 | 16.6 | 5.5 | 504 | 887 |
| 7 | मलेशिया | 2017 | 5.3 | 7.9 | 64.9 | 74.7 | 60 | 1000 पेक्षा जास्त |
| 8 | न्यूझिलंड | 2018 | 2.1 | 1.4 | 63.7 | 72.4 | 45 | 5 |
| 9 | फिलीपाईन्स | 2018 | 5.6 | 9.8 | 12.6 | 12.6 | 30 | 65 |
| 10 | सिंगापूर | 2018 | 00 | 0.1 | 100 | 99.8 | 100 | 99 |
| 11 | थायलंड | 2017 | 7.3 | 24.0 | 40.5 | 12.4 | 116 | 181 |
| 12 | व्हिएतनाम | 2018 | 8.4 | 16.5 | 38.6 | 15.6 | 28.9 | 135 |

स्रोत : Tariff Profile of Members Provided by the WTO data base.

२०१८ या वर्षी बिगर कृषी उत्पादनाच्या बाबतीत रिपब्लिक ऑफ कोरियाचा कमाल प्रशुल्क दर ५०४ टक्के होता. तर जपानचे ३५७ टक्के होता. भारताच्या संदर्भात हा कमाल प्रशुल्क दर त्यांच्या तुलनेत बरेच कमी म्हणजे १२५ टक्के होता. ऑस्ट्रेलियात बिगर कृषी उत्पादनावरील कमाल प्रशुल्क फक्त ५ टक्के असून ते सर्व आरसेप देशांच्या विचार केल्यास कमीत कमी होते. कृषी उत्पादनाच्या संदर्भात न्यूझीलंडचा कमाल आयात दर हा फक्त ५ टक्के असून तो सर्व सदस्य देशांत कमीत कमी होता.

भारताच्या आयात प्रशुल्काच्या बाबतीत २०१८ पूर्वीच्या अलीकडील वर्षातील प्रशुल्काशी तुलना केल्यास आयात प्रशुल्कात सरासरी तीन टक्क्यांनी वाढ झालेली दृष्टीस पडते. भारत शासनाने वस्तू निर्माण व कृषी उत्पादनातील संवेदनशील (sensitive) वस्तूंना परकीय स्पर्धेपासून संरक्षणाची आवश्यकता भासल्याने आयात प्रशुल्कात वाढ करणे अनिवार्य ठरविले.

**आरसेपच्या वाटघाटीत भारताने सुरुवातीस दिलेल्या सवलती :**

या सवलती एशियन व इतर सदस्य देशांना वेगवेगळया होत्या. भारताने एशियन सदस्य देशांना ८० प्रशुल्क लाईनच्या बाबतीत ते रद्द करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार ह्या प्रशुल्क लाईनच्या बाबतीत आरसेप मध्ये प्रवेश झाल्यावर ताबडतोब ६० टक्के प्रशुल्क लाईनवरील आयात शुल्क रद्द केले जाईल. तर १५ टक्के प्रशुल्क लाईनच्या बाबतीत येणाऱ्या दहा वर्षाच्या कालावधीत हे प्रशुल्क रद्द करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. जपान व रिपब्लिक कोरिया च्या बाबतीत ६५ टक्के प्रशुल्क लाईनवरील आयात शुल्क येत्या दहा वर्षाच्या कालावधीत रद्द करण्याचे आश्वासन दिले. ज्या देशांशी मुक्त व्यापार करार अस्तित्वात नाहीत त्यांच्या संदर्भात उदा. चीनच्या संदर्भात भारताने ४२.५ टक्के प्रशुल्क लाईन वरील प्रशुल्क रद्द करण्याचे (चीनच्या बाबतीत) मान्य केले तसेच न्यूझीलंडच्या बाबतीत ६२.५ टक्के तर ऑस्ट्रेलिया साठी ८० टक्के हटविण्याचे पुढील दहा वर्षाच्या कालावधीत मान्य केले.

आर्थिक क्षेत्रानुसार विचार केल्यास भारताने आशिआन (ASEAN)सदस्य देशांकडून आयात केल्या जाणाऱ्या ४० टक्के कृषी उत्पादनावरील प्रशुल्क रद्द करण्याचे मान्य केले. यातील ३५ टक्के उत्पादनावरील प्रशुल्क हा करार झाल्या बरोबर रद्द करण्यात येईल तर उरलेले येत्या दहा वर्षाच्या कालावधीत रद्द केले जाईल असे आश्वासन दिले. परंतु आशियन व्यतिरिक्त इतर सदस्य देशांना भारताने कृषी उत्पादना वरील प्रशुल्क रद्द करण्याच्या बाबतीत जसे की चीनच्या बाबतीत १५ टक्के उत्पादनावरील प्रशुल्क रद्द करण्याचे भारताने मान्य केले व ते सुद्धा दहा वर्षाच्या कालावधीत केले जाईल तर जपान व रिपब्लिक ऑफ कोरियाच्या बाबतीत प्रशुल्क रद्द केले जाणारे नाही, असे वाटाघाटीत सांगितले. बिगर कृषी उत्पादनाच्या संदर्भात भारताने दिलेली आश्वासने उदारीकरणाच्या अधिक जवळची आढळतात. कारण बिगरकृषी उत्पादनाच्या बाबतीत ८६ टक्के प्रशुल्क लाईन येत्या दहा वर्षाच्या कालावधीसाठी आरसेप सदस्यांना खुल्या (without tariff) होतील.

७० टक्के कृषी उत्पादनात उत्पादनावरील प्रशुल्क लाईन आरसेपची अंमलबजावणी झाल्या

बरोबर खुल्या होतील. जपान व रिपब्लिक ऑफ कोरियाने(ROK) भारताने बिगर कृषी उत्पादनावरील प्रशुल्क रद्द करून आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करण्याचा प्रस्ताव सादर केला असून आरसेप करारावर सह्या झाल्यावर त्याची अंमलबजावणी पुढील दहा वर्षात होईल असा प्रस्ताव दिला. चीनसाठी सुद्धा येत्या दहा वर्षात जवळ जवळ ५० टक्के प्रशुल्क लाईन्स खुल्या करण्यात येतील परंतु सध्याच्या परिस्थितीत कोणतेही प्रशुल्क रद्द करण्याच्या प्रस्ताव भारताने चीन साठी सादर केला नाही. भारताने सुरुवातीला आरसेपच्या सदस्य देशांना प्रस्तावाच्या रुपाने दिलेल्या सवलती स्वीकारण्यात आल्या नाही. सर्व सदस्य देशांनी त्या नाकारून एकच पद्धतीच्या प्रशुल्काचे सर्वांसाठी प्रयोजन करावे असा आग्रह धरला (२०१८). भारतात ऐशियन सदस्य देशांकडून आयात करण्यात येणारे ९० टक्के प्रशुल्क व चीनकडून आयात करण्यात येणारे ८० टक्के प्रशुल्क संपुष्टात आणून खुला व्यापार उपलब्ध करावा असा पण एक विचार मांडला गेला. (पटनायक २०१९) परंतु ह्याचा स्वीकार केल्यास त्याचा भारताच्या व्यापार विषयक आर्थिक धोरणावर विपरीत परिणाम होऊन त्याच्या स्वतंत्रपणे निश्चित केलेल्या धोरणांवर अंकुश येवून सध्याच्या मेक इंडिया (Make in India) तसेच इतर स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने निश्चित केलेल्या धोरणांशी ते सुसंगत ठरणार नाही असा दुसरा विचार पण मांडला गेला. तसेच भारतातील असुरक्षित कृषी व वस्तू निर्माण क्षेत्राचे संरक्षण करणे कठीण होईल असा पण युक्तिवाद करण्यात आला.

**परकीय गुंतवणुकीचे संरक्षण :**

गुंतवणुकीच्या संदर्भातील करार हे देखील आरसेपचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. आजपर्यंत झालेल्या वाटाघाटींवर जर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला तर तसेच या बहुतेक सर्व सदस्य देशांनी परकीय गुंतवणुकीवर जास्तीत जास्त संरक्षण मिळावे या दृष्टीने करारातील तरतुदी कराव्यात असा आग्रह धरला.

या गुंतवणूक करारातील तीन प्रकारच्या तरतुदी भारताच्या दृष्टीने होत्या.

१. मालमत्तेवर आधारित (Assest based) दिलेली गुंतवणूकीची व्याख्या भारताच्या दृष्टीने आक्षेपार्ह होती. ह्या व्याख्येनुसार परकीय कंपन्यांच्या कोणत्याही प्रकारच्या सहभाग हा गुंतवणूक म्हणूनच गृहीत धरला जाईल.
२. दुसरे म्हणजे अप्रत्यक्ष स्वामित्व हरण. ज्यायोगे परकीय गुंतवणुक करणाऱ्या कंपन्यांना गुंतवणूक यजमान देशाच्या सार्वजनिक धोरणांच्या बाबतीत आक्षेप घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले असते.
३. तिसरा अक्षेप Investor State Settelement Mechanism यासंदर्भात होता (विवाद निवारण यंत्रणा) यानुसार गुंतवण करणारा देश यजमान देशावर एखाद्या विवादा संदर्भात प्रायव्हेट इंटरनॅशनल ट्रीब्युनल मध्ये तक्रार करू शकतो.

अलीकडील काळात Investor State Dispute Settlement (ISDS) च्या बऱ्याच केसेस या न्यायाधिकरणा समोर येत आहेत २०१३ ते २०१८ दरम्यान या अधिकाऱ्यांच्या समोर आलेल्या केसेस मधील ४५ टक्के केसेस गुंतवण विवाद निवारण संदर्भात होत्या.

भारतात व इंडोनेशिया या दोन देशांनी बऱ्याच व्दिपक्षीय (Bilateral Investment

Treaties) गुंतवणूक करार रद्द केले. भारताने ८३ पैकी ५८ तर इंडोनेशिया ने १७ द्विपक्षीय गुंतवणूक करार रद्द केले.

**इलेक्ट्रॉनिक कॉमर्स व्यापार** (E-Commerce **:**

आरसेपच्या वाटाघाटीत सहभागी होई पर्यंत भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर किंवा व्यासपिठावर इलेक्ट्रॉनिक व्यापार संबंधीच्या चर्चेत भाग घेतला नव्हता. कारण व्यापारामुळे भारतास ई-व्यापारामुळे भारताच्या अर्थकारणावर व संरक्षणावर होणाऱ्या परिणामांच्या बाबतीत स्पष्टता हवी होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर ही ई-व्यापाराच्या संदर्भात माहितीच्या मुक्त स्त्रोतामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांच्या परिणामाबद्दल ज्या शंका होत्या त्याचे देखील पूर्णपणे निराकरण होणे क्रमप्राप्त होते.

ई-व्यापाराच्या व्याख्या स्पष्ट झाल्या शिवाय त्यावर लावलेल्या आयात प्रशुल्का बद्दल निर्णय घेणे शक्य नव्हते. आरसेपच्या सदस्य देशांच्या अंतर्गत इलेक्ट्रॉनिक परिषणावर कोणतेही आयात प्रशुल्क आकारले जाणार नाही असे त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रथेनुसार ठरविले. ही प्रथा मिनीस्टेरीयल डिक्लेरेशन ऑन ग्लोबल इलेक्ट्रॉनिक कॉमर्स नुसार WTO सदस्यांनी अंगीकारली होती

**आरसेपचा भारताच्या व्यापारावरील संभाव्य परीणाम :**

भारत व एशिआन, जपान, रिपब्लिक ऑफ कोरिया यांच्यातील व्यापाराच्या व्दिपक्षीय (FTA) करारांचा आढावा घेतल्यास आपल्यास व्यापार तुटच निदर्शनास येते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतात खुल्या बाजारपेठेमुळे निर्माण झालेल्या संधीच्या लाभ घेण्यास भारत असमर्थ ठरला. जपान व रिपब्लिक ऑफ कोरिया यांच्याशी निर्यात केलेल्या निर्यातीचे lइवसनजम मूल्य २०१०-११ ते २०१५-१६ आणि २०१६-१७ दरम्यान घसरलेले आढळते. मात्र आरसेपच्या सदस्य देशांकडून झालेल्या आयातीत मात्र या कालावधीत वाढ झालेली दिसते. आशियन (ASEAN) देशांकडून झालेल्या आयातीत १३० टक्के तर रिपब्लिक ऑफ कोरिया कडून झालेल्या आयातीत ६० टक्के वाढ झालेली दृष्टीस पडते. यावरून व्दिपक्षीय खुल्या व्यापार (FTA) करारातील सदस्य देशांनी उपलब्ध बाजारपेठेचा फायदा घेऊन भारतात त्यांची निर्यात वाढविण्यात यश मिळविले. परंतु भारताला मात्र FTA मुळे प्राप्त झालेल्या आयातीवरील प्रशुल्क सवलतीचा लाभ उठवता आला नाही असे दिसते.

भारताची सर्व FTA सदस्य देशांशी भांडवली वस्तूंच्या व्यापारात तूट झालेली निर्दशनास येते. मात्र ग्राहकोपयोगी वस्तूंच्या बाबतीत आशियन (ASEAN) सदस्य देश व जपानशी व्यापारात अधिक्य आढळते. आशियन सदस्य देशाशी भारताचे ग्राहकोपयोगी वस्तूंच्या संदर्भात अधिक्य (surplus) आढळते. जपान व रिपब्लिक ऑफ कोरिया यांना भारतातून कच्च्या मालाची निर्यात केली जाते व त्यांच्याकडून अर्ध वस्तू उत्पादने व संपूर्ण उत्पादने यांची आयात केली जाते. यावरून FTA सदस्यांच्या बरोबर केलेल्या व्यापारात मूल्यवृद्धी चे प्रमाण फारच कमी आढळते.

**भारताचा चीनशी व्यापार :**

चीनने भारताच्या बाजारपेठेत नवीन मिलेनियमची सुरुवात झाल्यापासूनच शिरकाव केलेला दिसतो २००३-०४ यावर्षी भारताची चीनशी केवळ एक मिलियन डॉलर एवढी व्यापार तूट होती. ती गेल्या चौदा वर्षात वाढून ६३ बिलियन डॉलर झाली.

ही तूट चीनमधून वाढत चाललेल्या आयातीमुळे ०४ बिलियन डॉलर (२००३) ते ७७ बिलीयन, (२०१७-१८) डॉलरपर्यंत वाढलेल्या आयातीत दिसते. या कालावधीत चीनला केलेली निर्यात मात्र तीन ते १३ बिलियन डॉलर पर्यंत वाढलेली दिसते.

भारताच्या चीनशी असलेल्या व्यापार व्यवहार वसाहत स्वरूपाचा व्यापार (Colonial Pattern) दाखवितो. त्यात भारत हा कच्चा मालाची निर्यात करून पूर्ण वस्तू उत्पादनाची आयात करतो. तसेच भारत भांडवली वस्तू व अर्ध सिद्ध वस्तूंची चीनकडून आयात करतो. २०१०-१८ या कालावधीत ग्राहकोपयोगी वस्तूंची देखील आयात करण्यात आली. भांडवली वस्तूंची व ग्राहक उपयोगी वस्तूंची आयात वरील कालावधीत दुप्पट झाली यावरून भारताचे वस्तू निर्माण क्षेत्र हे चीनवर बऱ्याच मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे दिसते. भारताचे औषधी निर्माण क्षेत्र देखिल चीनवर काही वस्तूंच्या आयातीसाठी अवलंबून असते. (Active Pharmaceutical Inegreditant). आपण जागतिक बाजारपेठेत स्वस्त औषधी वस्तूंची निर्यात करतो पण त्यातील काही Ingredients साठी आपणास चीनवर अवलंबून राहावे लागते.

**भारताची आरसेप करारातून माघार :**

भारताचे आरसेप करारातून परावृत्त होण्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे वाढती व्यापारी तूट. आरसेप करारावर स्वाक्षरी केल्यावर आयात प्रशुल्काचे हटविणे अनिवार्य होऊन भारतातील उद्योगांना व त्यांना तसेच कृषीला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्वत:ला टिकाव करणे अशक्य होईल भारतातील अकार्यक्षम उद्योगांना व कृषी उत्पादने (दुग्ध उत्पादने) यांच्यावर त्यांच्या विपरीत परिणाम होऊन ते बंद पडतील अशा प्रकारच्या युक्तिवाद केला जात आहे.

स्वदेशी उद्योगांच्या रक्षणासाठी आयकर वाढविणे अपरिहार्य आहे अशी भूमिका भारताने स्वीकारून आरसेप वर स्वाक्षरी करण्यास माघार घेतली. आयात केलेल्या स्वस्त वस्तूंमुळे भारतातील उद्योग बंद पडून त्यांच्या रोजगारावर विपरित परिणाम होण्याची शक्यता देखील भारताच्या या भूमिकेमागे होती. परंतु मुक्त व्यापार करारामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे जर काही अकार्यक्षम उद्योग बंद पडत असतील व त्यातील रोजगारावर गदा येत असेल तर त्या उद्योगांत तंत्रज्ञान सुधार करून त्यांना आंतराष्ट्रीय स्पर्धेत सक्षम करणे अधिक योग्य होईल. उद्योगांच्या दीर्घकालीन क्षमतेच्या दृष्टीने उद्योगांची उत्पादकता वाढविणे अधिक महत्त्वाचे आहे. तसेच रोजगार गमावणाऱ्यांचे पुनर्वसन देखील इतर कार्यक्षम उद्योगात करता येणे शक्य होईल.

याव्यतिरिक्त इतर बाबींचा देखील येथे उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. भारताने सेवांच्या व्यापाराच्या संदर्भात मागण्यांची परिपूर्ती इतर सदस्य देशांनी करण्याचे टाळले. सेवांच्या आयातीवरील सर्व निर्बंध दूर करून भारतास आंतरराष्ट्रीय स्तरावर खुला शिरकाव उपलब्ध करून द्यावा याबाबतची मागणी मान्य झाली नाही. तसेच बिगर प्रशुल्क अडथळ्यांचा (Non-tariff barriers) देखील स्पर्धकांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात चांगलाच उपयोग केला आहे. उदा. जपानने Advance Language degree in Japani Language असल्या शिवाय डॉक्टर व मेडीकल तज्ञांना तेथिल रूग्णांवर उपचार करण्यावर निर्बंध घातले आहेत. चीनने विशिष्ट

बंदरावर विशिष्ट वस्तूंची आयात करणे बंधनकारक केले आहे जर दुसऱ्या बंदरावर ह्या वस्तूंची निर्यात झाली तर ती माघारी पाठविण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रकारचे धोरण चीन राबवित आहोत.

यूएसए ने देखील New York Harbour Maintenance Cess लावून न्यूयॉक बंदरावर प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वस्तूंच्या आयातीवरील कर लावून आंतरराष्ट्रीय व्यापारातील खुलेपणावर अंकुश किंवा निर्बंध आणले आहेत. म्हणजे प्रशुल्क रद्द करूनही आंतरराष्ट्रीय व्यापारावर इतर प्रकारचे निर्बंध आहेत.

**भाग २**

**आरसेप व भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवहार (वस्तू व सेवा)**

२०१८-१९ या वर्षासाठी आरसेपच्या सदस्य देशांशी असलेल्या वस्तू व्यापाराचा संक्षिप्त पणे आढावा घेतल्यास आयातीचे मूल्य १५८.९ बिलीयन डॉलर निर्यातीचे मूल्य ६०.१ बिलीयन डॉलर आढळते. व्यापार तूटीचे त्या वर्षीचे अनुमान ९८.८ बिलीयन डॉलर अनुमानित करण्यात आले आहे.

२०१८-१९ या वर्षासाठी भारताच्या जागतिक व्यापाराचे मूल्य आयातीच्या संदर्भात ४६९.९.बिलीयन डॉलर तर निर्यात मूल्य २९६.८ बिलीयन डॉलर अनुमानित केले आहे. (मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स व इंडस्ट्री) भारताची जागतिक व्यापारातील तूट १७२.९ बिलीयन डॉलर अंदाजित केली आहे.

आरसेपच्या सदस्य राष्ट्रांचा एकूण वस्तू-व्यापाराच्या निर्यातीतील हिस्सा २०.२५ प्रतिशत तर आयातीतील हिस्सा ३३.८ प्रतिशत अनुमानित करण्यात आला असून तूटीतील हिस्सा ५९.१ टक्के अनुमानित केला आहे.(२०१७-१८)

**भारताचा सेवा क्षेत्रातील व्यापार :**

सेवांच्या बाबतीत भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्थान बरेच अनुकूल दिसते. भारताची सेवांच्या संदर्भातील व्यापार तूट फक्त ४ बिलीयन डॉलर अनुमानित करण्यात आली असून निर्यात व आयात मूल्याचे अनुमान अनुक्रमे १०.९ व १४.९ बिलीयन डॉलर अंदाजित केले आहे.

ऑस्ट्रेलियाच्या बाबतीत सेवा व्यापारात (०.९ बिलीयन डॉलर ) आधिक्य निदर्शनास येते. जपानशी मात्र सेवा व्यापारात सर्वाधिक तूट (२.२ बिलीयन डॉलर) दिसते. त्यानंतर ॲशियन सदस्य देशांशी १.५ बिलीयन डॉलरची तूट दिसते. सर्वात कमी व्यापार तूट न्यूझीलंडशी (०.१ बिलीयन डॉलर) आढळते. एकूण वस्तूपेक्षा सेवांच्या व्यापार व्यवहारात भारताचे स्थान अनुकूल असल्याचे प्रत्ययास येते.

**आरसेपच्या करारातून भारताची माघार :**

भारताने नोव्हेंबर २०१९ पर्यंत झालेल्या वाटाघाटीत व चर्चेत भाग घेतला परंतु करारावर स्वाक्षरी करण्यापासून तो परावृत्त झाला. खालील परिच्छेदात आपला विरोध होण्यामागील मुद्द्यांच्या थोडक्यात परामर्श घेण्यात आला आहे.

१. आरसेप करारास विरोध करणाऱ्यांच्या दाव्यानुसार हा करार राष्ट्रविरोधी आहे. कारण या करारात समाविष्ट असलेल्या देशांमधून भारतात मोठया प्रमाणात आयात वाढेल व त्यामुळे त्याच्या व्यवहारात व्यापार वर विपरीत परिणाम होईल

२. आशियन देशातील रबर, नारळ, कॉफी, वेलदोडे वगैरेसारखी स्वस्त शेती उत्पादने तसेच

ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांमधून दूध व दुग्धजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आयात होण्याची शक्यता असल्याने त्याची भारतातील ग्रामीण व शेती अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल.

३. चीन व आरसेपच्या इतर सदस्य देशांमधून स्वस्त वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणात झाल्याने भारतातील छोटे, लघु व मध्यम उद्योग धंदे बंद पडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे लाखो स्वयंरोजगार व इतर उद्योगातील रोजगार बंद पडतील.

४. मोठ्या उद्योगांचे भवितव्य देखील आरसेपच्या सदस्य देशांकडून केलेल्या आयातीमुळे (पोलाद, व वस्त्र उद्योग) धोक्यात येईल.

कृषी क्षेत्र व लघु उद्योगांच्या तसेच इतर उद्योगांच्या सुरक्षिततेसाठी व स्वयंपूर्णतेसाठी भारताने या करारावर स्वाक्षरी घेण्यापासून माघार घेतली आहे.

**संदर्भ सूची :**


1. India after RCEP : Economic Times - Magazine , November 10-16, 2019
2. लोकसत्ता - ६ नोव्हेंबर आरसेप टाळणे हा उपाय नव्हे, (सागर वाघमारे)
3. India after RCEP : Economic Times - Magazine, November 10-16, 2019
India is withdrawal from the Regional Comprehensive Economic Partnership - Biswajit Dhar, EPW , Nov.16, 2019 vol. Liv. No.45
4. Ajit Roy Ajit (2019) - In National Interest, 'The Hitavada', 6th Nov.


◆◆◆

# ओला दुष्काळ : स्वरूप, परिणाम व उपाय

**वनिता चोरे**
सहयोगी प्राध्यापक
(कै.) एन.ए.देशमुख महाविद्यालय,
चांदूरबाजार

**जे.व्ही.गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**आर.बी.भांडवलकर**
सहयोगी प्राध्यापक
अमोलकचंद महाविद्यालय,
यवतमाळ

(जगदंबा महाविद्यालय, अचलपूर येथे 'ओला दुष्काळ' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. त्या परिसंवादात तीन वक्त्यांचा सहभाग होता. त्याच्या आधारावर तीन वक्त्यांकडून लेख तयार करून घेतला. विभाग 'अ' मध्ये वनिता चोरे, विभाग 'ब' मध्ये जे.व्ही.गायकवाड आणि विभाग 'क' मध्ये आर.बी. भांडवलकर यांचे विचार आले आहेत.)

## विभाग 'अ'
## (स्वरूप)

**प्रास्ताविक :**

जागतिक हवामान बदलाचा परिणाम जगामध्ये सर्वत्र निदर्शनास येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थाही त्यामध्ये आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून आजही प्राथमिक क्षेत्र, कृषिक्षेत्रावर भारतातील ५८.९७ प्रतिशत लोकसंख्या विसंबून आहे. किंबहुना रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. परंतु आज हवामान बदलामुळे कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना भीषण समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये सर्वात मोठी समस्या म्हणजे दुष्काळ आहे. दुष्काळ सदृश्य स्थितीला सामोरे जाण्याकरिता सरकारची धोरणे, दीर्घकालीन उपाययोजना कशी असावी हे प्रश्न निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये गेल्या दशकात २०१०-२०२० मध्ये दुष्काळ सदृश्य स्थितीमध्ये २०१३ मध्ये ऐतिहासिक अतिवृष्टीमुळे निर्माण झालेला ओला दुष्काळ व २०१९-२०२० मध्ये निर्माण झालेला ओला दुष्काळ यामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची बदलती स्थिती विशेषत: कृषी क्षेत्रासंदर्भातील स्थितीचे विश्लेषण, विशेषत: परिणाम व उपाययोजना यांचे विवेचन या लेखात केले आहे.

दुष्काळाचे स्वरूप :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी उत्पादनातील वाढ प्रतिहेक्टर १ प्रतिशतपर्यंत होती. ती या दशकामध्ये ०.१० प्रतिशत पेक्षा कमी आहे. वास्तविक लोकसंख्या वाढ व आर्थिक वृद्धि दर वाढीच्या वेगामध्ये व्यस्त प्रमाण आहे. आर्थिक वृद्धी दर नियोजनातील उद्दिष्टापेक्षा कमी होत आहे. सांख्यिकीय माहितीच्या आधारे कृषी क्षेत्रातील पिकांची आणेवारी घटत असतांना दिसून येते. व्यापारी पिकांच्या उत्पादन वाढीपेक्षा अन्नधान्य उत्पादन वाढीची गती कमी होत आहे. राज्यनिहाय उत्पादन वाढ भिन्न आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये उत्पादन वृद्धिदर १.५६ पेक्षा कमी आहे. त्यामुळे कृषी उत्पादन संदर्भात विविध समस्या निर्माण होत आहे.

दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण होण्याची प्रमुख कारणांमध्ये प्रामुख्याने हवामान बदल, महाचक्रीवादळ, क्यार वारे, आधुनिक तंत्रज्ञानाचा विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर वापर, पर्यावरणातील

बदल, उत्सर्जन, विकासाची बदलती व्यूहरचना, कार्बन डाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण या सर्वांचा परिणाम म्हणजे मान्सूनची प्रतिकूलता व त्यामुळे निर्माण होणारा मुख्य प्रश्न म्हणजे दुष्काळ. कधी कमी पावसामुळे कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ. सद्य:स्थितीत संपूर्ण महाराष्ट्राला अतिवृष्टीने ग्रासले आहे. नव्हेतर महाराष्ट्र राज्यामध्ये या दशकामध्ये कमी-अधिक प्रमाणात दुष्काळाची स्थिती आहे. मागील चार वर्षात कोरडा दुष्काळ व या वर्षात ओला दुष्काळ आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये वाढत्या औद्योगिकीकरणामुळे जीवाश्म इंधन (Fossils) मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे मोठ्या प्रमाणावर उत्र्सजन होते. अमेरिका, चीनमध्ये उत्सर्जन सर्वात जास्त असून भारतामध्येही उत्र्सजन होत आहे. विकसनशील देशांनी कार्बन डाय ऑक्साईड चे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. हरित गृहांमधून निघणाऱ्या वायुद्वाराही कार्बन डाय ऑक्साइड बाहेर पडतो. भारतामध्ये हे प्रमाण वाढत असून ते कमी करण्याकरिता प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.

भारतामध्ये दुष्काळाची स्थिती प्रादेशिक स्तरावर भिन्न आहे. दुष्काळाची स्थिती म्हणजे नैसर्गिक समस्या. ही इतरांपेक्षा भिन्न असते. ही स्थिती आर्थिक, पर्यावरण व सामाजिक क्षेत्राला विशिष्ट काळात नुकसानकारक ठरते, कारण दुष्काळ हा सर्वच विभागातील हवामान विविधतेचा भाग आहे. त्यामुळे दुष्काळाचे स्वरूप, समस्या व उपाययोजना भिन्न आहे. या अनुषंगाने मध्यम व जास्त पावसाच्या प्रदेशातील कृषी क्षेत्राच्या संशोधनाकडे दुर्लक्ष होता कामा नये. दुष्काळामुळे कोरडवाहू शेतीचे प्रश्न अजून गंभीर होऊन शेतकरी आत्महत्येकडे वळत आहे. महाराष्ट्रामध्ये आजही सरासरीने दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. विदर्भामध्येही शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे दुष्काळाचे नियंत्रण करण्याकरिता विविध दीर्घकालीन योजना विकसित करणे गरजेचे आहे.

**दुष्काळाची स्थिती :**

जून ते सप्टेंबर या कालावधीत कमी किंवा जास्त पावसाच्या प्रमाणामुळे दुष्काळाची स्थिती निर्माण होते. साधारण: जून ते सप्टेंबर या कालावधीत जेथे ५० मि.मि. ते ११५० मि.मि. पेक्षा सरासरीने पाऊस जास्त आहे तेथे ओला दुष्काळ व जेथे ४५० मि.मि. पेक्षा सरासरीने पाणी कमी आहे तेथे कोरडा दुष्काळ या मापदंडाने पिकांच्या आणेवारीनुसार दुष्काळाची स्थिती निर्धारित केली जाते.

भारतामध्ये राष्ट्रीय कृषी आयोगाने दुष्काळाचे तीन प्रकारे वर्गीकरण केले आहे.

अ) हवामान विषयक

ब) कृषीविषयक

क) जलविषयक

महाराष्ट्रातील दुष्काळाची स्थिती यावर्षी फार भिन्न असलेले निदर्शनास येते. जून, जुलै मध्ये पावसाने सरासरी गाठली नाही. ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये धरणामध्ये पाण्याचा साठा कमी झाला. ऑक्टोबर मध्ये मात्र धरण क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळे नद्यांचा विसर्ग वाढला, नदीकाठच्या गावांना सतर्क करावे लागले. पुलावरून पाणी गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. अनेक व्यक्ती अडकून पडल्या, पिकांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. गावांत

पुराचे पाणी शिरले. एकीकडे पावसाची प्रतीक्षा करीत असतांना दुसरीकडे नदीकाठच्या गावांवर ओला दुष्काळ सहन करण्याची वेळ आली. परतीच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. कोट्यावधींचे नुकसान झाले. परतीच्या अवकाळी पावसामुळे ऐन दिवाळीत शेतकऱ्यांवर जणू संक्रात आली. साठ प्रतिशत शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. नोव्हेंबर व डिसेंबर पर्यंत अवकाळी पाऊस सुरूच होता. त्यामुळेही मोठे नुकसान झाले आहे. अतिपावसामुळे रोगांचा प्रादुर्भाव होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या. गावांमध्ये साथीचे आजार निर्माण झाले.

**महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळाचे स्वरूप :**

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये कृषिक्षेत्राचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. महाराष्ट्रामध्ये १९७३ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळावर मात करण्याकरिता तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी अनेक प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. अन्नधान्याची चणचण दूर करण्याकरिता हरितक्रांतीला प्राधान्य दिले. याचा परिणाम कृषी उत्पादनात वाढ झाली. परंतु ज्वारीच्या उत्पादनात मात्र ४२.२ लाख टनावरून ३४.७ लाख टनापर्यंत घट झाली.

महाराष्ट्र मागील चार दशकापासून दुष्काळाला सामोरे जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील दर हेक्टरी शेतमालाचे उत्पादन भारतातील दर हेक्टरी उत्पादनापेक्षा बरेच कमी आहे. महाराष्ट्रामध्ये साधारणत: जून ते सप्टेंबर दक्षिण-पश्चिमी मान्सून, बंगालचा उपसागर, अरबी समुद्राकडून वाहणाऱ्या मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. अनेक गावामध्ये अतिवृष्टीमुळे सरासरीने ७५० मि.मि. जास्त पाऊस पडल्यामुळे ओला दुष्काळ निर्माण झाला.

महाराष्ट्र अशा प्रकारे वारंवार पडणाऱ्या दुष्काळाला सामोरे जात आहे. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती बघता दुष्काळाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये आजही कृषीचे ८१.४ प्रतिशत क्षेत्र पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. काही भागात अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ, पूर येतात तर काही भाग कोरड्या दुष्काळाच्या छायेत असतो. सातत्याने हे चक्र फिरत आहे. महाराष्ट्रामध्ये २०१३ मध्ये जुलै अखेर पर्यंत विशेषत: विदर्भामध्ये ऐतिहासिक अतिवृष्टीमुळे पश्चिम विदर्भात अमरावती महसूल विभागात अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यात १.५ ते दुपटीने जास्त पाऊस पडल्यामुळे ओल्या दुष्काळाची स्थिती होती. ३,५०,००० हेक्टर शेतीखालील क्षेत्र हे पाण्याखाली आल्यामुळे खरीप पिकांचे ५० प्रतिशत पेक्षा जास्त नुकसान झाले. मागील चार वर्षापासून कोरडा दुष्काळ असतांना यावर्षी पुन्हा ओला दुष्काळाचे सावट महाराष्ट्रभर आहे.

जून, जुलै या महिन्यात सरासरी पेक्षाही कमी पाऊस होता. कोरडा दुष्काळ पडणार असे वाटत असतांनाच ऑगष्ट व सप्टेंबर मध्ये पावसाने सरासरी गाठली. शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होत असतांना ऑक्टोबर मध्ये परतीचा पाऊस व नोव्हेंबर मध्ये अवकाळी पावसाने शेतीक्षेत्राचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

महाराष्ट्र राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी ३२५ तालुक्यात या पावसाचा तडाखा बसला व मोठे संकट ओढावले. सप्टेंबर मध्ये मराठवाडा-विदर्भामध्ये धरणाची पातळी खाली गेलेली असतांना आज धरणे-बंधारे अतिवृष्टीमुळे भरले आहेत.

अवकाळी ९०% पावसाने महाराष्ट्रात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. ३२५ तालुक्यातील ५४,२२,००० हेक्टर वरील पिकांची वाताहत झाली त्यामुळे सोयाबीन, तूर, कापूस, फळबागा, बागायती क्षेत्रांचे मोठे नुकसान झाले. महाराष्ट्रामधील सहा महसूल विभागनिहाय नुकसानीचे आकडेवारी बघितल्यास कोकण - ४६ तालुके (९७,००० हेक्टर), नाशिक - ५२ तालुके (६,००० हेक्टर), पुणे - ५१ तालुके (२२ लाख हेक्टर), अमरावती-५६ तालुके (१२ लाख हेक्टर), नागपूर-४८ तालुके (४०,००० हेक्टर)

साधारणत: ५३ हजार हेक्टरवरील फळबाग, १ लाख ४४ हजार हेक्टर भात पीक, दोन लाख हेक्टर ज्वारी आणि बाजरी, ५ हेक्टरवरील मका, १९ लाख हेक्टरवर सोयाबीन आणि १९ लाख हेक्टरवर कापूस पिकांचे नुकसान झाले आहे.

मुख्य कारण हवामान बदल यामुळे पडणारा अवकाळी पाऊस, मानवी चंगळवादी जीवनमानमुळे पृथ्वीवरील संपूर्ण चित्रच पालटले. पूर्वी २७ नक्षत्रे होती. परंतु आता दुष्काळ आणि ढगफुटी अशी दोनच नक्षत्रे आहेत असे म्हटले जाते. अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटग्रस्त होऊन, शेतकऱ्यांची क्रयशक्ती कमी होऊन ग्रामीण अर्थकारणाला पुन्हा झळ पोहोचणार आहे.

## विभाग 'ब'
## (परिणाम)

**प्रस्तावना :**

दुष्काळ ही प्राचीन काळापासून चालू असलेली वस्तुस्थिती होय. दुष्काळ म्हणजे एकूण अन्नधान्याच्या प्रदीर्घ तीव्रतम तुटवड्यामुळे उद्‌भवणारी परिस्थिती असून ज्यामध्ये उपासमार, कुपोषण, गरिबी-बेकारी वाढते त्याचबरोबर लोकसंख्येच्या मूलदरात मोठ्या प्रमाणात वृद्धी होते. दुष्काळ हा निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित स्वरूपाचा आढळतो. निसर्गनिर्मित दुष्काळामध्ये सर्व लोकांची सरसकट उपासमार होऊन गुरे-ढोरे आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होते. आधुनिक काळात दुष्काळाचे श्रीमंतापेक्षा गरीब लोकांना अधिक गंभीर परिणाम भोगावे लागतात. साधारणपणे दुष्काळात किंमती वाढतात, बेकारी वाढते, बाजारात धान्य असूनही गरिबीमुळे बहुजन वर्गाला अन्नधान्य मिळत नाही. दुष्काळी परिस्थितीमध्ये अन्नधान्याच्या किंमती वाढतात. बाहेरून धान्य विकत घेणे अशक्य होते. त्यामुळे उपासमार, अर्धपोटी राहणे, कुपोषण अनुभवास येते. लोकांचे आरोग्य बिघडते. उपासमारीमुळे किंवा रोगराईमुळे मृत्यूही ओढवतो. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत दुष्काळाची वैशिष्ट्ये म्हणजे कौटुंबिक आणि ग्रामीण जीवन मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त आणि विस्कळीत होते.

भारतात पडणाऱ्या दुष्काळाची विविध कारणे आहेत. जसे देशातील पडणारा अनियमित पाऊस आणि हवामान बदल. जंगल तोड मोठ्या प्रमाणात, पूर व अवर्षण याचा शेतीवर अनिष्ट परिणाम होतो. दुष्काळामुळशेती उत्पादन घटल्यामुळे

वाहतुकीचे साधने अपुरी असल्याने धान्य वितरण प्रादेशिक जरुरीनुसार शक्य होत नाही. परिणामत: अनेक समस्यांना तोड द्यावे लागते. दुष्काळी परिस्थिती उद्भवल्यास (वारंवार) बेकारी वाढून चोऱ्याचे व दरोड्याचे प्रमाण वाढते. भिकाऱ्याची संख्या वाढते. सामाजिक अस्वस्थता वाढून गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होते. पिण्याचे पाणी, गुरांना चारा, किंमतीवर निमंत्रण ठेवता येत नाही. एकूण देशाच्या अर्थव्यवस्थेवर दुष्काळाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणाम होतांना आढळतात. संपूर्ण सजीव घटकावर (मानव, प्राणी, वनस्पती इत्यादी) प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याचे दिसून येते. दुष्काळाचे विविध परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) शेती क्षेत्रावरील परिणाम –**

बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे साधन आजही शेती क्षेत्र आहे. शेती क्षेत्रातील उत्पादनात मोठ्या प्रमाणात अनिश्चितता आढळते. वाढती लोकसंख्या रोजगारी अभावी शेती क्षेत्राकडे वळते. दुष्काळाचा सर्वात जास्त परिणाम शेतीवर होतांना आढळतो. शेतकरी, शेतमजूर आणि कृषीवर अवलंबून असणाऱ्या पूरक उद्योगांना याची मोठ्या प्रमाणावर झळ सहन करावी लागते. अलीकडे शेती हा व्यवसाय फायदेशीर नसल्याचे अनेक शेतकरी सांगत आहे. उत्पन्नापेक्षा उत्पादन व्यय जास्त येत असून शेती तोटच्याची होत चालली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येकडे प्रवृत्त होतांना दिसतो.

१९९५ ते २०१५ या काळात महाराष्ट्रात जवळपास ६५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजेच जवळपास दररोज ३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे स्पष्ट होते. मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या अभ्यासानुसार शेतकऱ्यांचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत असून आरोग्य व शिक्षणावरील खर्च वाढत आहे. उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ कसा साधायचा हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यातच दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास असे प्रश्न गंभीर होत असून शेती क्षेत्रावरील समस्येत वाद होऊन शेतमालाचे उत्पादन कमी होत आहे. शेतीमधील उत्पादन कमी आणि आधारभूत किंमतीचा अभाव यामुळे शेतकरीवर्ग गंभीर संकटात सापडलेला आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकार आर्थिक सहाय्य, मदत जाहीर करीत असले तरी प्रत्यक्षात गरजू शेतकऱ्यांपर्यंत ती मदत वेळेवर पोहचत नाही असे कृषीतज्ञ गिरीधर पाटील म्हणतात. थोडक्यात दुष्काळाचे सर्वात जास्त गंभीर परिणाम कृषीक्षेत्रावर होतात.

**२) कृषीवर आधारित उद्योगावर प्रतिकूल परिणाम**

दुष्काळाचे शेतीक्षेत्रावर जेवढे गंभीर परिणाम तेवढेच कृषीवर आधारित असणाऱ्या पूरक उद्योगावर होतात. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतमालाचे उत्पादन कमी होते. अनेक उद्योगांना पुरेसा कच्चा माल मिळत नसल्यामुळे उद्योग बंद पडतात उद्योग बंद पडल्यामुळे बेकारीत वाढ होते.

**३) ग्रामीण अर्थव्यवस्था ठप्प होते**

सध्याच्या काळात महाराष्ट्रात सार्वत्रिक ओला दुष्काळ मोठ्या प्रमाणात पाहवायास मिळतो आहे. हिवाळ्यात सुद्धा पाऊस पडत असल्याने हवामानाचे चक्र उलटे फिरत आहे का? असा प्रश्न सर्वासमोर पडतो आहे. हाताशी आलेले सोयाबीन कांदे, फळे, कापूस, तूर, अतिपावसामुळे नष्ट होत

असून ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर गंभीर समस्या निर्माण होत आहेत. दुष्काळाचा शेती व्यवसायावर आणि शेतीपूरक व्यवसायावर गंभीर परिणाम होत असल्यामुळे शेतकऱ्यांची/शेतमजूरांची क्रयशक्ती कमी होत आहे. उत्पन्न पुरेशे मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ठप्प होत असून अनेक श्रमिक व शेतकरी शहराकडे धाव घेत आहे. विविध अहवालातून पुढे आलेल्या माहितीनुसार दुष्काळाच्या प्रभावाखालील क्षेत्रात वाढ होत असल्याने ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारावर आणि बाजारपेठेवर मर्यादा येत असल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मंद गतीने वाटचाल करीत आहे.

**४) स्थलांतराच्या प्रमाणात वाढ**

दुष्काळामुळे स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ग्रामीण भागातून रोजगाराच्या शोधात गावच्या गाव स्थलांतरित होत असून गावे ओसाड होत आहेत. अमरावती जिल्ह्याचा विचार करता मेळघाट-धारणी विभागातील अनेक कुटुंबे शहराकडे धाव घेतांना आढळतात. स्थलांतराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून शहरीभागातील समस्येत वाढ होत आहे.

**५) जीवनावश्यक वस्तूच्या किंमतीत वाढ**

दुष्काळाचा गंभीर दुष्परिणाम म्हणजे वस्तूंच्या किंमतीत भरमसाठ वाढ होतांना आढळते. रोजच्या जेवणातील कांदा, लसूण, भाजीपाला, तेल, डाळी, फळे यांच्या किंमतीत वेगाने वाढ झालेली दिसून येते. परिणामतः लोकांना पुरेशा प्रमाणात या सर्व वस्तू त्यांच्या उत्पन्नात घेता येत नाहीत. संतुलित आहाराचे उद्दिष्ट्ये साध्य होत नाहीत. त्यामुळे आरोग्य बिघडते. जीवनावश्यक वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे सरकारला त्यात हस्तक्षेप करावा लागतो. वेळप्रसंगी अनेक वस्तू इतर देशातून आयात करून देशातील जनतेला कमी किंमतीत पुरविण्याचे काम सरकारला करावे लागते. सरकारला याबाबतीत आर्थिक भार सहन करावा लागतो आहे. अवकाळी पावसामुळे तेलबियांचे आणि भाजीपाला, फळे यांचे भाव वाढत असल्याने गृहिणीचे बजेट कोलमोडले आहे.

**६) राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँकांचे व्यवहार ठप्प**

दुष्काळाचे सावट सर्वच क्षेत्रावर येत असल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. शेती पेरणीसाठी आणि इतर कामासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावयाची हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा होतो. बहुतांश सहकारी पतपेढ्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँका शेतीला अल्प आणि मध्यम मुदतीची कर्जे हे उपलब्ध करून देतात. दुष्काळी परिस्थिती उद्‌भवल्याने कर्जाची परतफेड नियमित होत नाही. परिणामतः बँकांचा एन.पी.ए. वाढतो. दुष्काळामुळे शेतकरी वर्गाला कर्जमाफी मिळत असल्याने श्रीमंत शेतकरी सुद्धा कर्जाचे हप्ते बँकाकडे भरीत नाहीत. परिणामतः बँकांचे व्यवहार कमी होऊन थकबाकीचे प्रमाण वाढते.

**७) अन्नसुरक्षा धोक्यात**

अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे मोठे काम शेतकरी वर्ग करीत आहे. संकरित बी-बियाणे, सुधारित जातीचे वाण, रासायनिक खते, शेतीमधील प्रगत तंत्रज्ञान, सिंचनाच्या सुधारित पद्धतीचा अवलंब यामुळे शेतीचे उत्पादन वाढत आहे. परंतु गेल्या काही वर्षामध्ये शेती करण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला असून लागवडीचे क्षेत्र सर्वत्र एक सारखे दिसत आहे. शेतकरी वर्ग रोख

पिकाकडे जसे कापूस, सोयाबीन इत्यादी कडे वळत असून बहुपिक पद्धतीचा त्याग करीत आहे. एकूण उत्पादनात वाढ करण्याचा दबाव शेतकऱ्यांवर येते आहे. वाढत्या लोकसंख्येकरिता अतिरिक्त अन्नधान्याचे उत्पादन होणे आवश्यक आहे.

परंतु भारतात आणि महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असल्याने अपेक्षित उत्पादन होत नाही. गरीब वर्गाकरिता (बीपीएल) शासकीय धान्य वितरण केंद्रामार्फत अन्नधान्याचे (कमी किंमतीतील) वितरण थांबवून अन्नसुरक्षा धोक्यात येण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणजेच अन्नसुरक्षा व्यवस्था सर्वांची कशी करावयाची हा गंभीर प्रश्न भविष्यामध्ये सरकार समोर उभा होत आहे.

**८) बेकारीत वाढ**

दुष्काळी परिस्थितीमुळे रोजगार कमी होतो. ओला दुष्काळ असो अथवा कोरडा दुष्काळ, दुष्काळामुळे विद्यमान अर्थव्यवस्थेत बेकारी वाढते. नाबार्ड तत्कालीन अध्यक्ष मा. प्रा.आर.रामकुमार यांनी म्हटले आहे की शेतमजुरांना वर्षाकाठी १५० ते १६० दिवस रोजगार मिळतो. म्हणजेच जवळपास ५ ते ६ महिने काम मिळते. बाकीच्या वेळी रोजगार मिळत नाही. दुष्काळामुळे तर आणखीन कमी दिवस रोजगार उपलब्ध होतो. शेतीतील दुष्काळामुळे रोजगार हमी योजना अथवा मनरेगाद्वारे १०० दिवसाचा रोजगार उपलब्ध करून दिला जातो. थोडक्यात दुष्काळामुळे ग्रामीण भागातील बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ होते.

**९) आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम**

दुष्काळी परिस्थितीचा आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होतो. जी.डी.पी. मध्ये वाद करावयाची असल्यास शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राचे उत्पादन कार्य वाढणे आवश्यक आहे. १० टक्के आर्थिक वृद्धिदराचे उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भांडवली गुंतवणूक सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आवश्यक आहे. परंतु ओल्या दुष्काळामुळे गुंतवणूक कमी होते. शेतमालाचे उत्पादन कमी होऊन त्याचा उद्योगधंद्यावर परिणाम होतो. दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी शासकीय तिजोरीवर भार पडतो.

**१०) सामाजिक परिणाम**

दुष्काळामुळे समाज व्यवस्थेवर विपरीत परिणाम होतात. लोकांना रोजगार मिळत नसल्याने चोरी करण्याचे प्रमाण वाढते, उपासमार, कुपोषण, रोगराई, पशुधनाचा नाश, गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ, भिकाऱ्यांची संख्या वाढून सामाजिक अस्थिरता निर्माण होते. दुष्काळी स्थितीमुळे शिक्षण, आरोग्य, सुविधा उपलब्ध होत नाही. अनेकांना आपल्या मुला-मुलीचे विवाह पुढे ढकलावे लागतात. यातून सामाजिक समस्या उद्भवतात.

**११) जनावरावर होणारे परिणाम**

मनुष्याप्रमाणे सजीव प्राण्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणावर दुष्काळाचे चटके सहन करावे लागतात. दुष्काळात जनावरांना पुरेशा चारा मिळत नाही, पिण्याचे पाणी, आरोग्य व्यवस्था, राहण्याची व्यवस्था पुरेशी मिळत नाही. अनेक जनावरांची (जसे गाय, म्हैस, बैल, उंट इत्यादी) खरेदी-विक्रीसाठी कोणीही तयार होत नाही. अनेक शेतकऱ्यांना पाळीव जनावरांचे पालनपोषण कसे करावे हा गंभीर प्रश्न त्याच्यासमोर येतो म्हणजेच दुष्काळात जनावराचे हाल मनुष्यापेक्षा अधिक होतात.

## विभाग 'क'
## (उपाययोजना)

कृषी हा मानवी जीवनाच्या विकासाचा सिद्धांत आहे. जगातील २५ टक्के शेतकरी भारतात असून शेती हा आर्थिक विकासाचा कणा आहे नव्हे तर भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. भारतातील ६२ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे म्हणजेच ओलिताखालील जमिनीचे प्रमाण केवळ ३८ टक्के आहे. देशाचे व राज्याचे अर्थकारण आजही पावसाळी शेतीवर अवलंबून आहे. पाणी नैसर्गिक देणं आहे तसेच निसर्गामध्ये मानवाच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता आहे. संस्कृती विना जल आणि जलविना संस्कृती ही बाब अशक्य आहे तर कृषी संस्कृती हीच खरी संस्कृतीची जननी आहे. म्हणजेच पाणी आणि समाज, नदी आणि समाज, सरोवर, सागर, भूजल, पर्जन्य यांचे भिन्न पातळीवर पडलेले नाते महत्त्वाचे आहे तसेच कृषी आणि पाणी यांचे नाते अतूट आहे. महाराष्ट्राचा शेतकरी हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. म्हणून शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढली तरच औद्योगिक उत्पादनाची मागणी वाढेल आणि अर्थव्यवस्था ऊभारी घेईल याकरिता शेतीमालाला योग्य भाव मिळून शेतकऱ्यांच्या हातात जास्त पैसे गेले पाहिजेत. शेतकऱ्याला कर्जमाफीचे ध्येय न ठेवता शेतकरी स्वावलंबी, उन्नत कसा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. परंतु कोरडवाहू शेतकरी दोन वर्षे चांगल्या पावसाची, एक वर्ष मध्यम आणि एक वर्ष अवर्षण अशा चार-पाच वर्षाच्या चक्रात जगत आला आहे.

दुष्काळ हा शब्द नुकसान किंवा हानी पोचविणारा आहे. दुष्काळ हा ओला किंवा कोरडा दोन प्रकारचा असला तरी तो आर्थिकदृष्ट्या नुकसान करणारा तसेच जीवितहानी करणारा असतो त्यामुळे त्याच्याशी लढा देणे हे शासनाचे, समाजाचे आणि तुमचे आमचे सर्वांचे कर्तव्य ठरते. दुष्काळ म्हणजे आपत्ती ती दोन प्रकारची असते. अस्मानी आपत्ती ही निसर्गत: निर्माण होणारी असते तर सुलतानी आपत्ती ही शासकीय धोरणातून व चुकीच्या अंमलबजावणीतून निर्माण होणारी असते. अस्मानी आपत्ती टाळता येणे मानवाच्या हातात नाही परंतु सुलतानी आपत्ती टाळणे म्हणजेच दुष्काळ स्थितीवर उपाययोजना करणे होय. थोडक्यात दुष्काळ हा निसर्गनिर्मित असला तरी त्यापासून पोहोचणारी झळ मानवनिर्मित आहे. कारण मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे भूगोलाच्या भाषेत मान्सूनचा अर्थच अनिश्चित आणि बेभरवश्यांचा झाला आहे. दुष्काळाचा परिणाम मुख्यत: शेती क्षेत्रावर होतो. महाराष्ट्रात १९६२ मध्ये (महाराष्ट्र निर्मितीनंतर) मोठा दुष्काळ पडला. सन २००९ व २०१२ ही दुष्काळाची वर्षे आहेत. साधारणपणे कोरड्या दुष्काळाची व त्याच्या परिणामाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असते. डॉ. अमर्त्य सेन यांनी सुद्धा कोरड्या दुष्काळाचीच चर्चा आपल्या लिखाणातून केल्याचे दिसून येते. परंतु अलीकडे १०-१२ वर्षात ओल्या दुष्काळाची चर्चा सरकार आणि समाज करू लागला आहे.

आज अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे निर्माण झालेला दुष्काळ दिसून येत नाही. तरी कोरड्या व ओल्या दुष्काळाची स्थिती चक्रीय पद्धतीने निर्माण होत आहे. ओल्या दुष्काळापेक्षा कोरड्या दुष्काळाची दाहकता वाढत जात आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या भागात पिण्याच्या पाण्याच्या

दुष्काळाची दाहकता अधिक आहे. दुष्काळाचा परिणाम ग्रामीण जीवनावर होतो. अचानक कमी वेळात पडणाऱ्या ढगफुटी सारख्या पावसामुळे शेतीचे नुकसान वाढत जाते. सन २०१०, २०१३, २०१६ व २०१९ यावर्षी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ओला दुष्काळ पडला. सन १९८८ मध्ये महाराष्ट्रात ओला दुष्काळ मोठ्या प्रमाणात होता.

ओला दुष्काळ म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात काही काळ सतत किंवा नेहमीचे पर्जन्यमानापेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे (अतिवृष्टीमुळे) पिकांची झालेली हानी होय. पुरामुळे जीव व वित्तहानी, पाण्याचा अति सुकाळ अशी परिस्थिती उद्‌भवणे होय. ही परिस्थिती कोरड्या दुष्काळाच्या बिलकूल विरूद्ध असते. भारतीय पर्जन्यमानातील ठळक बदल जाणवत आहेत, उष्ण तापमानात वाढ होत आहे, जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. थोडक्यात अशा असंतुलन स्थितीमुळे हातातोंडाशी आलेली पिके काही तासात नष्ट होत आहेत. खऱ्या अर्थाने २०१९ हे वर्ष महाराष्ट्रात ओल्या दुष्काळाचे वर्ष ठरले असे म्हटल्यास चूक होणार नाही. जुलै २०१९ च्या शेवटच्या आठवड्यानंतर मुंबई, कोकणसह, पश्चिम महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घालायला सुरूवात केली. त्यामुळे आलेल्या महापुरात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात २ लाख ९ हजार हेक्टर क्षेत्रातील पिके, कृषीपंप, ठिबक संच खराब होऊन २८०० कोटीपेक्षा अधिक नुकसान झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, पन्हाळा, गगनबावडा, राधानगरी, आजरा, भुदरगड, कागल, गडहिंग्लज, चंदगड, शाहूवाडी अशा दहा तालुक्यात अधिक प्रमाणात पाऊस झाला. सातारा जिल्ह्यातील पाटण, जावळी, सातारा, महाबळेश्वर, वाई या तालुक्यात अति पाऊस झाला. नागपूर, हिंगोली, गडचिरोली, जळगांव जिल्ह्यात सुद्धा ओल्या दुष्काळाने हाहाकार घातला.

केंद्र शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१७ नुसार दुष्काळाची परिभाषा निश्चित केली आहे. पश्चिम विदर्भात १७ ते २८ ऑक्टोबर २०१९ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने २० लाख २५ हजार १९७ शेतकऱ्यांच्या २२ लाख ४४ हजार ३९८ हेक्टर मधील पिकांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यात ४५१८ गावात दुष्काळ आहे. त्यामुळे पिकाची पाने कुजली, शेती पिकांची वाढ खुंटली, पिकांना व प्राण्यांना रोगराईने ग्रासले. पर्यायाने शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. ओल्या दुष्काळाची विसंगत स्थिती महाराष्ट्रात पहावयास मिळते. उदा. श्रीगोंदा तालुक्यात भीमा व घोड नद्यामुळे पाण्याचा विसर्ग धरण क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने वाढला तर उर्वरित भागात पाण्याची प्रतिक्षा होती. सोलापूर सारख्या ठिकाणी काही भागात ओला दुष्काळ आहे तर मोठा भाग हा पावसाअभावी कोरडा दुष्काळ सहन करीत आहे. पावसाचे रोजचे बरसणे सुरूवातीला आनंददायी ठरले होते परंतु नंतर ते अनंत अडचणीचे कारण ठरून शेतकऱ्यांना त्रासदायक ठरू लागले. दुष्काळ थांबविता येत नसला तरी दुष्काळसदृश स्थिती निर्माण होणार नाही हेही शक्य नसले तरी सत्ताधारी राज्यकर्ते त्यावर उपाययोजना निश्चितच करू शकतात. याकरिता नियोजनाची गरज आहे. जलसंधारण आणि मृदसंधारणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा खरा विकास होऊ शकतो. थोडक्यात पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतापासून जलसमृद्धी कशी साधता येईल याचा

गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे.

**उपाययोजना :**

पाणी नसणे हे वाईट मात्र त्यापेक्षा असलेल्या पाण्याचा चुकीच्या मार्गाने वापर करणे त्याहीपेक्षा वाईट ठरते. उपलब्ध पाण्याचा जितका विवेकपूर्ण उपयोग करू तितका दुष्काळ मर्यादित राहील. येणारा पाऊस जास्तीत जास्त कसा अडविता येईल यादृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न व्हायला पाहिजे म्हणजे निदान रब्बी पीक तरी हातात येऊ शकेल. सध्याच्या सिंचन पद्धतीत आपण पिकाला पाणी न देता जमिनीला पाणी देत आहोत व पाण्याची नासाडी करीत आहोत. प्रत्येक पिकाची पाण्याची गरज ठरलेली असते. शेती म्हणजे धान्यनिर्मिती अशी चुकीची व्याख्या शेतकऱ्यांनी करू घेतली आहे. वनशेती, फळ शेती, फुलशेती, मत्स्यशेती व प्रथिनशेती यांच्याकडे त्यांचे लक्ष नाही. एवढेच नव्हेतर आपण बहुविध पीक पद्धतीतून एकल पीक पद्धतीकडे मार्गक्रमण करीत आहोत. विदर्भात कापसासाठी, पश्चिम महाराष्ट्रात ऊसासाठी, खान्देशात केळीसाठी, तर नाशिक परिसरात द्राक्षासाठी शेतकरी वेडे झाले आहेत. आजची शेती ही अज्ञानामुळे कृषी केंद्र चालकाच्या सल्ल्यानुसार केली जात आहे. त्यामुळे तेलबिया, दालबिया, धान्य उत्पादक पिके कमी झालीत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही दुष्काळ पडले होते. त्यांनी जनतेसाठी तात्पुरत्या सोई तर केल्याच पण कायमस्वरूपी केलेल्या योजना आजही आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यात ५ वर्षे भीषण दुष्काळाची होती त्यांनी केलेल्या सुधारणा, त्यांची कृती इंग्रजांनाही आवडली व आजच्या राज्यकर्त्यानाही सूचक आहे. नव्हेतर त्यांच्या जलनीती प्रमाणेच तंतोतंत अशा सुधारणा करणाऱ्या शिफारशी मा. चितळे जल व सिंचन आयोगाने राज्य शासनास सादर केल्या आहेत. पावसाच्या मोजक्या दिवसामध्ये पाऊस पडणाऱ्या पाण्याची संपूर्ण साठवण करण्यासाठी सामूहिक चळवळ होणे आवश्यक आहे. गाव तिथे गावतळी, शेत तिथे शेततळी, नाला तिथे बंधारे व विहीर तिथे पुनर्भरण या सूत्राचा वापर करून जलसाठे वाढवावेत. तसेच जलसाक्षरता, जलसंवर्धन पाणी वापर व साठवणुकीसाठी प्रबोधनाची ज्योत तेवत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, महाविद्यालय, महिला बचत गट, बँका, विमा कंपन्या या सगळ्यांनी एकत्र येऊन पाणी संकलन, संग्रहण, व काटकसरीचा उपयोग यासाठी मोठी लोक प्रबोधन चळवळ उभारली पाहिजे. एवढेच नव्हे तर शाळा, कॉलेजच्या अभ्यासक्रमातून पाण्याची उपलब्धता व दुष्काळ निर्मूलन यासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण झाली पाहिजे.

डॉ. विलास सपकाळ, यांनी संशोधनातून 'सब-सरफेस डॅम' ची (जमिनीखाली बांधण्यात येणारी धरणे) संकल्पना मांडली आहे. यामध्ये खर्च कमी फायदे जास्त, गाळ साठत नाही त्यामुळे धरणाची पाणी क्षमता कायम राहते. पाण्याचे बाष्पीभवन होत नाही. तसेच अशा धरणांना पुराचा धोका नसतो. पर्यायाने पाणी टंचाई, दुष्काळ व पूर यासर्वांवर मात करणे शक्य आहे. बऱ्याच नद्यामधून पाणी वाहून समुद्रास मिळते अशा पाण्याचा साठा उपयोगात येत नाही. पुरामुळे पर्यावरणाचे आणि मालमत्तेचे प्रचंड नुकसान होते. त्यातून मोठा आर्थिक फटका बसतो. नदीपात्रातील पाणी पोकळ जमिनीत पाझरून आवश्यक तेव्हा पाण्याचा साठा उपयोगात

आणता येतो. धरणातील पाणी पंपाद्वारे किंवा विहिरीच्या माध्यमातून वर्षभर उपलब्ध होऊ शकते. अशा पाणी साठ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढते, विहिरींना बारा महिने पाणी राहते. अशा धरणामुळे जमिनीमध्ये कोणताही बदल होत नाही असे धरण फुटण्याची भितीही राहत नाही. तसेच धरण बांधण्याचा खर्च पारंपरिक धरणापेक्षा कमी येतो. थोडक्यात पाण्याच्या अतिरिक्त नैसर्गिक स्त्रोतापासून जलसमृद्धी कशी साधता येईल याचा गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे.

आज दुष्काळावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना ४०-४५ वर्षे जुन्या आहेत. नव्हेतर राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यापैकी काही तालुके पूर्वीपासूनच्या व आजच्या यादीत कायमच आहेत. जमीन महसुलात सूट ही फारच अल्प मदत आहे. सहकारी कर्जाचे पुनर्गठन केल्यामुळे सहकारी संस्थांना आर्थिक लाभ होतो. परंतु शेतकऱ्यांचे कर्जाचे ओझे वाढतच जाते. तो कर्जाच्या चक्रव्यूहात अडकून पडतो. शेतीशी निगडीत कर्ज वसुलीला स्थगिती देण्याऐवजी कर्जमाफी किंवा संबंधित कर्जाचे व्याज माफ करावे, कृषी पंपाच्या चालू वीज बिलामध्ये ३३.५ टक्के सूट ही वीज बिल रक्कमेच्या तुलनेत कमी असल्यामुळे संपूर्ण वीज बील माफ करावे, शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींचे परीक्षा शुल्कासोबत शिक्षण शुल्क आणि वसतिगृह शुल्क पूर्ण माफ करावे, जिथे शुद्ध पिण्याच्या पाण्याची कमतरता असेल अशा आवश्यक त्या सर्व ठिकाणी टँकरद्वारे पाणी पोहचवून जलशुद्धीकरण यंत्रे लावण्यात यावी म्हणजे संभाव्य रोगराईवर नियंत्रण मिळविता येईल, टंचाई जाहीर झालेल्या गावातील शेतकरी असाल तर शेतीपंपाची वीज जोडणी बंद केली जाणार नाही. यापेक्षा आहे त्या शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध करून द्यावी.

दुष्काळानंतर रोजगार हमीची कामे सरकार देते परंतु रोजगार हमी योजना सुरू झाली त्यावेळी शिक्षणाचे प्रमाण कमी होते तर ग्रामीण भागातील लोकांमध्ये कौशल्याचा अभाव होता. अशा कामासाठी अलीकडे यंत्रे आली आहेत. त्यामुळे अशा भागातील रिकाम्या हातांना काम देण्यासाठी वेगळ्या पर्यायाचा विचार करावा लागेल. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये शेती व्यवसायाचे कौशल्य स्थलांतरणामुळे गावाबाहेर कायमचे जाते हे रोखण्यासाठी ग्रामीण व कुटीर उद्योगांना सतत प्रोत्साहित करणे त्याचबरोबर शेतमाल प्रक्रिया करणारे उद्योग धंदे त्या-त्या भागातील पीक उत्पादनावर आधारित निर्माण करणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांनी मांडलेली नद्या जोड प्रकल्पाची योजना आजही पूर्णत्वास आली नाही हे दुर्दैव म्हणावे लागते. नद्या जोड प्रकल्पातून पाणी साठवण आणि वितरण यामध्ये समानता विकास साधता येतो. त्यातूनच भविष्यात पाण्याच्या ताळेबंदासारखी संकल्पना अस्तित्वात येऊन सतत पडणाऱ्या कोरड्या दुष्काळावर मात करता येईल नव्हे तर महाराष्ट्र राज्यात जी लहान-मोठी तलाव तुटलेली व गाळाने भरलेली आहेत त्यांची दुरूस्ती व गाळ उपसा करणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार अभियान (विकेंद्रित पाणीसाठा निर्माण करणे) राबवून पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडवून पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे तसेच भूजल अधिनियमांची अंमलबजावणी करणे

आवश्यक आहे.

दुष्काळाचा वाईट परिणाम हा शेतीव्यवसायावरच होतो. यातून शेती व्यवसाय वाचवायचा असेल तर शेतकऱ्यांला आर्थिक संरक्षण देणे गरजेचे आहे. पीक विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नव्हेतर पंतप्रधान पीक विमा इतर विमा योजनेचे विमा हप्ते हे ९० टक्के सरकारनेच भराव किंवा अशा योजना खाजगी कंपनी ऐवजी शासनस्तरावरच राबवल्या तरच शेतकऱ्यांना विमा संरक्षणाच्या माध्यमातून दुष्काळा सारख्या संकटावर मात करता येईल. शेती हा व्यवसाय आहे तो व्यवसाय म्हणून केला जावा तेव्हाच शेती ही शाश्वत व्यवसाय बनू शकते ही बाब शेतकऱ्यांनी समजून घ्यावी. ओला दुष्काळ हा कोरड्या दुष्काळापेक्षा चांगला असेल तर त्या उपलब्ध पाण्याच्या संधीच सोनं करण हे फक्त राज्यकर्तेच करू शकतात याकरिता कायम स्वरूपी उपाययोजना अंमलात येणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या काळात जनतेची, पशूची हानी होऊ नये, हाल होऊ नये, राष्ट्रीय उत्पादनात नुकसान होऊ नये म्हणून दुष्काळाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आजची कामाची पद्धत विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या मतानुसार पूर्णपणे बदलावी लागेल. शेतकऱ्यांच्या शेतामधलं पाणी हे त्याच्या डोळ्यातील पाणी ठरू नये याची काळजी घ्यावी लागेल. विरोधी पक्ष सरकार चुकीचे निर्णय घेतो हे सांगते तर सत्ताधारी पक्ष निसर्ग साथ देत नाही हे सांगते यामध्ये ग्रामीण शेतकरी मात्र पिळला जातो. दुर्दैवाने दुष्काळाचं राजकारण होत आहे. आज गरज आहे समाज, अधिकारी व राज्यकर्ते यांच्या माध्यमातून पावसाच्या अतिरिक्त पाण्याचे संकलन करून कृतीत व वापरात आणण्याची आवश्यकता आहे.

◆◆◆

# Impact of Socio-Economic Factors on the Choice of Higher Education : with Special reference to Nagpur City

**Samit L. Mahore**
Assistant Professor
Department of Economics,
RTM Nagpur University, Nagpur

**Introduction :**

In recent couple of years, higher education has significantly changed. Previously higher education was considered as a luxury rather than necessity. Over the period, people understand the importance of higher education and demand for higher education increased exponentially. To meet growing demand for higher education, number of government and private universities, colleges and other educational institutes of traditional and professional courses have increased.

In such a dynamic environment, students are carefully choosing higher education institutes. Among the many alternative, career selection is very complicated process. It is directly related to individual's whole life. There should be an effective recruitment system to have a clear understanding of how and why the students choose higher education institutions. In our society, every student has to contribute something after completion of his education. Therefore, choice of higher education is an important task and mostly affected by the socio-economic background and educational standard of the family. Parents and other family members are important source of information while selecting higher education.

c) self dependency and multiplier effect

For this criteria we take some indicators and formulate some equations. Firstly we explain two criteria of wage employment. In this programme, availability of work as per rule is minimum 100 days, facilities at work site and availability of work for minimum one person per family. In Maharashtra influence of EGS on MREGS, we got information that some time (some place) work availability for 365days and for all family member. So we took weighted index for work site member and calculate the index number for other criteria adequacy

of wage. We examine three factor i.e. payment of wages in 15 days, regularity in payment of wages, adequacy of wage for living, then calculate the index number.

Now we explain he criteria of self employment programme for self dependency and employment generation. Our first criteria - i) satisfaction for given facilities - we get information of three factors.

a) adequacy of subsidy b) present for training and c) fully satisfaction and we calculate index number. for second criteria ii) status of occupation, we got information of three factors - a) business time b) enough income & c) fully repayment of loan and then calculate the index number.For third criteria -

iii) self dependency and multiplier effect we got information of three factors

a) fully business self dependency b) self dependency of expected extension and c) derived employment and then calculate the index number.

On the base of these index numbers, we formulate equation for measurement of effectiveness of wage and self employment programmes.

**Formula for Effectiveness of wage employment scheme (EWES)**

$$EWES = \frac{\text{Index of avaibility of work} + \text{Index of adequacy of work}}{\text{Total beneficiaries of two indicators}}$$

**Formula for Effectiveness of Self Employment Scheme (EEES)**

$$EEES = \frac{\text{Indicator of satisfaction for facilities} + \text{Indicator of status of occupation} + \text{Indicator of self dependant \& multiplier effect}}{\text{Total beneficiaries of three indicators}}$$

For the understanding level of effectiveness, we decided five levels of effectiveness given as below :

If the answer is,

1) 0 to 0.20 = effectiveness is very low

2) 0.20 to 0.40 = the effectiveness is low

3) 0.40 to 0.60 = the effectiveness is medium

4) 0.60 to 0.80 = the effectiveness is good

5) 0.80 to an above = the effectiveness is very good

As per our information of primary

data which we have collected & analysed for wage employment scheme we got answer 0.72 and for self employment scheme we got answer 0.64 for Amravati district. It can self be said that for wage employment scheme and also for self employment scheme effectiveness is good. So the employment scheme whether wage of self employment is beneficial for those people who involved in scheme, hence be continued. But it is not possible not even intended that scheme will be provide wage employment permanently or through whole life span to beneficiaries. But for their better living they should got employment for ever.

Even as per available study, corruption & linkage of administrative mechanism is at very high, but we get a path which is should be followed as the best policy for the livehoodness of poor or unemployed people. The self employment policy is the best policy on various aspect but for those, who are not eligible for skillful work, employment programmes is essential but with given time limit.

◆◆◆

# महात्मा गांधीची विश्वस्त संकल्पना –आधार भारतीय तत्त्वज्ञानाचा

**प्रशांत हरमकर**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा.

**प्रस्तावना :**

राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना महात्मा गांधीची अहिंसा ही संकल्पना परिचित आहे. या संकल्पनेतून कसा राजकीय बदल घडून आला यावर अनेक अभ्यासकांनी विश्लेषण केलेले आहे. अहिंसा या संकल्पनेने मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, व्हॅक्लेव्ह हॅवेल आणि लिच वेलेसा प्रभावित होते. हे सर्व राजकीय पुढारी केवळ अहिंसा संकल्पनेचेच नाही तर गांधीच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झाले होते. गांधीच्या राजकीय तत्त्वज्ञानाबाबत त्यांना कोणतीही आशंका नव्हती. बहुतांश राजकीय संकल्पना गांधीच्या संदर्भाशिवाय पूर्ण होत नाही. अशा जगमान्य संकल्पना गांधीनी या विश्वाला दिलेल्या आहे.

अर्थशास्त्राच्या अभ्यासकाकडून गांधी थोडे दुर्लक्षित राहिले आहे. अर्थशास्त्रामध्ये गांधीचा संबंध पर्यावरण अर्थशास्त्राच्या अनुषंगाने आला. या संदर्भामध्ये गांधीचे प्रसिद्ध अवतरण आहे. ''निसर्गापासून मानवी गरजा पूर्ण होऊ शकतात पण मानवी हाव पूर्ण होऊ शकत नाही.'' हा महात्मा गांधीचा दृष्टिकोन शाश्वत विकासाचा आहे. या शिवाय गांधीनी अर्थशास्त्राला दिलेली महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'विश्वस्त' होय. ही संकल्पना राजकीय अर्थशास्त्राचा महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. तसेच ते राजकीय अर्थशास्त्राचे मुलभूत अंग आहे.

**गांधीची विश्वस्त संकल्पना :**

गांधीच्या भाषणामध्ये व लिखाणामध्ये वारंवार विश्वस्त संकल्पना आलेली आहे. गांधीनी विश्वस्त ही संकल्पना वेगळ्या अर्थाने वापरलेली आहे. बरेचदा या संकल्पनेचा प्रवासात उपयोग होत नाही असा समज आहे. उत्पादन वाढीला प्रोत्साहन आणि परिस्थितीमध्ये बदल घडवून आणणारी ही संकल्पना आहे. गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचा संबंध हा संपत्ती आणि खाजगी संपदेशी आहे. श्रीमंताकडील संपत्ती काढून घेण्याला त्यांनी विरोध केला आहे. तरी गांधीच्या विश्वस्त संकल्पनेबाबत विरोधाभास निर्माण झालेला आहे. संपत्ती ही फार काळ मालकाला श्रीमंत ठेवत नाही. म्हणून मालक हेच विश्वस्त आहे. मालक हा संपत्तीच्या कर्तव्याशी जुळलेला असतो. म्हणजेच संपत्तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी मालकावर असते. संपत्तीचा उपयोग व्यक्तिगत कारणासाठी न करता नैतिक दृष्टिकोनातून समाजासाठी संपत्तीचा उपयोग करून घेता आला पाहिजे. संपत्तीचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला तर अनेकांच्या कल्याणात वाढ घडून येईल. विश्वस्त संकल्पनेचा जवळचा संबंध पेढ्या व व्यवसायाच्या नियंत्रण व व्यवस्थापनाशी आहे.

मालक अथवा श्रीमंत व्यक्ती पेढीचे नियंत्रण व व्यवस्थापन करीत असते. तो व्यवसायामधील भागीदार असतो. कारण मालका व्यतिरिक्त श्रमिक व उपभोगक्ते हे व्यवसाय अथवा पेढीचे भागीदार असतात. हे सर्व पेढी अथवा व्यवसायाचे घटक असून ते अडथळ्यावर मात करीत असतात. गांधीच्या नुसार एखादा व्यक्ती हा विश्वस्त असू शकत नाही. कारण कोणतीही पेढी अथवा व्यवसाय हे संघटन असते. मात्र प्रत्यक्षात विश्वस्त सर्वात जास्त लाभ घेणारे असतात. ते लाभ घेत असले तरी ते मोठे लाभार्थी असू नये. यावर गांधीनी सखोल चर्चा केली आहे. विश्वस्त संकल्पनेची उत्पत्ती भारतीय तत्त्वज्ञानातून सांगितली आहे. विश्वस्त संकल्पना कशा प्रकारे उपयुक्त ठरू शकते यावर गांधीनी प्रकाश टाकलेला आहे.

**गांधीचा सैद्धांतिक व अनुभवनिष्ठ दृष्टिकोन :**

गांधीनी विश्वस्त संकल्पनेची मांडणी करताना म्हटले आहे की, या संकल्पनेमध्ये फार मोठ्या संधी दडलेल्या आहे. पण त्याबाबत काही समस्या देखील आहे. याकडे पाहत असताना ॲडम स्मिथ च्या नुसार विश्वस्त निष्पक्ष प्रेक्षक आहे. मात्र याबाबत गांधीचा दृष्टिकोण विवेकाचा आहे. गांधीचा दृष्टिकोण वारसा संपत्तीशी आहे. वारसा संपत्ती ही उपहार आहे. त्यासंदर्भातील कृतीचा उलगडा ऐरोने केलेला आहे. वारसा संपत्ती म्हणजे देणगी आहे. श्रीमंत मित्राच्या संपत्तीचा संबंध हा मित्राशी विश्वस्त म्हणून आहे. मालक म्हणून नाही. त्यामुळे संपत्ती काढून घेता येत नाही किंवा नष्ट ही करता येत नाही. एकरलॉफ आणि क्रटनच्या नुसार विश्वास्ताबाबत गांधीचा दृष्टिकोण सैद्धांतिक आणि अनुभवनिष्ठ स्वरूपाचा आहे. विश्वस्त संकल्पनेचे उपयोजन आजच्या निगम शासनामध्ये (corporate governance) केले जाते. समाजाचे देणे म्हणून अनेक सामाजिक उपक्रमाची जबाबदारी स्वीकारतात व त्यामध्ये योगदान देतात. सामाजिक जबाबदारी (social responsibilities) म्हणून नफ्याचा एक माग सामाजिक उपक्रमावर खर्च केला जातो. यालाच गांधीचे सचिव महादेव देसाई यांनी जबाबदारीपूर्ण मालकी म्हणजेच विश्वस्त असे म्हटले आहे.

विश्वस्त ही संकल्पना गांधीची अर्थशास्त्राला देण आहे. कारण ही संकल्पना गांधीनी केवळ मांडली नाही तर तिचे परीक्षण व पुन:परीक्षण करून त्याची चौकट बसवली आहे. यामुळे विश्वस्त संकल्पना समजवून घेतांना या संकल्पनेच्या विविध स्त्रोताचा विचार करावा लागतो. याकरिता सखोल नैतिक अंर्तदृष्टिचा उपयोग गांधीनी केला आहे. गांधी कायदयाचे अभ्यासक होते. गांधीनी कायदयाचा दृष्टिकोन वापरून विश्वस्ताच्या कार्याची मांडणी केलेली आहे. मित्राची धार्मिक संस्था (Qaokers) कडून प्रेरित होऊन पेढ्यांच्या (firms) इतिहासाचे परीक्षण केले आहे. याकरिता अहमदाबादच्या नगरशेठ (शहराचा व्यापार प्रमुख) यांच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. यावर प्रकाश टाकण्याचे विशेष कारण म्हणजे यामधूनच गांधीची विश्वस्त संकल्पना विकसित होत गेलेली आहे.

गांधीचे कायदयाचे शिक्षण इंग्लंडमध्ये पूर्ण झाले होते. ते पेशाने बॅरिस्टर होते. इंग्रजी कायदयामध्ये विश्वस्त ही संकल्पना सामान्यांकरिता होती. विश्वस्त संकल्पना म्हणजे इंग्रजी कायदयाचे वैभव आहे. इंग्रजी कायदयाने संस्थेचा दृष्टिकोन प्रस्तुत केलेला आहे गांधीनी विश्वस्त संकल्पनेची मांडणी कायदयाच्या साह्याने अचूकपणे केली आहे.

प्रामुख्याने या संकल्पनेची मांडणी दक्षिण आफ्रिका आणि साबरमतीच्या आश्रमात असतांना केलेली आहे. गांधीची संकल्पना विश्वस्त महत्त्वाची असून या संकल्पनेला कायदयाच्या चौकटीत बसविले आहे. म्हणून ही संकल्पना समजवून घेतांना कायदयाचे ज्ञान असणे देखील आवश्यक आहे.

दुसरे म्हणजे मित्रांच्या धार्मिक संस्थेच्या बौद्धिक परंपरेतून विश्वस्त संकल्पनेची ओळख पटते. गांधीचा संबंध अनेक मित्रांच्या धार्मिक संस्थेशी होता. त्यांनी मित्राच्या धार्मिक संस्थाशी संवाद साधून केलेली भाषणे 'Quakers friend house in Euston Road in London' यामध्ये विस्तृत स्वरूपात प्रसिद्ध झालेली आहे या अनुषंगाने त्याची मैत्री होरेस अलेक्झांडर, अगन्टा हॅरिसन, म्युरियल लेस्टर, मरजोरिस्काय इत्यादीशी होती. त्यांनी विश्वस्त संकल्पनेबाबत त्यांच्याशी केलेल्या चर्चेचा दस्ताऐवज उपलब्ध आहे. मित्रांच्या धार्मिक संस्थाची परंपरा शांततावादी होती. गांधी मित्रांच्या धार्मिक संस्थाकडे आकर्षित झाले होते. त्यांच्याशी चर्चा करून अहिंसा ही संकल्पना राजकीय कृतीमध्ये आणली होती. मित्रांच्या धार्मिक संस्थाचा वारसा संपत्तीचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. गांधीनी वारसा संपत्तीतून कुटुंबाचा ऱ्हास कसा घडून येतो याची मांडणी केलेली आहे.

**पेढ्या आणि नगरशेठ :**

इंग्रजी कायदा, मित्राची धार्मिक संस्था आणि हिंदूशास्त्रे यामधून गांधीची विश्वस्त संकल्पना विकसित होत गेलेली आहे. या स्त्रोताचा विचार करीत असतांना गांधीनी प्रत्येक स्त्रोताशी प्रयोग केलेले आहे. यासंदर्भात गांधीनी असे म्हटले होते की, ''जर संपत्तीवान आणि शिक्षित व्हायचे असेल तर अहमदाबादचा चेहरा बदलण्याची आवश्यकता आहे.'' जैन लोकांच्या अहमदाबाद शहरामध्ये मोठ्या पेढ्या तत्कालीन काळात होत्या. आनंदजी कल्याणजी यांची श्रीमंत पेढी होती. जगातील इतर पेढ्याच्या समान होती. त्यांचे वर्णन धार्मिक संघटन अथवा धार्मिक मंडळ म्हणून केल्या गेले होते.

गांधीनी जगातील नगरशेठ आणि पेढ्या शोधल्या. त्या कशा प्रकारे व्यवस्थापन करतात याचे अनुभवनिष्ठ विश्लेषण केले. हे विश्लेषण विजेंद्र त्रिपाठी आणि एम.जे. मेहता यांनी प्रसिद्ध केले आहे. गांधीनी विश्वस्त संकल्पनेची मांडणी भारतीय विचारधारेतून केली आहे. त्यामुळे गांधीची विश्वस्त संकल्पना म्हणजे भारतीयांना लाभलेला बौद्धिक वारसा आहे. याबाबतचे विवेचन प्रथमा बॅनर्जी यांनी The work of Theory - Thinking across tradition यामध्ये केलेले आहे.

आनंदजी कल्याणजी हे कायदेशीर विश्वस्त होते. त्यांना विश्वस्त म्हणून मान्यता १९ व्या शतकातील नवीन वसाहती कायद्यानुसार होती. गेल्या दोन किंवा तीन शतकापासून ही पेढी कार्यरत होती. ही पेढी आधुनिक सामान्य कायद्यानुसार हाताळल्या जात होती. आनंदजी कल्याणजी यांची तात्विक कृती, विश्वस्ताची होती. ही संस्था अनेक जैन मंदिराचे व्यवस्थापन करीत होती. सौंदर्य अभिरूचीचे महत्त्व असलेले राजस्थान मधील रणकापूर मंदिराचे व्यवस्थापन आनंदजी कल्याणजी यांची पेढी विश्वस्त म्हणून करीत होती. संपत्तीची मालकी, लाभ आणि कायदेशीर व्यवस्थापन या मर्यादांतर्गत विश्वस्ताला व्यवस्थापन करावे लागते. या मर्यादा समजून घेणे आवश्यक असते. मंदिरे ही संपत्तीनी वेढलेले असतात. मंदिरामध्ये निवासी देवता असते. विश्वस्त मंदिराच्या व्यवस्थापनाला जबाबदार असतो कारण

मंदिराची देखभाल व निर्वाह देवत्तेच्या वतीने विश्वस्त करीत असतो.

भारतीय परंपरेमध्ये विश्वस्ताचे अनेक संदर्भ सापडतात. वाल्मिकी रामायणामध्ये भरत आपली पादत्राणे काढून जमिनीवर बसतो व त्याचा भाऊ रामाच्या वतीने राज्यकारभार करतो. येथे श्रीराम अनुपस्थित आहे पण भावाची पादत्राणे प्रमाण मानून त्याचे कार्य पार पाडतो. जसे रणकापूर मंदिराचे व्यवस्थापन आनंदजी कल्याणजी नेमिनाथ देवतेच्या वतीने करतात. यापुढील विश्वस्ताचे उदाहरण भारतीय वारशामध्ये १७ व्या शतकात सापडते. त्रावणकोर येथील सरदार मार्थंडा वर्मा यांनी आपले राज्य कायमस्वरूपी भगवान विष्णूना स्वाधीन केले होते. पद्मनाथ हा त्याचा आदर्श होता. वरील उदाहरणावरून स्पष्ट होते की, यामध्ये कायदेशीरपणे विश्वस्ताची भूमिका स्वीकारून आपले कार्य पार पाडणे अपेक्षित आहे. अशीच विश्वस्ताची दृष्टी असणे आवश्यक आहे.

**भारतीय परंपराचे सिद्धांतन :**

भारतीय परंपराचे सिद्धांतन कसे झाले आहे? पाश्चात्य आधुनिक विचाराचे आकर्षण असतांना भारतीय परंपरांना का महत्त्व दिले आहे ? गांधीची विश्वस्त संकल्पना इसावस्य उपनिषदावर आधारित आहे. इसावस्य उपनिषदामध्ये अर्थशास्त्रीय दृष्टिकोन फारच स्पष्टपणे दिलेला आहे. हा दृष्टिकोन फार लक्ष वेधणारा आहे. या उपनिषदामध्ये म्हटले आहे की, व्यक्तीने जागतिक देणग्यांचा आनंद घेतला पाहिजे. समांतरपणेच इतरांच्या संपत्तीची लालसा न करता त्यापासून स्वत:ला परावृत्त केले पाहिजे. हा गांधी विचाराचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. यामुळेच विश्वस्त संकल्पनेचे सुसूत्रीकरण झालेले आहे. उपनिषदाबरोबरच इंग्रजी कायदा आणि मित्राच्या धार्मिक संस्थाचा आधार विश्वस्त संकल्पनेला दिलेला आहे. अशा प्रकारे गांधीनी विश्वस्त संकल्पनेबाबत नवीन आकृतिबंध निर्माण केलेला आहे. या आधारावर आपण ही संकल्पना स्वीकारू शकतो, नाकारू शकतो अथवा प्रतिउत्तर देऊ शकतो. गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे हे आधारस्तंभ आहे. यामधून विश्वस्त संकल्पनेचे अंतरंग स्पष्टपणे दिसते. ही संकल्पना आधुनिक भांडवलशाही किंवा आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनावर भाष्य करू शकते.

गांधीनी असे म्हटले होते की, श्रीमंत आणि शिक्षित लोक अहमदाबादचा चेहरा बदलवू शकतात. हे लोक त्यांच्या स्वत:च्या चौकटीच्या बाहेर आले पाहिजे. म्हणजेच त्यांनी विश्वस्ताची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. संपत्तीचा उपयोग शहराचा चेहरा बदलविण्यासाठी झाला पाहिजे. यामधून लोककल्याण घडून येईल. विश्वस्त संकल्पनेच्या सहाय्याने केलेले हे सर्व विश्लेषण राजकीय अर्थशास्त्राच्या चौकटीत बसणारे आहे.

आनंदजी कल्याणजी पेढीचे दस्ताऐवज इ.स. १६०० पासून उपलब्ध आहे. इ.स. १७०० पासून ब्रिटिश साम्राज्यामधील सर्व नोंदी आहे. आनंदजी कल्याणजी पेढीचा इतिहास देसाई यांनी १९८३ मध्ये प्रसिद्ध केला. विश्वस्ताद्वारे अडथळे निर्माण करून चुकीच्या पद्धतीने वापर कसा केला जातो असे वादप्रश्न यामध्ये समाविष्ट आहे. सिद्धांत आणि वास्तवाच्या दृष्टिकोनातून नवीन प्रकल्प सुरू करता आले पाहिजे. विश्वस्ताला यश प्राप्त करता आले पाहिजे. प्रेरणा या टिकवून ठेवता आल्या पाहिजे आणि नवीन क्षेत्र व कृतीचा विस्तार झाला पाहिजे. ही सर्व विश्वस्ताचे उद्देश व कार्य आहे.

विशेषत: आनंदजी कल्याणजी यांनी अनेक मंदिराचे व्यवस्थापन केले होते. मंदिरामधील देवता ही मालक असून त्याच्या वतीने व्यवस्थापन विश्वस्त मंडळ करते. विश्वस्त मंडळ मंदिराची देखभाल करीत असतात. मात्र यामध्ये अस्वस्थ करणारा वादप्रश्न म्हणजे व्यवस्थापनामध्ये होणारा बेबनाव आहे. याचा सामना करण्याकरिता कायदयाची जोड दिलेली आहे. आधुनिक व्यवस्थापनानुसार निधी व्यवस्थापनामध्ये एखाद्या विश्वस्ताने भ्रष्टाचार केला तर त्याची सोडवणूक कायदयापासून करता येत नाही.

आनंदजी कल्याणजी पेढीचे प्रमुख सामवेग लालभाई यांनी देवळाच्या निधीबाबत काही नियम केले. देवळामध्ये जमा होणारा निधी हा देवळातील विधी, देवळाचे व्यवस्थापन, देवतांची रत्न व दागिने खरेदी करण्याकरिता केला जाईल. या निधीचा वापर भोजनावळी व यात्रेकरूना मदत म्हणून केला जाणार नाही. भोजनावळी व यात्रेकरूंना मदत याकरिता वेगळा निधी निर्माण करावा व त्यामधूनच तो खर्च करावा. अशा प्रकारच्या मर्यादा घालून देण्यात आल्या. निधीच्या उपयोगाबाबत मर्यादा घालून देणे हे आधुनिक वित्तीय व्यवस्थेचे लक्षण आहे. निधीचा उपयोग करण्यासाठी करार आहे. असे कायदेशीर निर्बंध असल्याशिवाय व्यवस्थापन होऊ शकत नाही. अशा कायदेशीर निर्बंधामधून कोणाचीच सुटका होऊ शकत नाही.

अठराव्या शतकापासून नवीन पेढ्याची स्थापना वसाहती कायद्यानुसार झालेली होती. या कायद्यानुसार पेढ्या देणग्या स्वीकारत होत्या. यानुसार पेढ्याचे व संस्थाचे व्यवस्थापन चालत होते. कायद्यामुळे विश्वस्तता निर्माण होते का? हे समजवून घेतांना प्रत्यक्ष पेढ्या किंवा संस्था कशा प्रकारे कार्य करतात तसेच पेढ्या आपले कार्य पार पाडतांना परस्परामध्ये सहमती कशा प्रकारे घडवून आणतात यावर विश्वस्तता अवलंबून असते.

**न्यायिक अस्तित्व म्हणून देवता :**

प्रसिद्ध असा न्यायालयीन खटला परमार्थनार्थ मलिक विरूद्ध प्रद्युम्न मलिक यांचा १९२५ मधील आहे. ब्रिटिश भारताच्या कायद्यानुसार देवता अथवा मूर्ती यांचे न्यायिक अस्तित्व (Juristic entity) आहे. या संदर्भात भारतीय सिद्धांतांना इंग्रजी कायद्याचा लाभ प्राप्त झालेला आहे. भारतीय तत्त्वज्ञान इंग्रजी कायद्याला जोडल्यामुळे प्रबळ सिद्धांत निर्माण झाले आहे. देवतांचा विश्वस्त कोण असू शकतो? वसाहती न्यायालयीन व्यवस्थेनुसार भक्त विश्वस्त असू शकतात कारण तो देवतांचा आध्यात्मिक लाभार्थी असतो. पाश्चात्य कायदा सिद्धांताने ही नव्याने मांडणी केली होती. ही नवज्ञान निर्मिती होती. कायदा व्यवस्थेने ते मान्य केले होते. यामुळे आनंदजी कल्याणजी सारखे विश्वस्त निर्माण झाले. जो देवताचा आध्यात्मिक लाभार्थी (भक्त) आहे. तेच देवताच्या वतीने न्यायालयामध्ये दावा दाखल करू शकतात.

१९५० पासून समाजवादी भारताला एक नवीन दृष्टिकोन प्राप्त झाला. बिहार राज्याला मंदिराकडून मोठ्या प्रमाणात जमिनी प्राप्त झाल्या. याबाबत राम जानकी देवता विरूद्ध बिहार राज्य असा न्यायालयीन खटला होता. शासनाच्या वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, संस्थेद्वारे सर्व भूमीचे नियंत्रण व्हावे. भूमीचा एखादा तुकडा जरी असेल तरी त्याचे नियंत्रण संस्थेने करावे. शिवाय भूमी मर्यादा कायदा (Land Ceiling Act) आहे.

न्यायालयीन कायद्यानुसार दोन वेगळ्या देवता असतील तर त्याचे न्यायिक अस्तित्व देखील वेगळे आहे. त्यामुळे विश्वस्तानी दोन वेगळ्या देवताच्या संपत्तीचे दोन संच करावे व त्याचे स्वतंत्रपणे व्यवस्थापन करावे. यामुळे आनंदजी कल्याणजी विश्वस्ताना यामधून मोकळीक मिळाली. कारण त्यांनी डझनाच्या वर विविध देवताच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून व्यवस्थापन केले होते. स्वतंत्र भारतामध्ये उत्पन्न कर आयुक्त विरूद्ध जोगेन्द्रनाथ नसकर असा न्यायालयीन खटला होता. स्वतंत्र भारताच्या कायद्यानुसार देवतांना न्यायिक अस्तित्व आहे. कोणत्याही व्यक्तीप्रमाणे देवता कर देण्यास सक्षम आहे. त्यामुळे देवतांना कर भरण्यास उपकृत करता येते. अंतिमत: तत्त्व हक्काचे आहे. वैश्विक दृष्ट्या कोणतेही ज्ञान पाश्चात्य नाही. सर्व संस्कृतीच्या मिश्रणातून ज्ञान व सिद्धांत निर्माण होतात. तेव्हा त्याला वैश्विक मान्यता मिळते.

**विश्वस्त व कर्तव्य :**

स्वतंत्र भारताच्या नगरशेठाचा इतिहास विशेष महत्त्वाचा आहे. त्यांच्या संस्थेच्या अद्वितीय कार्यामुळेच त्याचे अंतरंग स्पष्ट होते. या संदर्भातील सखोल विश्लेषण छाया गोस्वामी यांनी Kacchi Trader (2016) मध्ये केलेले आहे. यामधील व्यवस्था सिमापार भांडवलशाहीची (cross border capatilism) आहे. या व्यवस्थेमध्ये विमा, सागरी विमा, विदेशी विनिमय व्यापार, बील ऑफ एक्सचेंजची व्यवस्था होती. गोस्वामीच्या नुसार महाजन आणि नगरशेठ हे केवळ मध्यवर्ती गुजरातमध्येच नव्हते तर ते कच्छ पर्यंत पसरलेले होते. त्रिपाठी आणि मेहता (१९७८) यांनी जी आकडेवारी प्रसिद्ध केली त्यावरून गांधीची विश्वस्त संकल्पना कळते. भारताचा इतिहास प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात विभागला गेला आहे. त्यामुळे सामाजिक संस्थाचे मूल्यांकन करताना कालखंड हा अडथळा ठरतो.

निकोलस डाऊन टाऊन याने १६१५ मध्ये अहमदाबादला भेट दिली. त्याने अहमदाबादचे वर्णन बझिंग मर्केंटाइल सेंटर म्हणून केले. याची प्रचित्री त्रिपाठी आणि मेहताच्या विश्लेषणामध्येही येते. मेहता आणि त्रिपाठी असे म्हणतात की, ''अहमदाबाद येथे जगातील महत्वाच्या देशाचा संगम झालेला आहे.'' त्रिपाठी आणि मेहताच्या नुसार व्यापाऱ्याची वस्ती गुजरात मधील इतर शहरांमध्येही वाढत होती. देशाच्या इतर भागातून व्यापारी येत होते. त्यांनीच महाजनाची परंपरा आणली. या संस्थाची पेढी म्हणून मूळ अहमदाबादमध्येच प्राथमिक स्थितीत विकसित झाली होती.

आर.सी. मुजुमदार यांच्या नुसार व्यापारसंघाच्या सरदारांना प्राचीन भारतामध्ये श्रेष्ठीन असे म्हटले आहे. श्रेष्ठ म्हणजे विक्री. याची नोंद १६२७ च्या खतपत्रामध्ये स्पष्टपणे आहे. प्राचीन आणि मध्य कालखंडात या संस्था अमूर्त स्वरूपात होत्या. मात्र मोगल काळात १६४४ पासून या संस्थाचा महाजन म्हणून स्पष्ट उल्लेख आढळतो.

अहमदाबादच्या नगरशेठाबाबत असे म्हटल्या जाते की, श्रेष्ठ हे महाजनापेक्षा वेगळे होते. यासंदर्भातील मांडणी त्रिपाठी आणि मेहता यांनी केली आहे. नगरशेठ अहमदाबादमध्येच निर्माण झाले. हे नगरशेठ लोकप्रिय होते. यासंदर्भातील मगनलाल वादकचंद याचा दृष्टिकोन म्हणजे अहमदाबादचा अभिजात इतिहास आहे. त्यांनी

देणगी देऊन संस्थाचे संघटन केले होते. शांतीदास जव्हेरीला मोगल सरदाराची पदवी प्राप्त होती. मोगलाकडून त्याला जहागिरी प्राप्त झाली होती. प्रत्यक्षात शांतीदास जव्हेरीने या पदवीवर कधीही भर दिला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर ही पदवी त्यांच्या वंशजांना प्राप्त झाली.

मोगल सरदारांची उपाधी प्राप्त करण्यामध्ये इतर व्यापाऱ्यामध्ये स्पर्धा होती. शांतीदास जव्हेरीने संपूर्ण अहमदाबाद व्यापले होते. ही उपाधी मिळण्या पूर्वीपासूनच शांतीदास व्यापारामध्ये सुप्रसिद्ध होता. शांतीदासचा नातू खुशचंदला ही पदवी १७२४ मध्ये प्राप्त झाली. हल्लेखोराकडून अहमदाबादची सुटका होण्याकरिता त्याने स्वतःच्या खिशातून पैसे दिले होते. याचा संदर्भ M.S. Commissarant यांच्या History of Gujarat मध्ये नमूद केला आहे. त्याने अगदी दिलदारपणे शहराची सुटका केली होती. तेव्हा सर्व महाजन अहमदाबाद शहरामध्ये होते. त्याने समूह आणि व्यापाराचे प्रतिनिधित्व केले होते. खुशचंद आणि त्यांच्या वंशजानी वेळोवेळी अहमदाबादची अडचणीतून सोडवणूक केली होती. त्यामुळेच त्याचे शहरावर वजन व सर्व पातळ्यावर सन्मान होता. 'मिरात-ए-अहमदी' यामध्ये गुजरातच्या इतिहास पर्शियन मध्ये आहे. यामध्ये खुशचंदच्या कर्तृत्वाचे अनेक संदर्भ सापडतात. यामुळे त्रिपाठी आणि मेहता असे म्हणतात की यामुळेच ही उपाधी इतर प्रतिस्पर्ध्यांना आकर्षित करीत असावी. बराच काळ ही उपाधी जव्हेरी कुटुंबाकडे होती कारण त्यांनी शहराचे विश्वस्त म्हणून पार पाडलेले कर्तव्य व त्यामागील साम्राज्य त्याला कारणीभूत होते.

**नगरशेठाकडून धडा :**

खुशचंद आणि त्यांच्या वंशजनी केलेल्या कर्तृत्वामुळे अहमदाबादमध्ये व्यापाराचा विस्तार झाला. यामधूनच पुढे महाजन आणि नगरशेठ इतिहासातील सामाजिक संस्था ठरले. हे सर्व गुजराती खतपत्रे आणि विल्यम जोन्सने अभ्यासलेल्या संस्कृत संदर्भावरून स्पष्ट होते.

गांधीचे विशेष प्रेम अहमदाबाद शहरावर होते. गांधीजवळ व्यापारी वर्गाचे सबळ संघटन होते. याबाबत गांधी म्हणाले होते की, फार संपत्ती अहमदाबाद शहरामध्ये आहे. ही संपत्ती गुजरातकडे वळविणे आवश्यक आहे. असे झाले तर गुजरातचे भौतिक आणि आध्यात्मिक सौंदर्य वाढेल. यामुळे गुजरात भारतातील निरोगी स्थान म्हणून प्रसिद्ध होईल. अहमदाबाद मधील श्रीमंत आणि परोपकार वृत्तीच्या लोकांनी समाजाकरिता देणग्या दिल्या होत्या. सामाजिक जबाबदारी स्वीकारली होती. सामाजिक कारणासाठी दिलेल्या सहभागामुळेच समाजाची नैतिकता एका वेगळ्या उंचीवर गेली होती. यामुळेच अहमदाबाद संपूर्ण देशातीलच नाही तर संपूर्ण जगातील उत्तम उदाहरण होईल. कारण या सर्वांची पाळेमूळे विश्वस्त संकल्पनेशी जुळलेली आहेत.

विश्वस्त संकल्पनेकरिता चांगल्या विचारांसह असणारा चांगुलपणा हे महत्त्वाचे साधन आहे. महान संपत्तीचा वारसा भौतिक आणि आध्यात्मिकतेतून निर्माण होत असतो. चांगल्या श्रीमंत माणसाची काय भूमिका आहे? गांधीच्या नुसार त्याने त्याच्या संपत्तीकडे साधन म्हणून पहावे. हे साधन सामाजिक कार्यामध्ये सहभागी करून घ्यावे. या संपत्तीने समाजाची नैतिकता वाढवावी. ज्यामुळे संपत्तीला आंतरिक मूल्य निर्माण होईल व

समाज नैतिकतेच्या एका उंचीवर नेऊन ठेवता येईल. गांधीचे उद्दिष्ट व कृतीला वैश्विक दृष्टिकोन होता. यामुळेच अहमदाबादचा वारसा जगासाठी आदर्श ठरला.

गुजरातचा व्यापारी किंवा बनिया हा फार पुरातन काळापासून विश्वस्त आहे. त्रिपाठी आणि मेहता यांच्यानुसार ही अखंडित वंशावळ आहे. त्रिपाठी आणि मेहतानी याचा उल्लेख व्यापार संघ म्हणून न करता महाजन म्हणूनच केला आहे. नगरशेठ हे प्रमुख व्यापारी पुढारी होते. जे शहर आणि शहरातील नागरिकांचे परोपकारी होते.

गांधीनी विश्वस्त संकल्पना प्रस्तुत करतांना जैन आनंदजी कल्याणजी यांचीच संस्था नमूद केली आहे. पाच दशके या संस्थेचे प्रमुख कस्तुरभाई लालभाई होते. गांधीचे कस्तुरभाईशी फार मैत्रीपूर्ण संबंध होते. गांधीनी बराच काळ त्यांच्यासोबत व्यतीत केला होता. कस्तुरभाईचा स्वत:चा विश्वस्ताचा दृष्टिकोन होता. कस्तुरभाईच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशामध्ये व शहरामध्ये गरजूंना निवारा उपलब्ध करून दिला होता. विश्वस्त म्हणून वारशाने त्यांच्याकडे मंदिरे व देवताची संपत्ती आली होती. कस्तुरभाईनी ही संपत्ती व्यवस्थापक म्हणून सांभाळली होती. प्रत्यक्षात मंदिराचा निधी वळविता येत नव्हता. निधी वळविण्यावर बंधने होती. कारण याला विश्वासघाताचा संदर्भ आहे. कस्तुरभाईनी विश्वस्ताचे कर्तव्य पार पाडले होते. ते कर्तव्याबाबत अत्यंत जागरूक होते. यामध्येच नगरशेठाचे यश दडलेले होते. शिवाय शहराकरिता जो खर्च केला जात होता तो कस्तुरभाईंच्या व्यक्तिगत बचतीतून केला जात होता.

अहमदाबाद शहराच्या विकासामध्ये कस्तुरभाईचे स्वत:चे योगदान आहे. कस्तुरभाईनी केवळ संपत्ती उपलब्ध करून दिली असे नाही तर स्वत:चा वेळ आणि उर्जा देऊन स्वत:ला वाहून घेतले होते. जो की आजच्या संदर्भात हा परंपरा आणि निगम शासनाचा वादप्रश्न आहे. आनंदजी कल्याणजी संस्थेचे प्रमुख शांतीदास जव्हेरीचे वंशज होते. यामध्ये लालभाई, कस्तुरभाई फार काळजी करीत असे की पुढील वंशज पेढीला चांगल्या स्थितीत ठेवतील का? आणि संस्थेचे अस्तित्व राहील का? म्हणून संस्थेच्या नियमामध्येच बदल करण्यात आले. गांधी कस्तुरभाईच्या तत्त्वानी प्रभावित होते. विशेषत: गांधीना बनिया परंपरेची कृती प्रभावित करून गेली होती. कस्तुरभाईंनी ब्रिटिश नियम संस्थेला लावले आणि संस्था परिवर्तित करून घेतली. यामुळे आनंदजी कल्याणजी या संस्थेला नवीन वसाहती कायदा १९ व्या शतकात लागू झाला.

**समारोप :**

विश्वस्त ही महत्त्वपूर्ण संकल्पना असून ती गांधीच्या अंतरंगाना प्रस्तुत करते. यामध्ये समस्याच्या निराकरणाबाबत वैविध्यत आहे. वैश्विक वैधता आहे आणि राजकीय अर्थशास्त्राकरिता महत्त्वाची संकल्पना आहे. या संकल्पनेचा सन्मानपूर्वक उपयोग आजच्या निगम शासना (corporate governance) मध्ये केला जातो. आजच्या निगम शासनामध्ये सामाजिक दायित्व, संपत्ती व्यवस्थापन व परोपकार ही भूमिका विश्वस्त म्हणून आज अनेक कंपन्या पार पाडत आहे. गांधीनी ही संकल्पना जगाचा नागरिक म्हणून प्रस्तुत केलेली आहे. याकरिता विविध स्त्रोताचा वापर केला आहे. गांधीनी अशी जोड भारतीय तत्त्वज्ञान, कायदा आणि प्रत्यक्ष बनियाच्या कृतीशी घातली आहे. या सर्वांबाबत

रजनी बक्षी असे म्हणतात की, तो वाजीचा पुत्र किंवा बनियाचा मुलगा असल्यामुळे अजोड अशी कृती विश्वस्त संकल्पनेबाबत करू शकला आहे.

**संदर्भ :**


1) Rao Jaithirth, Jha Shishir K. (2018) : A less acknowledged source of Gandhi's Ideas of Trustship. Sept. 15, Vol-III, No. 37 EPW.

2) Bakshi R. (2012) : Civilization Gandhi, Mumbai Gateway House.

3) Banerjee P. and Other (2016) : The work of Theory : Thinking Across tradition, Vol. 51, No. 37, EPW.

4) Gandhi M.K. (1960) : Trustship, Ahmedabad, Navjivan Mudranalaya.

5) Goswami C. (2016) : Globalisation before its Time : The Gujrathis merchants from Kachh, New Delhi, Penguin Publishing .

6) Guha R. (2011) : The last Qvaker in India, The Hindu, 20th July.

7) Tripathi D. and Mehta M.J. (1978) : The Nagarsheth of Ahmedabad : The history of an urban institution in Gujrat city, IIMA working paper, Ahmedabad.


◆◆◆

**(ग्रंथ परिचय)**

# ग्रामीण विकासाची वाटचाल

**लेखक : कुमुदिनी जोगी**

(प्रकाशक : सेंटर फॉर एकॉनोमिक अॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती. किंमत ३५०/-, पृष्ठसंख्या ३३८)

**दिपाली पडोळे**
सहाय्यक प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.

ग्रामीण विकासाची वाटचाल हे पुस्तक कुमुदिनी जोगी यांच्या 'अकोला जिल्ह्यातील ग्रामीण विकासाची वाटचाल' या केलेल्या संशोधनाचे पुस्तकरूपाने प्रकाशन सेंटर फॉर एकॉनोमिक अॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती द्वारे प्रकाशित करण्यात आले. प्रस्तुत पुस्तकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया असणारा ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक आर्थिक घटकांचे अद्ययावत आकडेवारीच्या आधारे अर्थशास्त्रीय चिंतन व संपूर्ण माहितीचे विश्लेषण अत्यंत वाचनीय व उपयुक्त आहे. ग्रामीण विकासाची वाटचाल या ग्रंथामध्ये स्वातंत्र्यप्राप्ती नंतर म्हणजे सन १९५१ ते २०११ या कालखंडामधील ग्रामीण भागात वास्तव्यास असणारी लोकसंख्या घटणारी असून ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यासाठी आर्थिक घटकांच्या आधुनिक स्वरूपाचे परिवर्तन होऊन असणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण सोईस्कर योजनांची अंमलबजावणी करण्यात आले आहे. दर्जेदार लिखाण अर्थशास्त्री अभ्यासक तसेच संशोधक यांना प्राप्त झाले आहे. अध्ययनासाठी अकोला जिल्ह्यातील ४ तालुक्यांची नमुना तालुके म्हणून निवड केली आहे. प्रत्येक तालुक्यातील नमुना ४ गावे अशा १६ गावांमधील प्रत्येकी ३० लाभार्थी अशा ४८० नमुना लाभार्थींची अध्ययनासाठी निवड केली आहे.

ग्रामीण विकासाची दीर्घकालीन प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी ग्रामीण विकासाच्या विविध व्याख्या, तसेच ग्रामीण विकासाचा मुख्य उद्देश स्पष्ट करतांना मानवाच्या सर्वांगीण आर्थिक कल्याणाकरिता ग्रामीण भागातील संसाधनांचा उपयुक्त वापर व व्यवस्थापन करून आर्थिक लाभ वाढेल. परिणामी ग्रामीण भागातून शहरीभागाकडे होणारे स्थलांतर थांबेल. असे विचार आकडेवारीसह स्पष्ट केले आहे.

जोगी यांनी आपल्या ग्रंथामध्ये ग्रामीण भागाच्या विकासाकरिता दारिद्र्य निर्मूलन, कृषी विकास, ग्रामोद्योग, रोजगार निर्मिती, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, गृहनिर्माण, ग्रामीण स्वच्छता तसेच रस्ते व वीज यामध्ये सुधारणा व वाढ अपेक्षित आहे. हे स्पष्ट केले आहे. लेखकाने ग्रंथामध्ये चिकित्सक अध्ययन करून ग्रामीण विकासातील इतिहास पाहतांना स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये व्यक्तिगत व संख्यागत प्रयत्न दिसून येतात. तर स्वातंत्र्यानंतर देखील व्यक्तिगत व संस्थागत प्रयत्न केले याची माहिती दिली आहे. यामध्ये केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाद्वारे एकूण ४५ यंत्रणा कार्यरत आहेत. याची संपूर्ण माहिती ग्रंथाद्वारे प्राप्त होते.

ग्रामीण विकास ही संकल्पना किती व्यापक

आहे. ग्रामीण विकासाचा सूक्ष्म अभ्यास करताना जोगी यांनी सर्व आर्थिक घटकांचा आकडेवारी सहीत अभ्यास केला आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये भारतातील ग्रामीण विकास भारताच्या भौगोलिक स्वरूपावर देखील अवलंबून आहे. तर भारताच्या कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सन २०१६ च्या आकडेवारीनुसार १७.३२ प्रतिशत होता. ५० प्रतिशत लोकसंख्या कृषीवर निर्भर होती. असे मत मांडले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये आरोग्य विषयक सुविधा, पिण्याचे पाणी, आरोग्यदायी निवारा या आरोग्यावर परिणाम करतात. या सर्व घटकांचे विश्लेषण दर्जेदार स्वरूपात मांडले आहे. सन २००४-०५ च्या आकडेवारीनुसार दारिद्र्याचे प्रमाण ३०.७ प्रतिशत होते. म्हणून ग्रामीण विकासामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, औद्योगिकीकरण, नागरीकरण माहिती आणि तंत्रज्ञान निर्यात स्टॉक मार्केट, विदेशी गंगाजलासाठी, दळणवळण या सारख्या विकास निर्देशांकामध्ये अनुकूल सुधारणा तर दारिद्र्य, बेरोजगारी, क्षेत्रीय असमतोल, मानव विकास यात विषमता या बाबीचे अध्ययनाचे महत्त्व सिद्ध होते.

प्रस्तुत ग्रंथामध्ये जोगी यांनी अकोला जिल्ह्याची भौगोलिक संपूर्ण माहिती दिली असून अकोला जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाच्या संपूर्ण योजनांचा आढावा घेतला आहे. विकास योजना, लाभार्थी, झालेला फायदा, अडचणी, उपाय यांचे आकडेवारी सहीत विश्लेषण अंतर्भूत आहे. या संशोधनामध्ये अध्ययन परिक्षेत्र अकोला जिल्हा असून २००१ ते २०१० असा दहा वर्षाचा कालखंड होता.

ग्रामीण विकाससंबंधी प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने उपलब्ध साहित्याचा आढावा ग्रंथ, लेख व विचारवंत अशा तीन भागामध्ये घेतला आहे. मायकेल टोडॅरो यांनी चीनच्या अनुभवांचा आधार घेत ग्रामीण विकास विषयक नवप्रवर्तनवादी दृष्टिकोन, विनोद कुमार, लवानिया व पी.एन.पाण्डेय यांनी ग्रामीण विकासाचे अनुभवधिष्ठित विवेचन, रूद्र दत्त यांनी ग्रामीण विकासविषयक आंतरराज्यीय असमतोलाचे विवेचन, भारतीय विचारवंत समाजसुधारकांचा विचारांचा परामर्ष घेतला आहे.

ग्रामीण विकासाकरिता सरकारच्या ग्रामीण विकास धोरणांची अद्ययावत आकडेवारीसह तसेच सर्व योजनांची माहिती प्राप्त होते. नववी पंचवार्षिक योजना १९९७-२००२ पर्यंत महाराष्ट्र राज्याने ग्रामीण विकास खर्च स्पष्ट केला आहे. शासनाने कृषिक्षेत्राला प्राधान्यक्रम दिला असून रोजगार निर्मिती, सामाजिक न्याय, दारिद्र्य निर्मूलन कृषिविकास यात जास्त वाढ झाली नाही ही मर्यादा स्पष्ट होते.

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी उद्योग, गृहनिर्माण, विद्युत बायोगॅस आणि रस्ते बांधणी यामुळे जनतेला फायदा झाला. ग्रामीण आधारभूत सुविधांमध्ये जिल्हा उद्योग केंद्र, खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि विविध विकास मंडळा अंतर्गत खादी व ग्रामोद्योग विशेष घटक योजना, कारागीर रोजगार हमी योजना, मार्जिन मनी योजना या योजनांच्या विविध आकडेवारीनुसार स्पष्टीकरण केले. अशा लेखकाने राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, भारत निर्माण, इंदिरा आवास योजना अशा योजनांची माहिती ही अत्यंत उपयुक्त ठरते.

ग्रामीण क्षेत्रातील कृषी विकासाचा राष्ट्रीय उत्पन्नाचा हिस्सा २०१० मध्ये १९ प्रतिशत तर २०१६-१७ मध्ये १७.९ प्रतिशत होता. ग्रामीण भागातील, सिंचन व्यवस्था त्याचा वापर तसेच अकोला जिल्ह्यातील सिंचन सुविधा, पतपुरवठा,

कर्ज वाटप, विपणन यामधील धनात्मक वाढ अपेक्षित असताना ग्रामीण कृषी करिता शासनाच्या अनेक योजना राबविण्यात आल्या. या संपूर्ण योजनांचे उपयुक्त विश्लेषण केले आहे.

लेखकाने मानवाच्या गुणात्मक दर्जा वाढविणारा घटक आरोग्य व शिक्षण याकरिता ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या योजना महिला व बालकांकरिता असणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, लसीकरण बळकटीकरण, डॉक्टर तुमच्या गावी योजना, जननी सुरक्षा योजना, आरोग्य पूरक योजनांमध्ये पाणीपुरवठा, जलस्वराज्य, ग्रामीण स्वच्छता, संपूर्ण स्वच्छता अभियान या विषयी वास्तविक आकडेवारी सहीत समस्या आहेत. याची जाणीव निदर्शनास आणून दिली आहे. आरोग्य विषयक लाभार्थी शिक्षणामध्ये विकास होण्याकरिता विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती वाढविण्याकरिता शालेय पोषण आहार, स्वच्छता याची माहिती दिली आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्था कृषीवर निर्भर असून जनतेला मिळणारा रोजगार हा शेतीवर अवलंबून आहे. म्हणूनच शेतीमार्फत अल्परोजगार प्राप्त झाल्याने दारिद्र्यात वाढ होते. शासनाने रोजगार निर्मितीकरिता योजनांची अंमलबजावणी केली. त्यापैकी अकोला जिल्ह्यातील रोजगार निर्मितीचे वास्तव जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेकरिता नमुना पाहणी केली आहे. सदर योजनेच्या एकूण ८० लाभार्थीचे नमुना पाहणीद्वारे आकडेवारी सह विश्लेषण अत्यंत उपयुक्त ठरते. लाभार्थ्यांना जॉबकार्ड प्राप्ती, कुटुंबातील रोजगार उपलब्ध सदस्य, कामाचे दिवस, गावापासून कामाच्या ठिकाणचे अंतर कामाचे स्वरूप, मजुरी प्राप्तीची पद्धत, योजनेअंतर्गत काम उपलब्ध न झाल्यास पर्यायी काम अशा सर्व मुद्यांचे विश्लेषण अभ्यासकांसमोर स्पष्ट करून दिले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे लेखन जोगी यांनी ०८ प्रकरणांमध्ये केले असून ग्रामीण विकासाचे सर्व समावेशक आर्थिक व आवश्यक घटक आर्थिक चिकित्सा करण्यासाठी विचारात घेतले. अत्यंत दर्जेदार शब्दात मांडणी केली असून आकडेवारीचे विश्लेषण सुटसुटीत व आकलनक्षम आहे. अंतिम प्रकरणामध्ये संशोधनाच्या अडचणी, निष्कर्ष व शिफारशी या देखील अत्यंत काळजीपूर्वक मांडल्या असून अकोला जिल्ह्यामध्ये राबविलेल्या ग्रामीण विकास योजना आढावा घेतला. उद्योग, गृहनिर्माण, स्वच्छता या घटकांची संबंधित योजनांच्या प्रगतीचा वेग व प्राप्त कमी तर वीज पुरवठा, पाणीपुरवठा, रस्ते निर्माण, आरोग्य, शिक्षण या घटकांची अनुकूल प्रगती तर कृषी विषयक योजनांची प्रगती समाधानकारक आहे. ग्रामीण विकास योजनांचे अपयश शोधून त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे. ग्रामीण विकासामध्ये प्रत्यक्ष जनता, प्रशासन, योजना राबविणारे अधिकारी यांचे एकत्रित कार्य ही विकासाची गुरुकिल्ली ठरेल असे लेखिकेला वाटते.

प्रस्तुत संशोधनामधील कुमुदिनी जोगी यांचे मार्गदर्शक डॉ. मुक्ता जहागिरदार यांचे मोलाचे मार्गदर्शन, ग्रंथाची यथार्थता स्पष्ट करते. लेखिका जोगी यांनी वरवर सोपा वाटणारा ग्रामीण विकासाची वाटचाल हा विषय किती व्यापक, महत्त्वाचा व संशोधनाचा आहे हे प्रस्तुत ग्रंथामध्ये स्पष्ट केले आहे. कुमुदिनी जोगी यांचे शास्त्रीय विषय हाताळण्याचे कौशल्य तसेच तर्कनिष्ट व शास्त्रीय विवेचन करण्याची त्यांची वृत्ती या ग्रंथातून आपल्या लक्षात येते. अभ्यासक असो वा प्रशासक सर्वांसाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे.

◆◆◆

**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर,जि. नागपूर**
**येथे संपन्न झालेल्या .....**

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत (२०१८-१९)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन दि. २ व ३ फ्रेबुवारी २०१९ (शनिवार व रविवार) रोजी भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर येथे संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष प्रा. डॉ.पद्माकर अग्रवाल हे होते. ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजेन्द्र भांडवलकर, सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ होते. सुरूवातीला पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थी व विद्यार्थीनींनी विद्यापीठ गीत सादर केले. प्रास्ताविक परिचय भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य जार्ज सर यांनी केले, परिषदेच्या वतीने प्रास्ताविक प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले. त्यानंतर परिषदेच्या कार्याध्यक्ष्या डॉ. अंजली कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अधिवेशनाचे रितरसर उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगूरू डॉ.
काणे यांनी केले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी डॉ.विनय बाबरकर, परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. मनिष कायरकर परिषदेचे दोन्ही सचिव डॉ.राजेश चव्हाण व सचिव डॉ.विठ्ठल घिनमिने उपस्थितीत होते. मान्यवरांच्या उपस्थितीत अधिवेशना निमित्त स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष मा. प्रा.डॉ. राजेन्द्र भांडवलकर यांनी लहान राज्यांची संकल्पना आणि आव्हाने (विशेष संदर्भ - विदर्भ राज्य) या विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण केले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष मा श्री. पद्माकर अग्रवाल यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. उद्घाटन सोहळ्याचे सूत्र संचालन सुमित्रा संन्याल यांनी केले व आभार प्रदर्शन स्थानिक कार्यवाहक डॉ. सुनिल शिंदे यांनी केले. शेवटी पसायदान होऊन उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या चर्चासत्रात भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा या विषयावरील चर्चासत्राचे अध्यक्ष मा. प्रा.डॉ.राजेन्द्र भांडवलकर, सभाध्यक्ष डॉ. संगीता टक्कामोरे, सुत्रसंचालन प्रा. डॉ.प्रतिभा काळमेघ तर वृत्त लेखकाचे कार्य डॉ.ढावरी यांनीकेले या विषयावर एकूण ५ संशोधकांनी शोधनिबंध सादर केलेत व इतर सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

चहापानानंतर दुसऱ्या सत्रात 'भारतातील सार्वजनिक क्षेत्राची यथार्थता' या विषयावरील सभाध्यक्ष डॉ. माणिक ठिकरे, सुत्र संचालक डॉ.सिद्धार्थ मेश्राम, वृत्त लेखनाचे कार्य डॉ.दिलीप महाजन यांनी केले. या विषयावर एकून सहा संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केलेत व इतर सदस्यांनी चर्चेत सहभाग नोंदविला तर आभार प्रदर्शन

डॉ. कुमुदिनी जोगी यांनी केले.

अधिवेशनाच्या निमित्याने घेण्यात येणारे नाणेकर पिंपरकर स्मृती व्याख्यान मालेचे वक्ते प्राचार्य डॉ. सुधीर बोधनकर यांनी 'महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्र भांडवलकर होते, प्रास्तविक डॉ. आर. वाय. माहोरे यांनी केले, वक्त्यांचा परिचय डॉ. करमसिंग राजपूत यांनी केला तर सूत्र संचालक डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले.

पहिल्या दिवशी संध्याकाळी ६.०० वाजता विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. राजेन्द्र भांडवलकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आमसभेच्या सुरूवातीला दिवगंत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरू झाले मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले. मागील आर्थिक वर्षाचा परिषदेचा व अर्थमीमांसाचा हिशेब सादर करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. पुढील ४४ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता

१) जागतीक मुक्त व्यापार व चे यशापमश.
२) वर्तमान काळात भारतातील रोजगाराचे बदलते स्वरूप.
३) विदर्भातील जिल्हा नियोजन व विकास मंडळ कार्याचा आढावा (जिल्हा निहाय)

हे तीन विषय निश्चित करण्यात आले.

४४ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता अध्यक्ष म्हणून डॉ.मृणालीनी फडणवीस यांची बिनविरोध निवड करण्यात आली.पुढील तीन वर्षाकरिता प्रा.निवृत्ती पिस्तुलकर यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. तसेच उपाध्यक्ष म्हणून डॉ. राजेश बुरंगे यांची निवड झाली.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रामध्ये 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' ह्या उपक्रमाचे सातवे पुष्प डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी गुन्नार मिर्डाल यांचे 'आर्थिक सिद्धांत आणि अर्थविकसित प्रदेश' या पुस्तकावर अतिशय अभ्यासपूर्ण भाषण दिले. या सत्राचे अध्यक्ष डॉ.राजेन्द्र भांडवलकर हे होते तर प्रास्ताविका डॉ. अंजली कुलकर्णी यांनी केले. सुत्र संचालन डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले.

दुसऱ्या दिवशी, दुसऱ्या सत्रात विदर्भातील बांधकाम व्यवसाय शासकीय व खाजगी क्षेत्रातील विकास (जिल्हा निहाय) या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. विनोद गांवडे होते, वृत्त संकलन डॉ श्रीकृष्ण गोरडे यांनी केले तर सुत्र संचालन डॉ.राजेश चिमणकर यांनी केले. या विषयावर सखोल चर्चा होवून अध्यक्षीय भाषणानंतर हे सत्र संपन्न झाले.

अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जार्ज सर होते. प्रमुख उपस्थिती मा. डॉ. राजेन्द्र भांडवलकर तसेच संस्थेचे पदाधिकारी, कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुलकर्णी, सचिव डॉ. राजेश चव्हाण, सचिव विठ्ठल घिनमिने स्थानिक कार्यवाहक डॉ.सुनिल शिंदे उपस्थितीत होते. या कार्यक्रमात पीएच्.डी. प्राप्त आणि विशेष प्राविण्य प्राप्त करण्याऱ्या परिषदेच्या सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

अधिवेशनात सादर झालेल्या उत्कृष्ट शोधनिबंधास परिषदे तर्फे डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ.दि.व्यं.जहागिरदार प्रोत्साहन पर रोख पारितोषिक डॉ.डि.एस.गुर्जर व डॉ.जे. व्ही. गायकवाड यांना विभागून देण्यात आले.तर स्व. मोतीरामजी हनवंते

स्मृती पारितोषिक डॉ. सुनिल शिंदे व डॉ. श्रीकृष्ण भुरे यांना विभागून देण्यात आले. स्व. डॉ. श्री.आ. देशपांडे पारितोषिक अर्थमीमांसा पत्रिकेतील उत्कृष्ट लेखाचे पारितोषिक डॉ. आर. वाय. माहोरे व डॉ. सुमित माहोरे तसेच डॉ. जे.व्ही. गायकवाड यांना विभागुण देण्यात आले.

नवनियुक्त अध्यक्ष, मा.कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नवनियुक्त कार्याध्यक्ष प्रा. निवृत्ती पिस्तुलकर आणि डॉ. राजेश बुरंगे उपाध्यक्ष यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ.जार्ज सर व डॉ.शिंदे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळ परिषदेच्या प्रतिनिधींनी दोन दिवसीय आयोजित अधिवेशनाच्या उत्तम आयोजनाबाबत आपले समाधान व्यक्त केले. विदर्भातील अर्थशास्त्र अभ्यासक, विद्यार्थी, पत्रकार व कार्यकारी मंडळ तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ज्यांचे सहकार्य अधिवेशासाठी लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजेन्द्र भांडवलकर यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**राजेश चव्हाण** **विठ्ठल धिनमिने**

सचिव,

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

◆◆◆